मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.

https://epaper.vruttamanas.in/

वृत्तमानस

मुंबई/ पालघर | गुरुवार, १२ नोव्हेंबर २०२६ | वर्ष- ३१ | अंक - १४२ | पाने - ८ | आर. एन. आय क्र. - ६५६०९/९६ | किंमत : ३ रुपये

Email : vrittamanas1@gmail.com



रब्बी हंगामासाठी खत अनुदानास केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी

नवी दिल्ली : रब्बी हंगाम २०२६-२७ साठी फॉस्फेटयुक्त आणि पोटॅशयुक्त खतांवरील 'पोषकद्रव्य आधारित अनुदाना'च्या (NBS) सुधारित दरांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील केंद्रीय मंत्रिमंडळाने बुधवारी मंजुरी दिली. १ ऑक्टोबर २०२६ ते ३१ मार्च २०२७ या सहा महिन्यांच्या कालावधीसाठी सरकारने तब्बल ६२,३७०.०२ कोटी रुपयांच्या अनुदानाची तरतूद केली आहे. मागील रब्बी हंगाम २०२५-२६ च्या ३७,९५२.२९ कोटी रुपयांच्या तरतुदीच्या तुलनेत ही रक्कम २४,४१७.७३ कोटी रुपयांनी अधिक आहे. पीआयबीकडून याबाबतचे प्रसिद्धीपत्रक जारी करण्यात आले आहे.

सविस्तर वृत्त पान 8 वर

म ह त्त्वा चे

मुलानं घरात घुसून वडील-भावावर झाडल्या गोळ्या

कल्याण : मालमत्तेतील वाटा मिळावा, यासाठी सुरू असलेल्या वादातून एका मुलानेच आपल्या वडिलांसह सख्ख्या भावावर गोळीबार केल्याची धक्कादायक घटना टिटवाळ्याजवळील गुरवलीपाडा परिसरात घडली. या हल्ल्यात वडील बाळाराम शेलार आणि भाऊ भरत शेलार गंभीर जखमी झाले आहेत. दोघांनाही उपचारासाठी ज्युपिटर रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती आहे. या घटनेतील आरोपीचे नाव कल्पेश शेलार असे आहे.

वृत्त पान ५ वर

आंतरराष्ट्रीय उड्डाणे नवी मुंबईत हलवण्यास फडणवीसांचा नकार

प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबई विमानतळावरील टर्मिनल-1 च्या पुनर्विकासासाठी आंतरराष्ट्रीय उड्डाणे थेट नवी मुंबईत हलवण्याच्या प्रस्तावाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नकार दर्शवला आहे. प्रवाशांची होणारी ओढाताण आणि धावपळ रोखण्यासाठी आधी नवीन टर्मिनल उभारा आणि मगच जुने पाडा, असा थेट इशारा देत फडणवीसांनी केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्रालयासमोर पर्यायी आराखडा तयार करण्याची अट ठेवली आहे.

मुंबई विमानतळावरील टर्मिनल-1 च्या पुनर्विकासाची प्रक्रिया सुरू करण्यासाठी सध्याच्या प्रवासी व्यवस्थेत बदल करणे आवश्यक आहे. याच पार्श्वभूमीवर मुंबई विमानतळावरील 14 आंतरराष्ट्रीय मार्गांवरील विमानसेवा नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर स्थलांतरित करण्याचा प्रस्ताव चर्चेत आला आहे. मात्र, या प्रस्तावामुळे



मुंबई विमानतळावरून प्रवास करणाऱ्या आंतरराष्ट्रीय प्रवाशांना विमानतळ बदलण्याची वेळ येणार आहे. परिणामी, मुंबई आणि नवी मुंबईदरम्यानचा प्रवास, वाहतूक कोंडी आणि विमानतळ गाठण्यासाठी लागणारा अतिरिक्त वेळ यामुळे प्रवाशांची मोठी गैरसोय होण्याची शक्यता आहे. ही संभाव्य गैरसोय लक्षात घेऊन मुख्यमंत्री फडणवीस यांनी पुनर्विकासासाठी टप्प्याटप्प्याने काम करण्याचा पर्याय सुचवला आहे. त्यानुसार, सर्वप्रथम टर्मिनल-1 बी या नव्या टर्मिनलची उभारणी करण्यात यावी. त्याचे काम पूर्ण झाल्यानंतर सध्या टर्मिनल-1 ए मधून सुरू असलेली प्रवासी वाहतूक आणि अन्य कामकाज नव्या टर्मिनलमध्ये स्थलांतरित करावे. त्यानंतरच जुन्या टर्मिनलचे पाडकाम करून पुनर्विकासाचे काम सुरू करावे, असं मुख्यमंत्री फडणवीस यांनी म्हटलं आहे.

मुंबई आणि नवी मुंबई ही दोन्ही विमानतळे मुंबई महानगर प्रदेशाच्या हवाई वाहतूक व्यवस्थेतील महत्त्वाची केंद्रे आहेत. नवी मुंबई विमानतळामुळे भविष्यातील वाढती प्रवासी वाहतूक हाताळण्यास मदत होणार आहे. मात्र, त्यासाठी मुंबई विमानतळावरील विद्यमान आंतरराष्ट्रीय मार्गांचे स्थलांतर करताना प्रवाशांची सोय, विमान कंपन्यांचे नियोजन आणि दोन्ही विमानतळांमधील अंतर या बाबींचाही विचार करणे आवश्यक असल्याचे मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे. आता फडणवीस यांनी सुचवलेल्या पर्यायी आराखड्यावर केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्रालय काय निर्णय घेते, तसेच मुंबई विमानतळाच्या पुनर्विकासाचे नियोजन कोणत्या पद्धतीने केले जाते, याकडे विमान वाहतूक क्षेत्राचे आणि हवाई प्रवाशांचे लक्ष लागले आहे.

पाकिस्तानात पोलिसांच्या पथकावर दहशतवादी हल्ला, 11 पोलीसांचा जागीच मृत्यू



■ इस्लामाबाद

पाकिस्तानमध्ये पोलिसांच्या एका पथकावर मोठा हल्ला झाल्याची घटना आहे. . देशाच्या वायव्य भागात बंदूकधाऱ्यांनी पोलिसांच्या पथकाला लक्ष्य केले. या हल्ल्यात आतापर्यंत एका डीएसपीसह 11 पोलीसांचा मृत्यू झाला आहे. तर 12 जण जखमी झाले आहेत. हा हल्ला खैबर पख्तुनख्वा प्रांतातील कोहाट जिल्ह्यात झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पोलिसांचे पथक अवैध सोन्याच्या खाणकामाविरोधात छापा टाकण्यासाठी जात होते. दबा धरून बसलेल्या बंदूकधाऱ्यांनी पोलिसांच्या पथकावर अंदाधुंद गोळीबार केला. कोहाट पोलिसांचे प्रवक्ते मोहम्मद नौमान जेब यांनी सांगितले की, या हल्ल्यात 11 पोलीस ठार आणि 12 जण जखमी झाले आहेत.

हा हल्ला कोहाट आणि करक जिल्ह्यांच्या दरम्यान असलेल्या दरबोकाच जालंधर बांदा परिसरात झाला. हल्लेखोरांनी पोलीस पथकावर गोळीबार केला आणि त्यानंतर पाच पोलीस वाहने जाळून टाकली. या घटनेमुळे परिसरातील सुरक्षेची चिंता वाढली आहे. तथापि, हल्लेखोरांची ओळख आणि संख्येबाबतचा तपशील जाहीर करण्यात आलेला नाही.

गेल्या काही महिन्यांत पाकिस्तानच्या खैबर पख्तुनख्वा प्रांतात पोलीस कर्मचाऱ्यांना लक्ष्य करून अनेक हल्ले झाले आहेत. या घटनांमुळे या प्रदेशातील सुरक्षा परिस्थितीबद्दल प्रश्न निर्माण झाले आहेत. पोलीस आणि इतर सुरक्षा दलांवरील हल्ल्यांमध्ये सातत्याने वाढ झाली आहे. आर्म्ड कॉन्फ्लिक्ट लोकेशन अँड इव्हेंट डेटाच्या आकडेवारीनुसार, 2022 पासून पाकिस्तानमधील दहशतवादी हल्ल्यांची संख्या दरवर्षी वाढत आहे. 2022 मध्ये देशात 658 हल्ल्यांची नोंद झाली होती. 2025 मध्ये ही संख्या वाढून 2425 झाली. याचा अर्थ असा की, गेल्या तीन वर्षांत हल्ल्यांची संख्या जवळपास चौपट झाली आहे.

अजितदादांचा अपघात नव्हे घातपातच!

ज्याने केलं त्याला देव माफ करणार नाही, त्याच्या ७ पिढ्यांना भोगावं लागेल...

प्रतिनिधी
■ मुंबई

अजित पवारांच्या अपघाती निधनावरून रामदास कदम यांनी अलीकडेच घातपाताचा संशय व्यक्त केला होता. कदम यांच्या या विधानानंतर अजित पवारांच्या मृत्यूबाबत पुन्हा चर्चा सुरू झाली आहे. त्यात अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे नेते- प्रवक्ते उमेश पाटील यांनीही आज खळबळजनक आरोप केला. अजितदादांचा अपघात नव्हे तर घातपातच होता, असं विधान उमेश पाटील यांनी करून एकच खळबळ उडवून दिली.



आज माध्यमांशी बोलताना उमेश पाटील म्हणाले की, अजितदादा राजकारणात होते पण राजकारणी नव्हते. ते सरळ होते हीच दादांची ओळख होती. कदाचित दादा राजकारणी नसल्यामुळेच त्यांचे मोठे नुकसान झाले. अजितदादांचा हा अपघात होता की घातपात याबाबत सातत्याने मांडणी केली जाते. मात्र हा घातपातच आहे, असं मला वाटतं. त्याच्या खोलात गेल्यावर अनेक बाबी कळतील पण हा अपघात नव्हता, असं मला वाटतं असं त्यांनी सांगितले. ज्याने कुणी हे कृत्य केले देव त्याला माफ करणार नाही. मी दादांच्या स्मृतीस्थळीच आहे. दादा कदाचित त्याला माफ करतील पण जनता माफ करणार नाही. दादांवर महाराष्ट्रातील जनतेचे प्रचंड प्रेम होते. लोकांना त्यांच्या निधनाने इतक्या यातना झाल्या आहेत, हा सगळा तळतळाट ज्याने कुणी केले असेल त्याच्या ७ पिढ्यांना भोगावा लागेल असं उमेश पाटील यांनी म्हटलं आहे.

दरम्यान, अजित पवारांच्या अपघाती मृत्यूच्या तपासात मध्यंतरी प्रगती झाली आहे. त्या तपासाच्या प्रक्रियेत कुठलाही अडथळा नको म्हणून आम्ही यावर भाष्य करणे टाळतो. दादांच्या अपघाताचा तपास जाहीरपणे माध्यमांत चर्चेचा विषय नाही तर तपास पूर्ण होऊन त्यातील सत्य बाहेर येण्याचा विषय आहे. आम्ही २०-२५ वर्ष सामाजिक जीवनात, राजकारणात आहोत. जेव्हा एखादी घटना घडते त्यामागे काय काय कारणे असतात, त्याची तर्कसंगती जोडली तर निश्चितपणे हा घातपात असावा असं वाटतं, असं उमेश पाटील यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

जम्मू-काश्मीरमध्ये CRPF च्या तपासणी नाक्यावर दुचाकीस्वारांचा गोळीबार

तीन जवान जखमी, हल्लेखोर पसार

■ श्रीनगर

जम्मू-काश्मीरमधील कुलगाम जिल्ह्यात केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या तपासणी नाक्यावर दुचाकीवरून आलेल्या अज्ञात हल्लेखोरांनी गोळीबार केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. राष्ट्रीय महामार्गापासून सुमारे चार किलोमीटर अंतरावर असलेल्या या नाक्यावर झालेल्या अचानक हल्ल्यात सीआरपीएफचे तीन जवान जखमी झाले असून, त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेनंतर संपूर्ण परिसराला वेढा घालून सुरक्षा दलांनी हल्लेखोरांच्या शोध घेण्यासाठी मोहीम सुरू केली आहे.

सीआरपीएफने दिलेल्या माहितीनुसार, हेड कॉन्स्टेबल सोमवीर सिंह आणि कॉन्स्टेबल राकेश दास व संतोष चंद्रू अशी जखमी जवानांची नावे आहेत. या तिघांपैकी दोन जवानांना किरकोळ दुखापत झाली असून, तिसऱ्या जवानाची प्रकृती किंचित गंभीर असल्याचे सांगण्यात आले आहे. तीनही जवानांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. दुचाकीवरून आलेल्या दोन हल्लेखोरांनी तपासणी नाक्यावर तैनात असलेल्या सीआरपीएफच्या जवानांवर गोळीबार केला आणि त्यानंतर घटनास्थळावरून पळ काढला. हे तपासणी नाके राष्ट्रीय महामार्गापासून सुमारे चार किलोमीटर अंतरावर असल्याची माहिती समोर आली आहे. घटनेला दुजोरा देताना सीआरपीएफच्या अधिकाऱ्यांनी तीन जवान जखमी झाल्याचे सांगितले.

नेतन्याहूंना विरोधकांनी संसदेत घेरले, बचावासाठी मध्ये पडली पत्नी

■ तेल अवीव

त्रिशंकू संसद अस्तित्वात आल्यापासून इस्त्राइलमध्ये सत्तास्थापनेसाठी निर्माण झालेला तिढा आणि सुरू असलेलं राजकीय नाट्य अद्याप संपण्याचं नाव घेत नाही आहे. यादरम्यान, हल्लीच संसदेत बैठकीदरम्यान मोठा वाद उफाळून आला. बैठकीवेळी पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू देशाला एकजूट करण्याचं आवाहन करणारं भाषण देत होते. मात्र त्याचदरम्यान, वातावरण तापले. विरोधकांकडून करण्यात आलेल्या चौफेर आरोपांमुळे नेतन्याहू पुरते घेतले गेले. त्यावेळी नेतन्याहू यांना वाचवण्यासाठी अन्य कुणी नाही तर त्यांची पत्नी सारा नेतन्याहू या उभ्या राहिल्या. संसदेतच सारा नेतन्याहू आनि विरोधी पक्षनेते नफ्ताली बेनेट



यांच्यात जोरदार खडाजंगी उडाली. या घटनेचा व्हिडीओ समोर आला असून, त्यावरून लोक वेगवेगळ्या प्रतिक्रिया व्यक्त करत आहेत.

संसदेला संबोधित करताना बेंजामिन नेतन्याहू यांनी राष्ट्रीय एकतेचं आवाहन करून देशाला कुणावर अवलंबून असलेल्या सरकारची आवश्यता नाही, असे विधान केले आणि या वादाला सुरुवात झाली. नेतन्याहू यांचं बोलणं पूर्ण होण्यापूर्वीच विरोधी पक्षनेते नफ्ताली बेनेट यांनी त्यांनारोखले. तसेच कतारशी संबंधित वाद आणि ७ ऑक्टोबरला झालेल्या हल्ल्याच्या तपासावरून काही बोचरे प्रश्न विचारले. त्यानंतर संसदेत गोंधळाला सुरुवात झाली.

पान ८ वर

स्वच्छतेत नवी मुंबई सर्वोत्तम

स्वच्छ शहरांमध्ये प्रथम तर इतर पाच शहरांना मिळाले पुरस्कार

प्रतिनिधी
■ नवी दिल्ली

शहरी गृहनिर्माण व विकास मंत्रालयांच्या वतीने स्वच्छ भारत मिशन अंतर्गत आयोजित 'स्वच्छ सर्वेक्षण 2025-26' मध्ये यावर्षी नवी मुंबई शहर देशातील सर्वोत्तम स्वच्छ शहरांमध्ये प्रथम क्रमांकाचे मानकरी ठरले आहे. नवी दिल्ली येथे विज्ञान भवनात संपन्न झालेल्या पुरस्कार वितरण समारंभप्रसंगी देशाच्या महामहीम राष्ट्रपती श्रीम.द्रौपदी मुर्मू यांच्या शुभहस्ते, नवी मुंबईच्या महापौर श्रीम.सुजाता पाटील यांनी, उपमहापौर श्री.दशरथ भगत, आयुक्त डॉ.कैलास शिंदे, शहर अभियंता श्री. शिरीष आरदवाड यांच्या उपस्थितीत हा सर्वोच्च मानाचा पुरस्कार स्विकारला.



याप्रसंगी केंद्रीय गृहनिर्माण व शहरी व्यवहार मंत्री ना.श्री.मनोहरलाल खट्टर, राज्यमंत्री ना.श्री.तोखन साहू व सचिव श्री. सत्येंद्र सिंग उपस्थित होते. या पुरस्कार वितरण समारंभाप्रसंगी अतिरिक्त आयुक्त श्री.सुनिल पवार, घनकचरा व्यवस्थापन विभाग उपआयुक्त डॉ.अजय गडदे उपस्थित होते.

देशातील स्वच्छ शहरांच्या क्रमवारीत सातत्याने अग्रभागी राहणाऱ्या नवी मुंबई महानगरपालिकेने मागील 3-4 वर्षांपासून 'निश्चय केला, नंबर पहिला' हे आपले ध्येयवाक्य नजरेसमोर ठेवून त्याकडे नियोजनबध्द पावले टाकत वाटचाल सुरू ठेवली होती. स्वच्छतेमधील आपले मानांकन दरवर्षी उंचावत अखेरीस यावर्षी देशातील 4751 शहरांमधून नवी मुंबई महानगरपालिकेचे सेवाभावी स्वच्छताकर्मी व नागरिक यांच्या एकत्रित प्रयत्नांतून समस्त लोकप्रतिनिधी आणि अधिकारी, कर्मचारी यांच्या माध्यमातून देशात प्रथम क्रमांकाच्या सर्वोत्तम स्वच्छ शहराचे लक्ष्य

पान ८ वर

दिवाळीत कुटुंबावर कोसळला दुःखाचा डोंगर

पाहुण्यांकडे गेलेल्या बाप-लेकींचा मृत्यू

प्रतिनिधी
■ नाशिक

दिवाळीच्या सुट्ट्यांचा आनंद घेण्यासाठी गेलेल्या एकाच कुटुंबावर काळाने घाला घातल्याची दुर्दैवी घटना नाशिकमध्ये घडली. त्र्यंबकेश्वर तालुक्यातील अंजनेरी शिवारात बाप आणि २ मुलींचा बुडून मृत्यू झालाय. बेझे धरणात आंघोळीसाठी गेलेल्या वडील आणि त्यांच्या दोन लहान मुलींचा पाण्यात बुडून मृत्यू झाला आहे. या घटनेमुळे नाशिक आणि त्र्यंबकेश्वर परिसरात मोठी हळहळ व्यक्त होत असून, संपूर्ण अंजनेरी गावावर शोककळा



पसरली आहे.

बेझे धरणाच्या लगत उत्तम चव्हाण यांच्याकडे पाहुणे म्हणून आलेले एकाच कुटुंबातील तीन सदस्य धरणाच्या परिसरात फिरण्यासाठी गेले होते. यादरम्यान, पोहण्यासाठी हे तिघेही धरणाच्या पाण्यात उतरले. मात्र पाण्याचा अंदाज न आल्याने बुडून मृत्यू झाला.

पान ८ वर

महाराष्ट्रातील जनता असली भाषा खपवून घेणार नाही!

सतेज पाटलांचा मंत्री चंद्रकांत पाटलांना कडक इशारा

प्रतिनिधी
■ कोल्हापूर

सरकारी यंत्रणेचा गैरवापर करून तुम्हाला उद्ध्वस्त करतो, संपवतो, अशी भाषा माझ्यासमोर करू नका. कोल्हापूरच्या जनतेलाही अशी भाषा आवडणार नाही आणि महाराष्ट्रातील जनता हे खपवून घेणार नाही. तुमच्या पुण्यापासून घोसरवाडपर्यंतच्या काचेच्या महालाबद्दल मला बोलायला लावू नका. मीसुद्धा पाटील आहे, असा सज्जड इशारा काँग्रेसचे आमदार सतेज पाटील यांनी मंत्री चंद्रकांत पाटील यांना दिला. तसेच, लढायचेच असेल तर २०२९



मध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील दहा विधानसभा मतदारसंघांपैकी कुठेही एकमेकांविरोधात लढूया, असे खुले आव्हानही त्यांनी दिले.

गोकुळ दूध संघाच्या निवडणुकीवरून सुरू असलेल्या वादाला आता राजकीय संघर्षाचे स्वरूप आले आहे. गोकुळमध्ये चार स्वीकृत संचालकांना मतदानाचा अधिकार देण्यासाठी मंत्री चंद्रकांत पाटील आणि मंत्री हसन मुश्रीफ यांनी दबाव आणल्याचा आरोप सतेज पाटील यांनी केला. आता ही लढाई अंगलट येत असल्याने चंद्रकांत पाटील या प्रकरणात मुख्यमंत्र्यांना ओढत असल्याची टीकाही त्यांनी केली. सोमवारी गोकुळच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीवेळी बाहेर महायुतीच्या सभेत चंद्रकांत पाटील यांनी केलेल्या वक्तव्यांना आणि टीकेला सतेज पाटील यांनी पत्रकार परिषदेत जोरदार प्रत्युत्तर दिले.

पान ८ वर

पाकिस्तानचा अमेरिकेला जोरदार झटका, विमानाच्या लँडिंगला परवानगी नाकारली



■ वॉशिंग्टन

इराणी नागरिकांना डिपोर्ट करण्याच्या अमेरिकेच्या प्रयत्नांना जबरदस्त झटका बसला आहे. ९ इराणी नागरिकांना घेऊन जाणाऱ्या अमेरिकेच्या डिपोर्टेशन फ्लाईटला मंगळवारी सकाळी रस्त्यातूनच माघारी परतावं लागलं. अमेरिकेचं विमान इराणी नागरिकांना घेऊन पाकिस्तानात उतरणार होतं. तिथून ९ इराणी नागरिकांना रस्ते मार्गानं मायदेशी धाडलं जाणार होतं. पण पाकिस्तानने इराणी नागरिकांना आपल्या भूमीवर उतरू देण्यास अचानक नकार दिला. त्यामुळे अमेरिकेच्या विमानाला माघारी फिरावं लागलं. त्यानंतर हे विमान ऍरिजोनाच्या मेसामध्ये उतरलं.

या विमानातील सर्व इराणी नागरिकांना ऍरिजोनामधून डिपोर्ट केलं जात होतं. त्यांना आधी पाकिस्तानात उतरवण्यात येणार होतं. तिथून त्यांना इराणला पाठवलं जाणार होतं. पण पाकिस्तानने ऐनवेळी अचानक नकार दिल्याने अमेरिकेचं विमान माघारी फिरलं. काही तासांनी विमान ऍरिजोनात उतरलं. त्यानंतर इराणी नागरिकांना पुन्हा एकदा इमिग्रेशन डिटेंशन सेंटरमध्ये पाठवण्यात आलं.

पाकिस्तानी परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रवक्त्यांनी या सगळ्या प्रकरणावर भाष्य करण्यास नकार दिला. पाकमार्गे अफगाणिस्तानला पाठवण्यात येणाऱ्यांच्या डिपोर्टेशनची व्यवस्था करण्यावर विचार सुरू असल्याचं याआधी परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते सज्जाद हैदर खान यांनी म्हटलं होतं.

या गोंधळामुळे अमेरिकन प्रशासनाच्या डिपोर्टेशन योजनेवर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. ट्रम्प प्रशासन इराण आणि अफगाणिस्तानच्या नागरिकांना डिपोर्ट करण्यासाठी पाकिस्तानचा वापर ट्रान्झिट पॉईंट म्हणून करण्याची योजना आखत आहे. त्यानुसार अमेरिकेतून हकालपट्टी केलेल्या लोकांना आधी पाकिस्तानला पाठवण्यात येईल

पान ८ वर

कुर्ल्यात सहा महिन्यांत पवार कुटुंबातील दुसरी हत्या

संतप्त नातेवाइकांचे पोलीस ठाण्यासमोर ठिय्या आंदोलन

प्रतिनिधी
■ मुंबई

कुर्ल्यातील हलाव पूल परिसरात बुधवारी भरदिवसा गोळीबार करून विनोद मल्लप्पा पवार (वय ४०) यांची हत्या करण्यात आली. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून, सहा महिन्यांच्या कालावधीत पवार कुटुंबातील ही दुसरी हत्या असल्याने खळबळ अधिकच वाढली आहे. या घटनेच्या निषेधार्थ संतप्त पवार कुटुंबीयांनी विनोबा भावे नगर पोलीस ठाण्यासमोर ठिय्या आंदोलन केले. यावेळी पोलीस ठाण्यात आणलेल्या संशयित आरोपीला मारहाण करण्याचाही प्रयत्न झाला. दरम्यान, या हत्येचा छडा लावण्यासाठी पोलिसांनी



१२ तपास पथके तयार केली आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, कुर्ल्यातील हलाव पूल परिसरातील सार्वजनिक शौचालयाजवळ बुधवारी विनोद पवार आले होते. यावेळी दोन अज्ञात हल्लेखोरांनी त्यांच्यावर गोळीबार केला. आरोपींनी त्यांच्यावर तीन राऊंड गोळ्या झाडल्या. या हल्ल्यात विनोद गंभीर जखमी झाले. त्यांना तातडीने कुर्ला येथील भाभा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

या हत्येमागे पवार कुटुंबातील अंतर्गत वाद असल्याचा प्राथमिक संशय व्यक्त केला जात आहे. कुर्ल्यातील माकडवाला कंपाउंड परिसरात राहणाऱ्या पवार कुटुंबात दोन गट असून, त्यांच्यात गेल्या अनेक वर्षांपासून वर्चस्ववरून संघर्ष सुरू असल्याची माहिती समोर आली आहे. याच वादातून सहा महिन्यांपूर्वी विनोद पवार यांचे मोठे बंधू बाबा पवार यांचीही गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती. आता विनोद पवार यांचाही गोळीबारात मृत्यू झाल्याने एकाच कुटुंबातील दोन भावांची हत्या झाल्याची घटना चर्चेचा विषय ठरली आहे.

एकाच कुटुंबातील दोन भावांची हत्या झाल्याने पवार कुटुंबीयांचा संताप अनावर झाला. विनोद पवार यांच्या हत्येप्रकरणी आरोपींना तातडीने अटक करून न्याय मिळावा, या मागणीसाठी कुटुंबीयांनी

पान ८ वर

२ वृत्तमानस
पालघर, मुंबई
मुंबई, गुरुवार, १२ नोव्हेंबर २०२६

डहाणू तालुक्यात बिबट्याची दहशत, चिंचणीमध्ये बिबट्याला केले जेरबंद

पालघर : डहाणू तालुका आणि लगतच्या किनारपट्टी भागात गेल्या काही महिन्यांपासून बिबट्याचा मानवी वस्त्यांमधील वावर वाढल्याने नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे. दोन दिवसापूर्वी चिंचणी येथील एका वाडीमध्ये वासराला मारल्यानंतर वनविभागाने रसलेल्या सापळ्यामध्ये बिबट्याला पकडण्यास यश आले आहे. डहाणू तालुक्यातील आसनगाव येथे शेतात काम करणाऱ्या महिलेचा बिबट्याच्या हल्ल्यात मृत्यू झाल्याची घटना ताजी असतानाच विविध गावांमध्ये बिबट्या मुक्तपणे फिरत असल्याचे समोर आल्याने संपूर्ण तालुक्यात घबराटीचे वातावरण पसरले आहे.डहाणू तालुक्यातील चिंचणी, ब्राह्मण आळी आणि आसपासच्या परिसरात रात्रीच्या वेळी बिबट्या उघडपणे फिरताना स्थानिकांना दिसून आला आहे. तसेच तणाशी, बावडा परिसरात बिबट्याने लहान वासरे, शेळ्या-बकऱ्या आणि कोंबड्यांवर हल्ले करून फडशा पाडला आहे. किनारपट्टी भागातील वाढवण , वरोर , चिंचणी , वासगाव , तणाशी , बावडे या गावांमध्ये बिबट्याच्या नियमित हालचाली आढळल्याने स्थानिक शेतकरी आणि ग्रामस्थांमध्ये तीव्र भीती पसरली आहे.



थोडक्यात

दिवाळीत फूड डिलिव्हरी ऑर्डर्समध्ये 10.7 टक्क्यांची वाढ

मुंबई: दिवाळी सणादरम्यान फूड डिलिव्हरी प्लॅटफॉर्म स्विगीच्या फूड ऑर्डर्समध्ये वार्षिक आधारावर १०.७ टक्क्यांची वाढ झाली आहे. ६ ते ८ नोव्हेंबर या तीन दिवसांच्या दिवाळी विकेंडला कंपनीने दर तासाला सरासरी ९७,५४५ ऑर्डर्स पूर्ण केल्या आहेत. सणासुदीच्या काळात घरीच कुटुंबासोबत जेवणाचा आस्वाद घेण्याकडे आणि ऑनलाइन मिठाई मागवण्याकडे ग्राहकांचा मोठा कल दिसून आला.यंदा मिठाईमध्ये काजू कतली सर्वाधिक लोकप्रिय असल्याचे समोर आले.गेल्या वर्षीच्या (१८ ते २० ऑक्टोबर २०२५) दिवाळीच्या तुलनेत यंदा ६ ते ८ नोव्हेंबर २०२६ दरम्यान ऑर्डर्समध्ये १०.७ टक्क्यांनी वाढ नोंदवली गेली. तीन दिवसांत दर तासाला सुमारे ९७,५४५ ऑर्डर्स वितरित करण्यात आल्या. देशभरात मसाला डोसा, काजू कतली आणि पनीर बटर मसाला या पदार्थांना सर्वाधिक पसंती मिळाली. याशिवाय लहान शहरांमध्ये आणि उदयोन्मुख बाजारपेठांमध्ये अप्पम आणि सामोसा हे पदार्थ टॉप १० मध्ये राहिले आहेत. दिवाळीत मिठाईमध्ये काजू कतली सर्वाधिक लोकप्रिय ठरली, तर त्याखालोखाल मोतीचूर लाडू, रसगुल्ला आणि गुलाबजाम यांना मोठी मागणी होती.

मुंबईतील कुकची महिन्याची कमाई 1.05 लाख रुपये

मुंबई: मुंबईतील एका कुकच्या कमाईची आणि आर्थिक नियोजनाची सध्या सोशल मीडियावर चर्चा सुरू आहे. वेगवेगळ्या ठिकाणी स्वयंपाकाची कामं करून हा कुक महिन्याला सुमारे १ लाख ५ हजार रुपये कमावतो. विशेष म्हणजे, वयाच्या ३४ व्या वर्षी तो पहिल्यांदाच परदेशवारीला जाण्याची तयारी करत आहे. त्यासाठी त्याने थायलंडची निवड केली असून, हा त्याचा पहिला विमानप्रवास असणार आहे. मनुराज गर्ग यांनी लिंक्डइनवर शेअर केलेल्या पोस्टमुळे या कुकच्या कमाईची आणि आर्थिक परिस्थितीची चर्चा रंगली आहे. याबद्दलचे सविस्तर वृत्त एका मोठ्या इंग्रजी दैनिकाने दिले आहे.मनुराज गर्ग यांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांच्या घरी दिवसातून दोन वेळा स्वयंपाक करण्यासाठी हा कुक महिन्याला १८ हजार रुपये घेतो. त्याच इमारतीतील दुसऱ्या एका फ्लॅटमध्ये स्वयंपाक करण्यासाठी त्याला १६ हजार ५०० रुपये मिळतात. तर त्या परिसरातील एका मोठ्या कुटुंबासाठी स्वयंपाकासह स्वयंपाकघरातील इतर जबाबदाऱ्या सांभाळण्याच्या कामाचे त्याला ३८ हजार रुपये मिळतात. याशिवाय, चित्रपटांच्या शूटिंगदरम्यान शुक्रवारी रात्रीच्या शिफ्टमध्ये तो केटरिंगची कामंही करतो. शूटिंगच्या ठिकाणी संपूर्ण टीमसाठी जेवण तयार करण्याच्या प्रत्येक कामासाठी त्याला ७ हजार ५०० रुपये मिळतात. या सर्व कामांमधून त्याची महिन्याची कमाई सुमारे १ लाख ५ हजार रुपये होते. त्याच्या पत्नीचे मासिक उत्पन्न ४५ हजार रुपये असल्याने दोघांचे मिळून घराचे उत्पन्न जवळपास दीड लाख रुपये होते.

महत्त्वपूर्ण निवेदन

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तीबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान व हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.ला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्याच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी वाचकांनी आवश्यकती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

बापाणे पुलावर 'बर्निंग कार', वाहतूक पोलिसांच्या सतर्कतेने अनर्थ टळला!

प्रतिनिधी
■ वसई

मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील बापाणे पुलावर मंगळवारी सायंकाळी धावत्या कारला अचानक आग लागल्याने एकच खळबळ उडाली. गुजरातच्या दिशेने जाणाऱ्या कारने सायंकाळी सव्वासातच्या सुमारास पेट घेतला. मात्र, चालकाने प्रसंगावधान राखत वेळीच कारबाहेर पडल्याने त्याचा जीव वाचला. दरम्यान, चिंचोटी वाहतूक पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत आग आटोक्यात आणल्याने संभाव्य मोठी दुर्घटना टळली.

मंगळवारी सायंकाळी महामार्गावर वाहनांची वर्दळ सुरू असतानाच बापाणे पुलावर एका





कारमधून अचानक आगीच्या ज्वाळा बाहेर पडू लागल्या. काही क्षणांतच आगीने रौद्ररूप धारण केल्याने परिसरात घबराट पसरली. कारचालकाने परिस्थितीचे गांभीर्य ओळखून तत्काळ वाहनाबाहेर पडत स्वतःचा जीव वाचवला. भर महामार्गावर कार पेटल्याने इतर वाहनचालकांमध्येही भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

या घटनेची माहिती मिळताच चिंचोटी वाहतूक चौकीचे प्रभारी पोलीस उपनिरीक्षक एकनाथ नलावडे यांनी आपल्या सहकाऱ्यांसह घटनास्थळी धाव घेतली. कारला लागलेली आग वाढत असल्याचे पाहून पोलिसांनी महामार्गावरून जाणारा पाण्याचा टँकर थांबवला. त्यानंतर टँकरमधील पाण्याच्या साहाय्याने आग विझविण्याचे प्रयत्न सुरू केले. पोलिसांच्या तत्परतेमुळे काही वेळातच आगीवर नियंत्रण मिळविण्यात यश आले.दरम्यान, या घटनेमुळे महामार्गावरील वाहतूक काही काळ मंदावली होती. मात्र, वाहतूक पोलिसांनी परिस्थिती हाताळत वाहनांना मार्ग मोकळा करून दिल्याने वाहतूक पुन्हा सुरळीत झाली. कारला नेमकी आग कशामुळे लागली, याचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. मात्र, चालकाचे प्रसंगावधान आणि चिंचोटी वाहतूक पोलिसांनी दाखविलेल्या सतर्कतेमुळे मोठा अनर्थ टळला. पोलीस उपनिरीक्षक एकनाथ नलावडे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केलेल्या तत्पर मदतीचे वाहनचालकांकडून कौतुक होत आहे.

ढोल-ताशांच्या गजरात नालासोपाऱ्यात दिवाळी पाडवा महोत्सव उत्साहात!

प्रतिनिधी
■ वसई

दिवाळी पाडव्याच्या निमित्ताने नालासोपारा पूर्वेकडील आचोळे गावात आयोजित करण्यात आलेला भव्य ढोल-ताशा महोत्सव मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात पार पडला. आचोळे तलावाजवळील विठ्ठल मंदिर परिसरात झालेल्या या महोत्सवात तब्बल ४०० ते ५०० ढोल-ताशा वादक आणि लेझीम पथकांनी सहभाग घेतला. ढोल-ताशांचा दणदणाट आणि लेझीमच्या तालावर संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. या महोत्सवाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.



नालासोपारात अशा प्रकारच्या भव्य दिवाळी पाडवा ढोल-ताशा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. पारंपरिक वाद्यांच्या गजरात दिवाळी पाडव्याचा सण साजरा करण्यात आल्याने परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. विविध ढोल-ताशा आणि लेझीम पथकांनी सादर केलेल्या आकर्षक प्रात्यक्षिकांनी उपस्थित नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. या महोत्सवाच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या पारंपरिक संस्कृतीचे दर्शन घडले.

दरम्यान, महोत्सवाचे नियोजन शिस्तबद्ध पद्धतीने करण्यात आले होते. आयोजक, कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिकांच्या सहकार्यामुळे कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला. अशा सांस्कृतिक उपक्रमांमुळे तरुण पिढीला पारंपरिक कला आणि संस्कृतीची ओळख होण्यास मदत होत असल्याची भावना उपस्थितांमधून व्यक्त करण्यात आली.या महोत्सवाला मिळालेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद समाधानकारक असल्याचे वसई -विरार शहर महानगरपालिकेचे माजी महापौर रुपेश जाधव यांनी सांगितले. तसेच महोत्सव यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेणारे ढोल-ताशा व लेझीम पथकांचे सदस्य, आयोजक, कार्यकर्ते, स्थानिक नागरिक आणि उपस्थित मान्यवरांचे त्यांनी आभार मानले.

ज्येष्ठ नागरिक संघांना मिळणार 2 लाखांपर्यंत पालिकेकडून अनुदान

■ वसई

ज्येष्ठ नागरिक संघांना आर्थिक सहाय्य मिळावे यासाठी, वसई विरार महापालिकेकडून ज्येष्ठ नागरिक संघ अनुदान योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेसाठी अर्ज प्रक्रिया सुरू झाली असून त्यासाठी डिसेंबरपर्यंत मुदत देण्यात आली आहे. महानगरपालिका कार्यक्षेत्रातील ज्येष्ठ नागरिकांना सामाजिक सहभाग, आरोग्य, सांस्कृतिक प्रोत्साहन, मानसिक स्वास्थ्य व कल्याणासाठी ज्येष्ठ नागरिकांना कल्याणकारी आवश्यक उपक्रम राबविता येऊन त्यांना त्यांचे जीवनमान उंचावता यावे यासाठी वसई विरार महापालिकेमार्फत ज्येष्ठ नागरिक संघ अनुदान योजना सुरु करण्यात आली आहे. नुकत्याच पार पडलेल्या महासभेत या योजनेला मंजुरी देण्यात आली असून या योजनेमधून वसई विरार शहरातील ज्येष्ठ नागरिक संघांना वार्षिक अनुदान देण्यात येणार आहे.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी महापालिका कार्यक्षेत्रातील ज्येष्ठ नागरिक संघांनी या योजनेचा अर्ज भरून व त्यासोबत आवश्यक ती कागदपत्र जोडून सामाजिक न्याय व समाजकल्याण विभाग येथे १ डिसेंबर २०२६ पर्यंत जमा करणे आवश्यक आहे. या योजनेचे अर्ज महापालिकेच्या vvcmc.in या अधिकृत संकेतस्थळावर तसेच सामाजिक न्याय व समाजकल्याण विभाग या ठिकाणी उपलब्ध करण्यात आलेला आहे. तसेच या योजनेची सर्व माहिती, कार्यपद्धती महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली असल्याची माहिती पालिकेकडून देण्यात आली आहे.

आवश्यक कागदपत्रे: १. संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत,२. संस्थेचे पॅन कार्ड साक्षांकित प्रत ३. बँक पासबुकची साक्षांकित प्रत,४. सभासदांची सदस्य यादी,५. मागील तीन वर्षांचा ऑडिट रिपोर्ट,६. मागील वर्षाच्या सामाजिक/सांस्कृतिक उपक्रमांचा अहवाल व छायाचित्र ७. विहित नमुन्यातील अर्ज.

वसईतील ज्येष्ठ नेते स्व. शिरीष जयराम चव्हाण यांच्या स्मरणार्थ सर्वपक्षीय श्रद्धांजली सभेचे आयोजन

प्रतिनिधी
■ वसई

वसई तालुक्यातील ज्येष्ठ सामाजिक-राजकीय नेते, शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख आणि माजी नगरसेवक स्व. शिरीष जयराम चव्हाण (दादा) यांचे बुधवार ४ नोव्हेंबर २०२६ रोजी निधन झाले. त्यांच्या अकाली निधनाने वसईच्या सामाजिक, राजकीय, क्रीडा, सहकार, शिक्षण व सांस्कृतिक क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली असून, सर्व स्तरातून शोक व्यक्त होत आहे.

सन १९८५ पासून वसईच्या सामाजिक आणि राजकीय पटलावर सतत सक्रिय राहिल्यामुळे स्व. शिरीषदादांचा तालुक्यातील विविध व्यक्ती, मंडळे, संस्था व संघटनांशी अत्यंत निकटचा संबंध आला होता. त्यांच्या याच लोकसंग्रहाची व कार्याची आठवण करून त्यांना आदरांजली वाहण्यासाठी रविवार १५ नोव्हेंबर २०२६ रोजी एका विशेष सर्वपक्षीय श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले आहे.

नालासोपाऱ्यातील तुळींज रोडवरील के. एम. पी. डी. शाळा येथील स्व. नाना पाटील रंगायन सभागृहात संध्याकाळी ५ ते ७ या वेळेत ही श्रद्धांजली सभा पार पडणार आहे. या शोकसभेत तालुक्यातील सर्व राजकीय पक्ष, सामाजिक, शैक्षणिक, सहकार, क्रीडा आणि सांस्कृतिक संस्थांच्या वतीने दिवंगत शिरीषदादांच्या स्मृतींना उजाळा देत त्यांना आदरांजली अर्पण केली जाणार आहे. या श्रद्धांजली सभेस तालुक्यातील सर्व नागरिकांनी, कार्यकर्त्यांनी व विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहावे, अशी विनंती शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) - पालघर जिल्ह्याच्या वतीने करण्यात आली आहे.

भारतीय विद्यार्थ्यांची परदेशी शिक्षणाकडे पाठ

मुंबई: परदेशातील शिक्षणासाठी वाढणारा खर्च, विद्यार्थी व्हिसा आणि स्थलांतरविषयक नियमांमधील बदल, विविध देशांतील भू-राजकीय अस्थिरता तसेच परदेशी विद्यापीठांनी भारतात सुरू केलेले शैक्षणिक अभ्यासक्रम या घटत्या संख्येमागील प्रमुख कारणे ठरत आहेत. त्यामुळे परदेशातील विद्यापीठांमध्ये प्रवेश घेण्याऐवजी भारतातील शैक्षणिक संस्थांना पसंती देणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण वाढत आहे.केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने संसदेत सादर केलेल्या आकडेवारीनुसार, २०२३ मध्ये उच्च शिक्षणासाठी परदेशात गेलेल्या भारतीय विद्यार्थ्यांची संख्या ९ लाख ८ हजार होती. २०२४ मध्ये ही संख्या घटून ७ लाख ७० हजार झाली.२०२५ मध्ये आणखी घट नोंदवली गेली असून, परदेशात जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ६ लाख २६ हजारांवर आली आहे. दोन वर्षांच्या कालावधीत २ लाख ८२ हजार विद्यार्थ्यांची घट झाली आहे.

वसई-विरारचा 'तिसरा डोळा' बंद; नागरिकांची सुरक्षा वाऱ्यावर!

प्रतिनिधी
■ वसई

वसई-विरार शहरातील नागरिकांच्या सुरक्षेसाठी प्रमुख चौक आणि रस्त्यांवर बसविण्यात आलेले अनेक सीसीटीव्ही कॅमेरे देखभाल आणि दुरुस्तीअभावी बंद पडले आहेत. गुन्हेगारीवर नजर ठेवण्यासाठी उभारण्यात आलेली ही यंत्रणाच कुचकामी ठरत असल्याने शहराच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. विशेष म्हणजे, अनेक ठिकाणची वाहतूक सिग्नल यंत्रणाही बंद असल्याने नागरिकांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे शहरातील सीसीटीव्ही आणि सिग्नल यंत्रणेच्या देखभालीकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याबद्दल नाराजी व्यक्त केली जात आहे.

वसई-विरार शहरात चोरी, घरफोडी, मारामारी तसेच इतर गुन्हेगारी घटनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी पालिका, पोलीस प्रशासन आणि सामाजिक संघटनांच्या पुढाकारातून विविध ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. या कॅमेऱ्यांमुळे संशयितांच्या हालचाली टिपणे तसेच गुन्ह्यांच्या तपासासाठी महत्त्वाचे पुरावे मिळविणे पोलिसांना शक्य होत होते. अनेक गुन्ह्यांची उकल करण्यासाठी सीसीटीव्ही फुटेजची मोठी मदत झाली होती. मात्र, आता शहरातील अनेक कॅमेरे बंद असल्याने गुन्ह्यांच्या तपासात अडथळे निर्माण होण्याची शक्यता आहे.

शहरातील वर्दळीचे रस्ते, प्रमुख नाके आणि चौकांमध्ये बसविण्यात आलेल्या काही कॅमेऱ्यांची अवस्था दयनीय झाली आहे. नियमित देखभाल होत नसल्याने काही कॅमेरे धूळखात पडले आहेत. गुन्हेगारी घटना घडल्यानंतर पोलिसांना सर्वप्रथम परिसरातील सीसीटीव्ही फुटेजचा आधार घ्यावा लागतो. मात्र, कॅमेरेच बंद असल्यास संशयितांचा शोध घेणे अधिक कठीण होऊ शकते. त्यामुळे गुन्हेगारांवर नजर ठेवण्यासाठी बसविलेली यंत्रणाच बंद पडल्याने तिच्या उपयोगावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

दरम्यान, शहरातील अनेक प्रमुख चौकांमधील वाहतूक सिग्नलची अवस्थाही वेगळी नाही. महानगरपालिकेने बसविलेली सिग्नल यंत्रणा अनेक ठिकाणी बंद असल्याने वाहनचालकांकडून वाहतुकीच्या नियमांचे सर्रास उल्लंघन होत असल्याचे दिसून येत आहे. काही वाहनचालक चुकीच्या दिशेने वाहने चालवत असल्याने चौकांमध्ये वाहतुकीचा गोंधळ उडत आहे. परिणामी, वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत असून विद्यार्थी, नोकरदार आणि सर्वसामान्य नागरिकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे.

एकीकडे शहराचा विस्तार झपाट्याने होत असताना दुसरीकडे नागरिकांच्या सुरक्षेसाठी उभारलेल्या यंत्रणांची देखभाल करण्याकडे दुर्लक्ष होत असल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित होत आहेत. सीसीटीव्ही कॅमेरे आणि वाहतूक सिग्नल बसविण्यावर खर्च करण्यात आला असताना त्यांच्या देखभालीची जबाबदारी नेमकी कोणाची, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. महानगरपालिका आणि पोलीस प्रशासनाने संयुक्तपणे बंद पडलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची तपासणी करून ते तातडीने कार्यान्वित करावेत. तसेच बंद सिग्नल यंत्रणाही सुरू करून वाहतुकीला शिस्त लावावी, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरू लागली आहे.

मोखाड्यात गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी शेतकऱ्यांसोबत साजरी केली दिवाळी

प्रतिनिधी
■ मोखाडा

राज्यातील शेतकरी दुष्काळाच्या संकटाचा सामना करत असताना गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी रविवारी पालघर जिल्ह्यातील मोखाडा तालुक्यातील हट्टीपाडा गावात शेतकरी आणि आदिवासी बांधवांसोबत दिवाळी साजरी केली. ग्रामस्थ पांडुरंग भिका शिद यांच्या कुटुंबासह आदिवासी परंपरेनुसार विधिवत पूजा करून त्यांनी गावकऱ्यांना दीपावलीच्या शुभेच्छा दिल्या.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आवाहनानुसार शिवसैनिकांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांच्या सुख-दुःखात सहभागी व्हावे, या भावनेतून हा उपक्रम राबविण्यात आल्याचे योगेश कदम यांनी सांगितले. यावेळी त्यांनी शेतकरी आणि ग्रामस्थांशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. शासनाकडून दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदत केली जात असून, यापुढेही त्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी पाठपुरावा सुरू ठेवण्याची ग्वाही त्यांनी दिली. यावेळी त्यांनी लहान मुलांसोबत फराळाचा आनंद घेतला. आदिवासी बांधवांसोबत निसर्गाच्या सान्निध्यात दिवाळी साजरी करण्याचा अनुभव अविस्मरणीय असल्याचे सांगत महायुती सरकार बळीराजाच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.



महाराष्ट्र एसटी कामगार संघटना पालघर विभागातर्फे दीपावली सण उत्साहात साजरा

तीस वर्षांची सर्वधर्मसमभावाची परंपरा कायम; कामगारांनी एकत्र येत फराळाचा घेतला आस्वाद

प्रतिनिधी
■ वसई

महाराष्ट्र एसटी कामगार संघटना पालघर विभागाच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही दीपावली सणाच्या शुभेच्छा देण्याचा कार्यक्रम युनियन कार्यालय, वसई येथे मोठ्या उत्साहात व आनंदी वातावरणात पार पडला.महाराष्ट्र एसटी कामगार संघटना पालघर विभाग गेल्या तीस वर्षांपासून दीपावली, ख्रिसमस, रमजान ईद आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती हे चारही सण एकत्रितपणे साजरे करीत आहे. हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन आणि बौद्ध या सर्व धर्मांच्या बांधवांनी एकत्र येऊन परस्परांच्या सणांमध्ये सहभागी व्हावे, एकमेकांना शुभेच्छा द्याव्यात आणि सामाजिक ऐक्य व सर्वधर्मसमभावाची भावना अधिक दृढ करावी, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे.

विशेष म्हणजे एसटी कामगारांची कुटुंबे बहुतांश वेळा त्यांच्या मूळ गावी असल्यामुळे स्थानिक कामगार आपल्या घरून सणानिमित्त तयार केलेले गोडधोड पदार्थ आणि फराळ घेऊन येतात.





रमजान ईदच्या दिवशी मुस्लिम बांधवांकडून शीरखुर्मा, ख्रिसमसच्या दिवशी ख्रिश्चन बांधवांकडून केक, दीपावलीच्या वेळी हिंदू बांधवांकडून विविध गोडधोड पदार्थ, तर बौद्ध बांधवांकडून त्यांच्या घरातील खास पदार्थ आणले जातात. सर्व कामगार एकत्र येऊन या पदार्थांचा सामूहिक आस्वाद घेतात. एकमेकांना सणाच्या शुभेच्छा देतात, गाणी गातात आणि आनंदाचे क्षण साजरे करतात.अशा या आगळ्यावेगळ्या सामाजिक आणि सांस्कृतिक परंपरेचा एक भाग म्हणून आज दिनांक ९ नोव्हेंबर २०२६ रोजी दीपावली शुभेच्छा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला वसई आगाराचे अध्यक्ष सुनील डिसोजा, सचिव विजय आत्राम, नालासोपारा आगाराचे अध्यक्ष उद्धव ढाकणे, सचिव दिलीप जाधव, विभागीय खजिनदार सचिन पाटील यांच्यासह मुकेश वंजारी, अन्वर शेख, फ्रान्सिस घोन्सालविस, के. एम. राठोड, मुकेश साखरे, सुधीर चौधरी, गायकर, दत्ता चव्हाण, अरुण काशीद, प्रदीप जाधव, जॉनी अलमेडा, घोसाळकर, श्रीमती शोभा घोन्सालविस, श्रीमती कविता जाधव, सौ. इंदिरा राठोड, बांगर आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी उपस्थित कार्यकर्त्यांनी दीपावलीच्या शुभेच्छापर मनोगते व्यक्त केली. विभागीय अध्यक्ष भरत पेंढारी यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना संघटनेच्या गेल्या तीस वर्षांपासून सुरू असलेल्या सर्वधर्मसमभावाच्या या उपक्रमाचे महत्त्व विशद केले. सण हे केवळ आनंद साजरा करण्याचे माध्यम नसून माणसामाणसांमधील प्रेम, बंधुभाव, आपुलकी आणि सामाजिक एकात्मता वाढविण्याचे प्रभावी माध्यम आहे, असे त्यांनी सांगितले. तसेच सर्व कामगारांना दीपावली व नवीन वर्षाच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमात फ्रान्सिस घोन्सालविस यांनी दीपावलीच्या निमित्ताने सुंदर गीत सादर करून उपस्थितांची मने जिंकली. त्यानंतर सर्व कार्यकर्त्यांनी आपापल्या घरून आणलेला फराळ एकत्र करून त्याचा सामूहिक आस्वाद घेतला. हास्यविनोद, गप्पागोष्टी आणि आनंदी वातावरणात हा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

धर्म वेगळे असले तरी माणुसकीचे नाते एकच, सण वेगवेगळे असले तरी आनंद मात्र सर्वांचा एकच, हीच भावना गेली तीस वर्षे जपणाऱ्या महाराष्ट्र एसटी कामगार संघटना पालघर विभागाच्या या उपक्रमातून खऱ्या अर्थाने राष्ट्रीय एकात्मता, सामाजिक बंधुभाव आणि सर्वधर्मसमभावाचा सुंदर संदेश समाजापर्यंत पोहोचत आहे.

हातातच फुटला स्काय शॉर्ट फटाका

हाताला ७२ टाके

वसई: दिवाळीच्या उत्साहात फटाके फोडताना होणारा निष्काळजीपणा किती महागात पडू शकतो, याचे एक धक्कादायक उदाहरण वसई-विरारमधून समोर आले आहे. सोशल मीडियावर रील बनवण्याच्या नादात २१ वर्षीय तरुण हातात फटाके फोडताना गंभीर स्वरुपात जखमी झाला असून त्याच्या हाताला तब्बल ७२ टाके पडले आहेत. विनीतकुमार असे या जखमी तरुणाचे नाव आहे. विनीत हा लेबर कॉन्ट्रॅक्टर असून तो मधुबन बिल्डिंग परिसरात काम करतो. दिवाळी असल्याने सोशल मीडियासाठी एक अनोखी रील बनवण्याच्या उद्देशाने त्याने आकाशात उडणारा 'स्काय शॉर्ट' फटाका थेट हातात धरून पेटवण्याचा प्रयत्न केला. मात्र, दुर्दैवाने फटाका आकाशात झेपावण्याऐवजी थेट त्याच्याच हातात फुटला. या भीषण स्फोटात त्याचा हात गंभीररीत्या भाजला असून हाताला मोठ्या प्रमाणात दुखापत झाली आहे. घटनेनंतर घाबरलेल्या कुटुंबीयांनी त्याला उपचारासाठी तातडीने रुग्णालयात हलवले. मात्र, सुरुवातीला दोन रुग्णालयांनी उपचारासाठी नकार दिल्यामुळे अखेर त्याला वसई पश्चिमेतील आप्पासाहेब थोरात रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथील डॉक्टरांनी तब्बल चार ते पाच तास अथक मेहनत घेऊन शस्त्रक्रिया पार पाडली.

जाहीर नोटीस

सूचना याद्वारे देण्यात येते की, सदर फ्लैट क्र. सी/०२, तळ मजला, करिता श्री. अशोक भिवा कांबळे यांच्या लेक व्ह्यु को.ऑ.हौ.सो.लि., लोढा मार्ग, आचोळे रोड, नालासोपारा (पुर्व) ता. वसई, जि. पालघर, सर्व क्र. २०३ (१६९), हिस्सा न. २, अचोळे, नालासोपारा पुर्व, ता. वसई, जिल्हा पालघर- ४०१२०९ लेक व्ह्यु को.ऑ.हौ.सो.लि., द्वारे जारी घर वाटप पत्र दिनाक ३०.११.१९९२, हे हरवले/ त्याचा तपास लागत नसल्याचे कळविण्यात आले आहे. प्रतिलिपी साठी घर वाटप पत्र अर्ज प्राप्त झाला आहे. कोणाही व्यक्तीची हरवलेल्या ऐवजी प्रतिलिपी घर वाटप पत्र जारी करण्यासाठी कोणतीही हरकत किंवा दावा असल्यास सदर सुचना प्रसिध्दी तारेखपासून १५ (पंधरा) दिवसांत त्याची लेखी हरकत सादर करणे आवश्यक आहे. विहित कालावधीत कोणतीही तक्रार प्राप्त न झाल्यास हरवलेल्या / तपास लागल नसलेल्या प्रमाणपत्र ऐवजी प्रतिलिपी प्रमाणपत्र जारी करण्यात येईल.

सही/-
नील रतन राय
वकील

Printed and Published by **Bhushan B.Mhatre** for Owner **Marik Media And Communication Pvt .Ltd.** at S.R.Publicatiinns ,Mohan Arjun Compound ,Godown No. 8,9 And 10 , Near Ghartan Pada ,Vaishali Nagar ,Last Bus Stop ,Dahisar (E) ,Mumbai -400068 and Published From Marik Media And Communication Pvt .Ltd.,102, Shyam Sunder Sadan ,Sitaram Jadhav Marg, Lower Parel ,Mumbai 400013. Editor - **Deepak B. Mhatre**, E-mail vruttmanas1@ gmail.com ,telephone 2498546,24985609. Executive Editor - **Surendra Mulik,** Resident Editor - **Sham Deulkar**

As per PRB Act Editorial Responsibilities On Deepak B. Mhatre Nespaper Related Desputes Lies Under Jurisdiction of Mumbai Courts

Year - Thirty One
Issu - 143
R.N.I. Registration No. - 65609/96

मुद्रक आणि प्रकाशक **भूषण भा. म्हात्रे** यांनी मालक **मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.** साठी, एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडाऊन नं. ८,९ आणि १०, घारटन पाडाजवळ, वैशालीनगर लास्ट बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८ येथे छापून मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि., १०२, श्याम सुंदर सदन, सीताराम जाधव मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ येथून प्रकाशित केले. संपादक - **दीपक भा. म्हात्रे,** E-mail: vrittamanas1@gmail.com दूरध्वनी क्रमांक - २४९८५४६, २४९८५६०९, कार्यकारी संपादक - **सुरेंद्र मुळीक,** निवासी संपादक - **शाम देऊलकर**

पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी दीपक भा. म्हात्रे यांच्यावर राहील. सदर वृत्तपत्रासंबंधीच्या विवादित बाबी मुंबई न्यायालय क्षेत्रात येतील.

वर्ष- एकतीसावे
अंक - १४३
आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र.- ६५६०९/९६

मुंबई : नवीन वर्षाच्या दिवाळी पाडव्या निमित्ताने आमदार सुनील शिंदे, प्रमोद धुरी,अनील आंगले(संपर्क प्रमुख अमरावती) ,प्रवीण सावंत यांनी मातोश्री, कलानगर येथे जाऊन सौ. रश्मी उध्दव ठाकरेवहीनी यांना शुभेच्छा दिल्या .यावेळी मुलुंड पूर्व उपनगरातील शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आंगले यांनी ठाकरे शिवसेना पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांना शुभेच्छा देत त्यांचे आशीर्वाद या भेटीत घेतले.



महाराष्ट्राच्या शिरपेचात मानाचा तूरा

लाडघर, गुहागर आणि श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यांना 'आंतरराष्ट्रीय ब्ल्यू फ्लॅग'





प्रतिनिधी
■ मुंबई

- महाराष्ट्राच्या शाश्वत किनारपट्टी व्यवस्थापन प्रयत्नांना आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठे यश

महाराष्ट्राच्या शाश्वत किनारपट्टी व्यवस्थापन, पर्यावरण संवर्धन आणि पर्यावरणपूरक पर्यटनाच्या प्रयत्नांना आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठे यश मिळाले आहे. आंतरराष्ट्रीय ब्ल्यू फ्लॅग ज्युरीने महाराष्ट्रातील रत्नागिरी जिल्ह्यातील लाडघर व गुहागर आणि रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन या तीन समुद्रकिनाऱ्यांना प्रथमच प्रतिष्ठेचा 'इंटरनॅशनल ब्ल्यू फ्लॅग' पुरस्कार जाहीर केला आहे. या यशामुळे महाराष्ट्राने आंतरराष्ट्रीय ब्ल्यू फ्लॅग समुद्रकिनाऱ्यांच्या यादीत प्रथमच स्थान मिळवले आहे. पर्यावरण संवर्धन, समुद्रकिनाऱ्यांची स्वच्छता, पाण्याची गुणवत्ता, जैवविविधतेचे संरक्षण, पर्यटकांची सुरक्षितता, आवश्यक पायाभूत सुविधा आणि शाश्वत पर्यटन व्यवस्थापन या आंतरराष्ट्रीय निकषांची पूर्तता केल्याबद्दल या समुद्रकिनाऱ्यांना हा सन्मान प्राप्त झाला आहे.या महत्त्वपूर्ण यशामागे राज्य शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, पर्यटन विभाग, संबंधित जिल्हाधिकारी व जिल्हा प्रशासन, स्थानिक स्वराज्य संस्था, ग्रामपंचायती, बीच मॅनेजमेंट कमिटी तसेच स्थानिक नागरिक आणि विविध यंत्रणांचे समन्वित प्रयत्न महत्त्वपूर्ण ठरले आहेत. पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या वतीने या यशाबद्दल आनंद व्यक्त करण्यात आला असून, महाराष्ट्राच्या विस्तीर्ण किनारपट्टीवरील इतर पात्र समुद्रकिनाऱ्यांचाही आंतरराष्ट्रीय दर्जानुसार विकास करण्यासाठी ब्ल्यू फ्लॅग कार्यक्रमाचा उपयोग करण्यात येणार आहे.

यामुळे किनारपट्टीवरील पर्यावरण संरक्षणासोबतच स्थानिक रोजगार, पर्यटन व्यवसाय आणि अर्थव्यवस्थेला चालना मिळण्यास मदत होईल.

केईएम रुग्णालयातील अस्थिव्यंगोपचार केंद्राचा उद्वाहन वस्तुस्थितीचा अहवाल दहा दिवसात द्या !

अतिरिक्तलिका आयुक्त (शहर) यांचे आदेश

प्रतिनिधी
■ मुंबई



राजे एडवर्ड स्मारक (के. ई. एम.) रुग्णालयाच्या अस्थिव्यंगोपचार केंद्रातील लिफ्ट बंद असल्याबाबत विविध प्रसारमाध्यमांमध्ये बातम्या प्रसारित झाल्या आहेत. या वृत्तांच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाने याची गंभीर नोंद घेतली असून रुग्णाची वैद्यकीय स्थिती तसेच लिफ्ट बदलण्याच्या कामकाजाची संपूर्ण चौकशी करण्यासाठी उपायुक्त (सार्वजनिक आरोग्य) यांच्या स्तरावर एक समिती गठीत केली असून येत्या दहा दिवसांत वस्तुस्थिती अहवाल सादर करण्याचे आदेश अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) यांनी दिले आहेत. या समवेतच भविष्यात अशा स्वरूपाच्या घटना घडू नये यासाठी प्रमाणित कार्यपद्धती ((STANDARD OPERATING PROCEDURE - SOP) निश्चित करण्याचे आदेशही देण्यात आले आहेत.

अस्थिव्यंगोपचार केंद्रातील जुनी लिफ्ट ही ३९ वर्षांची आहे. ही लिफ्ट बदलण्यासाठी अस्थिव्यंगोपचार विभागातील रुग्णसेवा, विशेषतः स्वतः चालू न शकणाऱ्या रुग्णांची पर्यायी व्यवस्था तसेच त्यांच्या सुरक्षित स्थलांतराशी संबंधित व्यावहारिक अडचणींमुळे प्रत्यक्ष काम सुरू होण्यास विलंब झाला. लिफ्टचे वाढते वयोमान, सातत्याने होणारी झीज आणि त्यामुळे संभाव्य अपघाताचा धोका लक्षात घेऊन रुग्णालय प्रशासनाने लिफ्टची तातडीने बदली करण्याची कार्यवाही सुरू केली आहे. जुनी लिफ्ट बदलण्याचे काम तसेच लिफ्टच्या शाफ्टमधील आवश्यक दुरुस्तीची कामे केईएम रुग्णालयाच्या स्थापत्य अभियांत्रिकी विभागामार्फत करण्यात येत आहे.

या कालावधीत रुग्णांची गैरसोय टाळण्यासाठी अस्थिव्यंगोपचार विभागप्रमुखांनी परिपत्रक निर्गमित केले होते. जे रुग्ण स्वतःहून चालू शकत नाहीत अशा रुग्णांना अस्थिव्यंगोपचार केंद्राच्या इमारतीत दाखल न करता केवळ रुग्णालयाच्या बहुमजली इमारतीमध्ये दाखल करण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत.

प्रसारमाध्यमांमध्ये प्रसारित झालेल्या रुग्णाबाबत स्पष्ट करण्यात येते की, त्यांच्यावर मे २०२६ मध्ये शस्त्रक्रिया करण्यात आली होती. त्यानंतर मागील दोन महिन्यांपासून ते वॉकरच्या साहाय्याने चालू शकत आहेत. शरीरात बसविण्यात आलेले प्रत्यारोपण साहित्य (इम्प्लांट) काढण्यासाठी त्यांना पुन्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले व ९ नोव्हेंबर २०२६ रोजी त्यांच्यावर संबंधित शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या करण्यात आली. शस्त्रक्रियेनंतर वैद्यकीय निकषांनुसार व रुग्णालयाच्या प्रचलित कार्यप्रणालीनुसार सदर रुग्ण घरी सोडण्यास पात्र होते. तथापि, नातेवाइकांच्या विनंतीवरून मानवतावादी दृष्टिकोनातून त्यांचा रुग्णालयातील मुक्काम पुढे सुरू ठेवण्यात आला. मात्र, त्यांना अस्थिव्यंगोपचार केंद्रात ठेवणे ही बाब परिपत्रकातील निर्देशांची अवहेलना असल्याचे निदर्शनास आले आहे.

महसूलवाढीसाठी राणीबागेच्या प्रवेश शुल्क वाढीचाही प्रस्ताव?

प्रतिनिधी
■ मुंबई

बृहन्मुंबई महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी पालिका प्रशासनांने महसूल वाढविण्यासाठी ज्या काही उपाय योजना केल्या आहेत त्यात भायखळा येथील वीरमाता जिजाबाई भोसले वनस्पती उद्यान व प्राणिसंग्रहालयाची, अर्थात राणीबागेची प्रवेश फी वाढविण्याचाही प्रस्ताव असल्याचे बोलले जात आहे. राणी बागेची आता बरीच सुधारणा झाल्यामुळे तिथे येणाऱ्या पर्यटकांची गर्दीही वाढली आहे. या गर्दीचा फायदा उठविण्यासाठी प्रवेश शुल्क दुपटीने वाढविण्यात येणार आहे.

सन २०२२ ते २०२५ दरम्यान पालिका अस्तित्वात नव्हती या काळात पालिकेची तिजोरी आणि गुटवणूक केलेला अंतर्गत निधी बऱ्यापैकी कमी करण्याचा प्रयत्न झाला. त्यामुळे आता पालिकेचा कारभार हाकण्यासाठी मुंबईकरांवर कराचा बोजा लादून महसूल वाढीचा प्रयत्न सुरू आहे.

सिंहगड तंत्र शिक्षण संस्थेतील कथित आर्थिक गैरव्यवहारांची सीबीआय, ईडी चौकशी

प्रतिनिधी
■ मुंबई

- उच्च न्यायालयाचे महत्त्वपूर्ण आदेश
- 44 शैक्षणिक संस्थांच्या विश्वस्तांची मालमत्ता, बँक खाती गोठवण्याचेही आदेश

शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन तसेच निवृत्तिवेतनाची थकीत रक्कम वर्षानुवर्षे न देणाऱ्या पुणेस्थित सिंहगड तंत्र शिक्षण संस्थेच्या (एसटीईएस) आर्थिक व्यवहारांची केंद्रीय अन्वेषण विभाग (सीबीआय), सक्तवसुली संचालनालय (ईडी) आणि प्राप्तिकर विभागाने चौकशी करण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने मंगळवारी दिले. संस्थेच्या ४४ शैक्षणिक संस्थांचे आर्थिक व्यवहार आणि विश्वस्तांच्या मालमत्तांची चौकशी करण्यासह सर्व बँक खाती आणि गुंतवणुकी गोठवण्याचे आदेशही न्यायालयाने दिले.

याशिवाय, संस्थेचे अध्यक्ष आणि मुख्य विश्वस्त मारुती नवले यांच्यासह आठ विश्वस्तांना अवमानप्रकरणी कारणे दाखवा नोटीस बजावताना, तपास सुरू असेपर्यंत त्यांना पुणे सोडून न जाण्यासही न्यायालयाने मज्जाव केला. त्याचप्रमाणे, दर शुक्रवारी पोलिस ठाण्यात हजेरी लावणेही बंधनकारक केले आहे. न्यायालयाने नवले यांच्यासह अन्य विश्वस्तांना त्यांची पारपत्रे संबंधित यंत्रणेकडे जमा करण्याचे देखील आदेश दिले. शिक्षण विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी वेळीच न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती अद्वैत सेठना यांच्या विशेष खंडपीठाने मंगळवार, १० नोव्हेंबर रोजी विशेष सुनावणी घेऊन उपरोक्त आदेश दिले. या प्रकरणी सुमारे २२० याचिका दाखल करण्यात आल्या असून, कर्मचाऱ्यांचे वेतन आणि निवृत्तीविषयक देणी आठ वर्षांपासून थकीत आहेत. ही रक्कम ४०० कोटी रुपयांपेक्षा अधिक असल्याचे न्यायालयात सांगण्यात आले. सुमारे १३ शिक्षकांनी आर्थिक विवंचनेतून आत्महत्या केल्याचेही नमूद करताना न्यायालयाने त्याबाबत चिंता व्यक्त केली. तसेच, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी संस्थांचा ताबा घेण्याचे आदेशही न्यायालयाने यावेळी दिले. विशेष म्हणजे, न्यायालयाने केवळ वेतन थकबाकीपुरती या प्रकरणाची सुनावणी मर्यादित न ठेवता, कथित आर्थिक गैरव्यवहार, विश्वस्तांची मालमत्ता, शिक्षण विभागाची निष्क्रियता आणि कर्मचाऱ्यांच्या मूलभूत हक्कांचा एकत्रित विचार करून हे आदेश देत असल्याचे आदेशात प्रामुख्याने स्पष्ट केले आहे.

महत्त्वाचे आदेश

विश्वस्तांची मालमत्ता, बँक खाती, गुंतवणूक आणि कंपन्यांमधील समभाग गोठवावे. शाळांचा ताबा घेऊन किंवा विद्यार्थ्यांना अन्य शाळांत सामावून घेऊन शिक्षण सुरू ठेवावे. तांत्रिक संस्थांचा प्रशासकाने ताबा घ्यावा.भविष्य निर्वाह निधी (ईपीएफ) प्राधिकरण आणि धर्मादाय आयुक्तांनीही या प्रकरणी स्वतंत्र चौकशी करावी.पुणे पोलिस आयुक्तांनी प्रलंबित प्राथमिक माहिती अहवालाच्या (एफआयआर) तपासाला गती देऊन प्रगती अहवाल पुढील सुनावणीच्या वेळी सादर करावा. सीबीआय, ईडी आणि प्राप्तिकर विभागाने चौकशीचा प्राथमिक अहवाल १९ नोव्हेंबर रोजी सादर करावा,

फॉरेन ओरिजिनच्या मुद्द्यावर सोनिया गांधींना विरोध केला नसता तर शरद पवार यूपीएच्या काळात पंतप्रधान झाले असते

प्रतिनिधी
■ मुंबई



परदेशी मूळ फॉरेन ओरिजिन असणाऱ्या व्यक्तीला देशाचे प्रधानमंत्री करणे योग्य नाही असा मुद्दा उपस्थित करून सोनिया गांधी यांना प्रधानमंत्री पदासाठी विरोध करीत शरद पवार ;पी ए संगमा आणि तारिक अन्वर यांनी पत्रक काढले होते.या मुद्द्यावर शरद पवार यांनी काँग्रेस मधून बाहेर पडून राष्ट्रवादी काँग्रेस स्थापन केली होती. यूपीए च्या काळात डॉ मनमोहन सिंह यांनी प्रधानमंत्री पदाची दोन टर्म पूर्ण केली. जर शरद पवार यांनी फॉरेन ओरिजिन च्या मुद्द्यावर सोनिया गांधी यांना विरोध केला नसता तर शरद पवार यूपीए च्या काळात प्रधानमंत्री झाले असते. यूपीए च्या काळात प्रधानमंत्री पदाची एक टर्म शरद पवार यांना मिळाली असती असे प्रतिपादन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना रामदास आठवले यांनी आज केले.बांद्रा येथील संविधान निवासस्थानी आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. दीपावली दीपावली पाडवा आणि भाऊबीजेच्या शुभेच्छा ना. रामदास आठवले यांनी देशभरातील जनतेला यावेळी दिल्या .

दीपावली चा आनंद उत्साह साजरा करताना आतषबाजी मुळे काही ठिकाणी आग लागण्याच्या दुर्घटना घडल्या आहेत. याबद्दल काळजी घेऊन सावधगिरी बाळगून दीपावली चे पावन आनंदाचे पर्व साजरे करण्याचे आवाहन करीत ना. रामदास आठवले यांनी दिपावलीच्या शुभेच्छा दिल्या.

दिवाळी निमित्त हिंदू मुस्लिम सर्व धर्मीय एकत्र आनंद साजरा करतात तसेच ईद निमित्त मुस्लिम बांधवांच्या आनंद हिंदू ही सहभागी होतात.मी बौद्ध आहे. मी हिंदू मुस्लिम सर्वांच्या सणासुदीला शुभेच्छा देतो. महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या संविधानातून सर्व धर्म समभाव आणि बंधुत्वाची शिकवण दिलेली आहे. आज ही अनेक दर्ग्यात मुस्लिमांच्या सोबत हिंदू ही मोठ्या प्रमाणात जात असतात.ही एकमेकांच्या धर्माचा आदर आपसातील भाईचारा आणि संविधानाने दिलेल्या सर्वधर्मसमभाव संस्कृतीचे प्रतीक आहे, असे ना. रामदास आठवले म्हणाले.



मुंबई : मातीचा सुवास आणि इतिहासाशी साक्ष! दिवाळीच्या सुट्टीत बाळ मावळ्यांनी साकारले भव्य "किल्ले शिवनेरी" घाटकोपर पूर्व येथील पंतनगर विभागात असलेली शिवनेरी इमारतीच्या आवारात दिवाळीच्या पावन पर्वावर बाल गोपाळांनी चिखल माती आणि दगडाच्या साहाय्याने छत्रपती शिवाजी महाराज यांचे जन्मस्थान असलेले ऐतिहासिक किल्ले शिवनेरी ची हुबेहूब प्रतिकृती साकारली

मुंबईत मंत्री गणेश नाईक यांच्या 'पावनगड' बंगल्याला भीषण आग

- शॉर्टसर्किटमुळे दुर्घटना घडल्याचे स्पष्ट

प्रतिनिधी
■ मुंबई



मुंबईतील मंत्रालयासमोर असलेल्या मंत्री गणेश नाईक यांच्या 'पावनगड' या शासकीय बंगल्याला दुपारी अचानक भीषण आग लागली. आग लागल्याचे पाहताच तेथे उपस्थित असलेल्या कर्मचाऱ्यांची चांगलीच तारांबळ उडाली. मंत्री गणेश नाईक यांचा हा शासकीय बंगला मंत्रालयाच्या अगदी समोर आहे. या बंगल्यातील एअर कंडिशनर (AC) मशीनमध्ये शॉर्ट सर्किट झाल्यामुळे ही आग लागल्याची माहिती महानगरपालिका प्रशासनाने दिली.

ही आग 'लेव्हल वन' क्षमतेची असल्याचेही यावेळी सांगण्यात आले. ज्यावेळी ही घटना घडली, तेव्हा मंत्री गणेश नाईक बंगल्यामध्ये उपस्थित नव्हते. मात्र, या ठिकाणी इतर कर्मचारी होते. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे दोन ते तीन बंब तातडीने घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी ही आग आटोक्यात आणली.महाराष्ट्राच्या मंत्रालयासमोर अनेक मंत्र्यांचे शासकीय बंगले तसेच विविध राजकीय पक्षांची कार्यालये आहेत. मंत्री आदिती तटकरे, मंत्री नितेश राणे, मंत्री सचिन अहिर, मंत्री दादा भुसे अशा अनेक मंत्र्यांचे बंगले आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे), शिवसेना (एकनाथ शिंदे), राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) या प्रमुख पक्षांची कार्यालये देखील याच परिसरात समोर आहेत. अशा राजकीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या परिसरामध्ये अचानक आग लागल्याने एकच खळबळ उडाली होती.

कोणतीही जीवितहानी झालेली नाही

राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांच्या मंत्रालयासमोरील 'पावनगड' या शासकीय बंगल्याला लागलेली आग आता पूर्णपणे आटोक्यात आली आहे. सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. सद्यस्थितीत तेथील परिस्थिती पूर्णपणे नियंत्रणात आहे, असे गणेश नाईक यांच्या कार्यालयाने सांगितले आहे.

घर मुंबईतच हवे,मागणीसाठी

गिरणी कामगारांचे सोमवारी लालबाग-भारतमातावर 'ठिय्या आंदोलन'

प्रतिनिधी
■ मुंबई



'घर' मुंबईतच हवे!या मागणीचा सरकारने प्राधान्याने विचार करावा या मागणीसाठी गिरणी कामगार संयुक्त लढा समितीच्या वतीने सोमवार दि.१६ नोव्हेंबर रोजी दुपारी १ ते संध्याकाळी ५ वा.पर्यंत लालबाग-भारत मातासिनेमा येथे कामगारांचे ठिय्या आंदोलन आयोजित करण्यात आले आहे!

विधान परिषदेचे उपसभापती मा.सचिन अहिर यांच्या अध्यक्षतेखाली बोलावण्यात आलेल्या गृहनिर्माणचे अप्पर सचिव मा.असीम गुप्ता यांच्या सचिवस्तरावरील बैठकीत, मुंबईत बांधलेल्या घरांची सोडत,संक्रमण शिबिरातील घरे, एकत्रीत भूखंडावरील घरांचा ताबा,झोपडपट्टी पुनर्वसनात घरे, गिरण्यांच्या चाळींच्या पुनर्वसनातून घरे इत्यादी अनेक निर्णयातून मुंबईत मोठ्या प्रमाणात घरे निर्माण होण्याची सकारात्मक चर्चा झाली आहे. परंतु सरकारने अचानक १९ ऑक्टोबर रोजीच्या बैठकीत मुंबईचा उल्लेख न करता पात्र गिरणी कामगारांसाठी मुंबई महानगर प्रदेशातील किमान १०० तयार घरे उपलब्ध असलेल्या प्रकल्पातून देण्याचा एकतर्फी निर्णय घेतला आणि याच बैठकीत सरकारने तसा अध्यादेशही जारी केला आहे. मुंबईत घरांसाठी जागा उपलब्ध नाही,असा ऊल्लेख सरकारी अध्यादेशात करण्यात आला ,यावर सोळा कामगार संघटनांच्या परेल येथील बैठकीत नाराजी व्यक्त करण्यात येऊन त्याला नामंजूरी देण्यात आली आहे. सरकारने या निर्णयाचा फेरविचार करून मुंबईत घरे उभारणीला प्राधान्य देऊ! अशी घोषणा करावी,ही मागणी भारतमातावरील ठिय्या आंदोलनात करण्यात येणार आहे.

आंदोलनात निमंत्रक गोविंदराव मोहिते,निवृत्ती देसाई,कॉ.विजय कुलकर्णी,बाळ खवणेकर, हेमंत गोसावी, रमाकांत बने, ऍड.बबन मोरे, आनंद मोरे, हरिनाथ तिवारी,ऍड.अरुण निंबाळकर, हेमंत राऊळ, संतोष सावंत, राजेंद्र साळसकर,भाऊसाहेब आंग्रे,वैशाली गिरकर आदी कामगारनेते आपल्या कार्यकर्त्यांसमवेत आंदोलनात सहभागी होणार आहेत.

दक्षिण मुंबईतील सिमेंट काँक्रिट रस्त्याची कामे रखडलेलीच : झोननिहाय निविदा काढा

नगरसेवक अँड. मकरंद नार्वेकर यांची मागणी

प्रतिनिधी
■ मुंबई

बृहन्मुंबई महानगरपालिकेने रस्ते काँक्रिटीकरण प्रकल्पाच्या तिसऱ्या टप्प्यासाठी पुन्हा एकदा ८,६१४ कोटी रुपयांचे मेगा टेंडर काढले आहे. या प्रकल्पांतर्गत शहर, पूर्व आणि पश्चिम उपनगरांमधील १,२६१ रस्त्यांचे एकूण ३१३ किलोमीटर लांबीपर्यंत काँक्रिटीकरण करण्यात येणार आहे. याशिवाय आणखी १७६ रस्त्यांवरील १३९ किलोमीटर लांबीच्या साइड स्ट्रिप्सची कामेही या प्रकल्पात समाविष्ट आहेत.

मुंबईतील सर्व रस्त्यांचे १०० टक्के काँक्रिटीकरण करण्याच्या पालिकेच्या उद्दिष्ट चांगले आहे. पण, २०२३ पासून सीसी रस्त्यांच्या कामांना होत असलेल्या विलंबामुळे नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्यांबाबत अनेक पत्रे लिहिली आहेत. कंत्राटदारांकडून कामे पूर्ण करण्यात होत असलेले अपयश मी वारंवार निदर्शनास आणून दिले आहे. पुन्हा एकदा मेगा टेंडर काढणे, नवीन कंत्राटदाराची नियुक्ती करणे आणि त्यानंतर त्याच्याकडूनही काम सुरू न होणे, या संपूर्ण प्रक्रियेत बराच वेळ वाया जातो. बीएमसीने सीसी रस्त्यांच्या कामांसाठी झोननिहाय निविदा पद्धतीचा स्वीकार केल्यास ही कामे अधिक वेगाने पूर्ण होण्यास मदत होईल, अशी मागणी करणारे पत्र नगरसेवक अँड. मकरंद नार्वेकर यांनी पालिका आयुक्त अश्विनी भिडे यांना लिहिले आहे. दक्षिण मुंबईतील सीसी रस्त्यांची कामे २०२३ पासून कंत्राटदारांच्या सलग अपयशामुळे रखडली आहेत. यापूर्वीही २०२३ पासून बीएमसीला अनेकवेळा पत्रे लिहून विभाग किंवा झोननिहाय टेंडर काढण्याची मागणी सातत्याने केली आहे.

यापूर्वीच्या मेगा टेंडर पद्धतीअंतर्गत रोडवे सोल्युशन्स इंडिया इन्फ्रा लिमिटेड (RSIIL) या कंत्राटदाराला देण्यात आलेली अनेक कामे सुरू करण्यात अपयश आले. त्यामुळे त्यांचे कंत्राट रद्द करण्यात आले. त्यानंतर NCC LTD या कंपनीची नियुक्ती करण्यात आली. मात्र, संबंधित कंत्राटदाराला कामे पूर्ण करण्यात अडचणी येत असल्याने बीएमसी आता त्या कंत्राटाच्या कामांची व्याप्ती कमी केली आहे. आणि नव्या निविदेत दक्षिण मुंबईतील या रस्त्यांचाही समावेश करण्यात आला आहे, असे नगरसेवक मकरंद नार्वेकर यांनी पत्रात म्हटले आहे.

दक्षिण मुंबईत यापूर्वी यापूर्वी दोनदा झालेल्या अपयशांची पुनरावृत्ती परवडणारी नाही, असे स्पष्ट करताना नार्वेकर यांनी दक्षिण मुंबईतील विशिष्ट शहरी आव्हानांकडे लक्ष वेधले. त्यांच्या मते, शहराच्या इतर भागांमध्ये वापरण्यात येणारी पारंपरिक मेगा टेंडर पद्धत दक्षिण मुंबईसाठी प्रभावी ठरणार नाही. उपनगरांच्या तुलनेत दक्षिण मुंबईची रचना वेगळी आहे. येथे अरुंद रस्ते आणि गल्लीबोळ, वाहनांची तसेच पादचाऱ्यांची मोठी वर्दळ, वारंवार लागू होणारे व्हीआयपी आणि सुरक्षा निर्बंध, यंत्रसामग्री उभी करण्यासाठी तसेच बांधकाम साहित्य साठवण्यासाठी अत्यंत मर्यादित जागा आणि जमिनीखालील विविध सेवावाहिन्यांचे दाट जाळे अशा अनेक समस्या आहेत. या आव्हानात्मक परिस्थितीचा विचार करता, एकाच मोठ्या कंत्राटाऐवजी लहान आणि योग्य नियोजन केलेल्या कामांच्या पॅकेजेसमध्ये प्रकल्पाची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे, असे नगरसेवक मकरंद नार्वेकर यांनी स्पष्ट केले.त्यामुळे रस्त्यांच्या कामांना गती देण्यासाठी आणि पायाभूत सुविधांचा दर्जा उंचावण्यासाठी दक्षिण मुंबईतील रस्त्यांची कामे संबंधित वॉर्ड किंवा विभागांच्या भौगोलिक सीमांनुसार छोट्या पॅकेजेसमध्ये विभागून झोननिहाय निविदा काढाव्यात, अशी मागणी नार्वेकर यांनी केली आहे.

या विकेंद्रित पद्धतीमुळे कामांची अंमलबजावणी जलद होईल, प्रशासकीय जबाबदारी निश्चित करता येईल आणि एखादा कंत्राटदार काम करण्यात अपयशी ठरल्यास तातडीने हस्तक्षेप करणे शक्य होईल, असेही त्यांनी नमूद केले.

'बंधू'ने चित्रपताका महोत्सवाचे उद्घाटन

'गोंधळ' सिनेमाने समारोप

प्रतिनिधी
■ मुंबई

मराठी चित्रपटसृष्टीतील वैविध्यपूर्ण आशय, सर्जनशीलता आणि कलात्मक अभिव्यक्तीचा उत्सव असलेल्या 'चित्रपताका – २०२६' या महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत मराठी चित्रपट महोत्सवाचे उद्घाटन १५ नोव्हेंबर रोजी होणार आहे. अभिनेते उपेंद्र लिमये आणि जितेंद्र जोशी यांच्या प्रमुख भूमिका असलेल्या 'बंधू'ने 'चित्रपताका' महोत्सवाचे उद्घाटन, तर १८ नोव्हेंबरला 'गोंधळ' या भारतातर्फे ऑस्करसाठी अधिकृत प्रवेशिका मिळालेल्या सिनेमाच्या प्रदर्शनाने महोत्सवाची सांगता होणार आहे.

कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)
खुली ई-निविदा आमंत्रण सूचना

उप मुख्य अभियंता (काम), कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड, रत्नागिरी यांचे द्वारे, पात्र कंत्राटदारांकडून आयआरईपीएस पोर्टलद्वारे ई-निविदा प्रक्रियेमार्फत एकल पाकिट बोली प्रणाली अंतर्गत खालील कामासाठी खुली निविदा मागविण्यात येत आहेत: **कामाचे नाव**: डिवाय. सीई/डब्ल्यू/रत्नागिरी सेक्शन अंतर्गत रत्नागिरी स्थानकावरील छत आणि सीवेज लाइनची दुरुस्ती तसेच निवसर स्थानक इमारतीच्या छताची आणि काँक्रीट स्लॅबच्या खालच्या भागाची दुरुस्ती. **निविदा सूचना क्र.: केआर-आरएन-डिवायसीईडब्ल्यू-एमआयएससी-31-2026, दिनांक: 11.11.2026. एकूण अंदाजित खर्च**: रु. 37,28,256.44 (जीएसटी वगळून). **बोली सुरू होण्याची तारीख**: 17.11.2026. **ऑनलाइन प्रस्ताव/बोली सादर करण्याची अंतिम तारीख/वेळ**: 03.12.2026 रोजी 15:00 वाजेपर्यंत. **काम पूर्ण करण्याचा कालावधी**: 4 महिने. मॅन्युअल प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत. तपशील / सहभागासाठी कृपया **https://www.ireps.gov.in** या संकेतस्थळाला भेट द्या. शुद्धिपत्रक / परिशिष्ट केवळ याच संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येतील.

भविष्याची काळजी करु नका,
भविष्य निर्माण करा.



- शंतनुराव किर्लोस्कर
भारतातील अभियांत्रिकी उद्योगविश्वाचे जनक

वृत्तमानस
मुंबई, गुरुवार, १२ नोव्हेंबर २०२६

अंधारच नाही, प्रदूषणही दूर व्हावे !

दिवाळी म्हणजे आनंदाचा, उत्साहाचा, प्रकाशाचा आणि मांगल्याचा सण! अंधारावर प्रकाशाचा, वाईटावर चांगल्याचा आणि निराशेवर आशेचा विजय साजरा करण्याचा हा उत्सव. घराघरांत पणत्या लागतात, रांगोळ्यांनी अंगण सजते, नवे कपडे, फराळाचा सुगंध आणि आप्तेष्टांच्या भेटीगाठींनी मन प्रसन्न होते. मात्र यंदाची दिवाळी महाराष्ट्रातील एका मोठ्या वर्गासाठी आनंदाऐवजी वेदना आणि चिंतेची सावली घेऊन आली. एका बाजूला दुष्काळाच्या झळांनी होरपळलेल्या शेतकऱ्यांच्या घरात दिवाळीचा दिवाही कसाबसा पेटला, तर दुसऱ्या बाजूला मुंबई, ठाण्यासारख्या शहरांमध्ये फटाक्यांच्या आतषबाजीने आकाश धुराने व्यापले. ग्रामीण भागात पावसाअभावी अंधार आणि शहरी भागात अतिउत्साही आतषबाजीमुळे प्रदूषणाचा काळोख, असे परस्परविरोधी चित्र यंदाच्या दिवाळीत महाराष्ट्राने अनुभवले. त्यामुळे ही दिवाळी प्रकाशाचा उत्सव कमी आणि आपल्या सामाजिक, प्रशासकीय व पर्यावरणीय अपयशाचे दर्शन घडवणारी अधिक ठरली. राज्यातील अनेक भागांत पावसाने पाठ फिरवल्याने शेतीचे मोठे नुकसान झाले. पिके करपली, विहिरी आणि तलाव आटले, जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न निर्माण झाला. शेतकऱ्यांच्या हातात उत्पन्न नाही, डोक्यावर कर्जाचा डोंगर आणि भविष्याबाबत अनिश्चितता आहे. अशा परिस्थितीत दिवाळीचा सण साजरा करण्याचा उत्साह तरी कसा असणार? सणासुदीच्या काळात बाजारपेठा गजबजलेल्या असताना दुष्काळग्रस्त गावांतील घरांमध्ये मात्र आर्थिक विवंचनेचे सावट होते. मुलांना नवे कपडे घ्यायचे की बियाण्यासाठी पैसे ठेवायचे, फराळ करायचा की सावकाराचे व्याज फेडायचे, या विवंचनेत शेतकरी सापडला होता. दिवाळीचा आनंद त्याच्यासाठी केवळ दुसऱ्यांच्या घरात दिसणारा प्रकाश बनून राहिला. शेतात राबणाऱ्या हातांना दिवाळीतही विश्रांती मिळाली नाही, कारण उद्याच्या जगण्याची चिंता त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती. सरकारकडून दुष्काळग्रस्तांना मदतीच्या घोषणा झाल्या, उपाययोजनांचे आश्वासन मिळाले; परंतु प्रत्यक्ष मदत वेळेत आणि पुरेशा प्रमाणात पोहोचते का, हा प्रश्न कायम आहे. पंचनामे होतात, याद्या तयार होतात, फायली फिरतात, पण शेतकऱ्याच्या हातात मदत पोहोचेपर्यंत दिवाळी संपून जाते. संकटाच्या काळात शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहणे ही सरकारची जबाबदारी आहे. केवळ पंचनामे, घोषणा आणि कागदी मदतीने शेतकऱ्यांची दिवाळी उजळणार नाही. मदत ही वेळेवर, पारदर्शक आणि पुरेशी असली पाहिजे. पाणी, चारा, कर्जात सवलत, वीजबिलात दिलासा या गोष्टी दिवाळीपूर्वीच मिळायला हव्या होत्या. घोषणा आणि प्रत्यक्ष कृती यातील अंतर हेच शेतकऱ्यांच्या नाराजीचे मूळ कारण आहे. शेतकऱ्याला सहानुभूती नको, तर ठोस आधार हवा आहे. दुसरीकडे मुंबई, ठाण्यासारख्या महानगरांमध्ये दिवाळीच्या नावाखाली फटाक्यांची प्रचंड आतषबाजी करण्यात आली. आधीच वाहनांची वर्दळ, बांधकामांमधून निर्माण होणारी धूळ, औद्योगिक उत्सर्जन आणि वाढते शहरीकरण यामुळे प्रदूषणाच्या विळख्यात अडकलेल्या शहरांच्या हवेत फटाक्यांनी आणखी विषारी भर घातली. विशेषतः लक्ष्मीपूजनाच्या दिवशी फटाक्यांच्या अतिवापरामुळे हवेच्या गुणवत्तेवर गंभीर परिणाम झाल्याचे चित्र समोर आले. सकाळी उठल्यावरही धुराचा थर कायम होता. डोळे जळजळणे, घसा खवखवणे, श्वास घेण्यास त्रास होणे या तक्रारी वाढल्या. दिवाळीचा आनंद साजरा करण्याच्या नादात आपण श्वास घेण्यासाठी आवश्यक असलेल्या शुद्ध हवेलाच धोक्यात घालत आहोत, याचे भान नागरिकांना राहिले नाही. काही मिनिटांच्या आतषबाजीसाठी आपण पुढील कित्येक दिवसांची हवा विषारी करतो, हे किती भयावह आहे. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, दमा आणि हृदयविकाराचे रुग्ण यांना याचा सर्वात जास्त त्रास झाला. हवेच्या वाढत्या प्रदूषणाची गंभीर दखल घेत उच्च न्यायालयाने फटाके फोडण्याबाबत कडक निर्बंध आणि वेळेच्या मर्यादा घालून दिल्या होत्या. या निर्देशांमागे कोणाच्याही सणाच्या आनंदावर पाणी फेरण्याचा उद्देश नव्हता, तर नागरिकांचे आरोग्य, लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, श्वसनविकारांनी त्रस्त असलेले रुग्ण आणि पर्यावरणाचे संरक्षण हा त्यामागील मुख्य हेतू होता. मात्र न्यायालयाच्या आदेशांनाही अनेकांनी केराची टोपली दाखवली. वेळेची मर्यादा पाळली गेली नाही. बंदी असलेले फटाकेही सर्रास फोडण्यात आले. प्रश्न केवळ फटाके फोडणाऱ्यांचा नाही, तर हे नियम प्रभावीपणे राबवण्यात अपयशी ठरलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांचाही आहे. न्यायालयाने निर्देश दिले, प्रशासनाने नियम जाहीर केले; पण त्यांची अंमलबजावणी करण्याची वेळ आली तेव्हा यंत्रणेची इच्छाशक्ती कुठे हरवली? पोलीस, महापालिका यांच्या समन्वयाचा अभाव स्पष्टपणे दिसला. नियम केवळ कागदावर राहिले, तर त्याला अर्थ काय? या प्रदूषणाच्या प्रश्नावर अभिनेत्री दिया मिर्झा यांनीही व्हिडिओच्या माध्यमातून सोशल मीडियावर चिंता व्यक्त केली. पर्यावरणाविषयी जागरूकता निर्माण करण्याचा त्यांचा प्रयत्न होता. मात्र त्यांच्या भूमिकेला सकारात्मक प्रतिसाद देण्याऐवजी मुंबईच्या महापौरांनी त्यांची खिल्ली उडवण्याचा प्रयत्न केल्याचे समोर आले. लोकप्रतिनिधींची भूमिका ही नागरिकांच्या पर्यावरणविषयक चिंतेला प्रोत्साहन देणारी असायला हवी. एखाद्या अभिनेत्रीने प्रदूषणाबाबत आवाज उठवला म्हणून तिची खिल्ली उडवणे हा प्रश्नाच्या गांभीर्यापासून पळ काढण्याचा प्रकार आहे. पर्यावरणाचा प्रश्न हा कोणत्याही राजकीय पक्षाचा, व्यक्तीचा किंवा प्रसिद्धीचा विषय नसून तो प्रत्येकाच्या जगण्याशी संबंधित आहे. त्यामुळे या विषयावर टीका-टिप्पणी करण्यापेक्षा प्रदूषण कमी करण्यासाठी कृती करणे अधिक महत्त्वाचे आहे. लोकप्रतिनिधींनीच जर पर्यावरणाच्या मुद्द्याला हलक्यात घेतले, तर सामान्य नागरिकांकडून काय अपेक्षा करायची? ही वृत्तीच समाजाला मागे नेणारी आहे. खरे तर न्यायालयाचे आदेश पाळणे ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नाही, तर नागरिकांचेही कर्तव्य आहे. कायद्याची भीती असेल तेव्हाच नियम पाळायचे आणि प्रशासनाचे लक्ष नसेल तेव्हा मनमानी करायची, ही मानसिकता बदलण्याची गरज आहे. आपण ज्या हवेत श्वास घेतो, त्याच हवेत आपल्या मुलांनीही श्वास घ्यायचा आहे. फटाक्यांचा काही मिनिटांचा आनंद आणि त्यातून निर्माण होणाऱ्या प्रदूषणाचे दीर्घकालीन दुष्परिणाम यांची तुलना केली, तर हा आनंद किती महागात पडतो, हे सहज लक्षात येईल. सण साजरा करण्यासाठी पर्यावरणाची किंमत मोजण्याची गरज नाही. दिवे, पणत्या, रांगोळ्या, कुटुंबीयांसोबतचा आनंद आणि सामाजिक बांधिलकी यातूनही दिवाळी तितकीच उत्साहात साजरी होऊ शकते. खरे तर खरी दिवाळी ही प्रकाशात आहे, धुरात नाही. हा विचार प्रत्येक घरात रुजला पाहिजे. यंदाच्या दिवाळीने सरकार आणि समाज या दोघांनाही आत्मपरीक्षण करण्याची संधी दिली आहे. एका बाजूला दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देण्यात सरकारी यंत्रणा अपुरी पडताना दिसते, तर दुसऱ्या बाजूला शहरांमधील प्रदूषण नियंत्रणासाठी न्यायालयाचे निर्देश असूनही त्यांची प्रभावी अंमलबजावणी होत नाही. ग्रामीण भागातील पाणीटंचाई, शेतकऱ्यांचे आर्थिक संकट आणि शहरी भागातील प्रदूषण या समस्या वेगवेगळ्या वाटत असल्या, तरी त्यांचे मूळ निसर्गाशी बिघडलेल्या मानवी संबंधांत आहे. निसर्गाचा ऱ्हास करून विकास साधण्याच्या हव्यासातूनच आज ही परिस्थिती निर्माण झाली आहे. झाडांची बेसुमार तोड, सिमेंटच्या जंगलांचा विस्तार, पाण्याचा अमर्याद वापर, नद्यांचे प्रदूषण आणि नैसर्गिक साधनसंपत्तीचा अविचारी उपभोग यामुळे पर्यावरणाचा समतोल ढासळत आहे. त्यामुळे केवळ सरकारला दोष देऊन चालणार नाही. सरकारने पर्यावरणपूरक धोरणांची काटेकोर अंमलबजावणी करावी, स्थानिक स्वराज्य संस्थांनी प्रदूषण नियंत्रणासाठी जबाबदारीने काम करावे आणि नागरिकांनीही आपल्या दैनंदिन वर्तनात बदल घडवून आणावा. झाडे तोडण्याऐवजी नव्या झाडांची लागवड करणे, लावलेल्या रोपांचे जतन करणे, पाण्याचा काटकसरीने वापर करणे आणि प्रदूषण रोखण्यासाठी वैयक्तिक पातळीवर प्रयत्न करणे, ही काळाची गरज आहे. शाळा, महाविद्यालये, गृहनिर्माण संस्था यातून पर्यावरणपूरक दिवाळीचा संदेश गेला पाहिजे. फटाकेमुक्त, प्रदूषणमुक्त दिवाळी ही संकल्पना केवळ घोषणेत न राहता कृतीत उतरली पाहिजे. दिवाळीचा खरा अर्थ केवळ घराघरांत दिवे लावणे नसून समाजातील अंधार दूर करणे हा आहे. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या घरात समाधानाचा दिवा पेटला पाहिजे आणि शहरांतील प्रत्येक नागरिकाला शुद्ध हवा मिळाली पाहिजे. सरकारने शेतकऱ्यांना वेळेत मदत देण्याची, पाण्याचे नियोजन करण्याची आणि पर्यावरण संरक्षणाची जबाबदारी पार पाडली पाहिजे. नागरिकांनीही न्यायालयाच्या निर्देशांचा आदर करून स्वतःवर स्वयंशिस्तीचे निर्बंध घालून घेतले पाहिजेत. यंदाचा पाडवा दुष्काळ आणि प्रदूषणाच्या संकटाच्या सावटाखाली गेला. मात्र पुढील पाडवा गोड व्हायचा असेल, तर आजपासूनच बदलाची सुरुवात करावी लागेल. निसर्गाला जपले तरच निसर्ग आपल्याला जगवेल, हे विसरून चालणार नाही. पुढील दिवाळीत शेतकऱ्यांच्या शेतात हिरवीगार पिके डोलावीत, धरणे आणि विहिरी पाण्याने भराव्यात, शहरांतील हवा स्वच्छ असावी आणि प्रत्येक घरात आनंदाचा प्रकाश असावा. त्यासाठी सरकारने कर्तव्य बजावावे आणि जनतेनेही जबाबदारी स्वीकारावी. अन्यथा दिवाळीच्या रोषणाईत आपण आपल्या भविष्याचा अंधार अधिक गडद करत राहू. दिवाळीचा खरा प्रकाश फटाक्यांच्या धुरात नाही तर निसर्गाच्या संवर्धनात आणि प्रत्येकाच्या चेहऱ्यावर उमटणाऱ्या समाधानाच्या हास्यात आहे. तो प्रकाश टिकवणे हेच खरे दिवाळीचे व्रत ठरावे.

विलीनीकरणाची ढक्कलगाडी...!

अजितदादांच्या निधनानंतर विलीनीकरणाची चर्चा सध्या एका महत्वाच्या टप्प्यावर विसंगत भूमिका आणि अंतर्गत विरोधामुळे अडकली आहे. अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर दोन्ही राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाच्या चर्चा सुरू झाल्या होत्या. दोन्ही राष्ट्रवादीचे विलीनीकरण हे अजित दादांचे स्वप्न होतं असं राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून ठणकावून सांगण्यात येत होतं, तर दुसरीकडे अजित पवार गटांकडून 'असं असतं तर अजित पवार यांनी आम्हाला सांगितलं असतं' असं म्हणत एकप्रकारे विलीनीकरणास विरोध दर्शवण्यात आला होता.



अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर सुनेत्रा पवार यांनी पक्षाच्या कारभाराची धुरा सांभाळली. मधल्या काळात सुनेत्रा पवार आणि सुप्रिया सुळे यांच्यातील वक्तव्यांनीही विलीनीकरणाच्या बऱ्याच चर्चा रंगल्या. अगदी काल परवा शरद पवार यांची प्रकृती खालवल्याने राष्ट्रवादी अजित पवार गटाचे ज्येष्ठ नेते प्रफुल्ल पटेल यांनी त्यांची ब्रीचकँडी हॉस्पीटलमध्ये भेट घेतली आणि त्याचे फोटो सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाले. दोन्ही राष्ट्रवादीचे नेते एकत्र, म्हणजेच विलीनीकरण या ठरलेल्या समीकरणानुसार पुन्हा विलीनकरणाची ढक्कलगाडी चर्चेच्या वळणावर आली.

राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांची प्रकृती खालवल्याने त्यांच्यावर सुरुवातील पुण्यातील रुबी हॉल क्लिनिक रुग्णालयात उपचार करण्यात आले. अस्वस्थ वाटू लागल्याने त्यांना दुसऱ्या दिवशी पुन्हा मुंबईतील ब्रीट कँडी रुग्णालयात विविध तपासणीसाठी दाखल करण्यात आले. ब्रीच कँडी रुग्णालयात आदानी, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, प्रफुल्ल पटेल यांनी शरद पवार यांची भेट घेतली. ज्यामध्ये सर्वाधिक चर्चेचा विषय ठरला तो प्रफुल्ल पटेल यांच्या भेटीचा. कारण ही तसंच, त्यांच्या भेटीचा हृद्यस्पर्शी फोटो सोशल माध्यमांवर प्रचंड व्हायरल झाला आणि पुन्हा विलीनीकरणाच्या चर्चेचे वादळ उठले.

शरद पवार यांचं राजकरण कोणाला कळत नाही, हे ठरलेलं वाक्य राज्याच्या राजकारणात शरद पवार यांचा दबदबा कायम असल्याची साक्ष देत राहतं. अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर दोन्ही राष्ट्रवादीकडून विलीनीकरणावर अनेक वेळा भाष्य करण्यात आलं पण मधल्या काळात शरद पवार यांनी ' कोणाला आमच्यात यायचं असेलं तर या, आम्ही कुठे जाणार नाहीत' एका वाक्यात विलीनीकरणावर पडदा टाकला होता. त्यानंतर सुनेत्रा पवार आणि सुप्रिया सुळे यांच्या पारिवारीक वक्तव्याने विलीनीकरणाच्या चर्चांना फुंकार घातली. राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार नेहमी भाजपवर निशाना साधताना सुनेत्रा काकी आणि पार्थ पवार यांना राजकीय अनुभव कमी असल्याचं उल्लेख करत त्याचा गैरफायदा पक्षातीलच काही लोक घेत असल्याचा उल्लेख करतात. म्हणजेच त्यांचा रोख कोणाकडे? हे लपून राहिलेलं नाही.

नवनाथ येवले

अजितदादांच्या निधनानंतर विलीनीकरणाबाबत ' तसं असतं तर अजित दादांनी आम्हाला सांगितलं असतं' असं म्हणणारे पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांचं घुमजाव बरच काही सांगून जातं. ' अजित दादा असते तर दोन्ही पक्ष एक दिसले असते ' असं सुनिल तटकरे म्हणतात तेव्हा मात्र,सहाजीकच विलीनीकरणाची ढक्कलगाडी चर्चेच्या वळणावर येऊन ठेपणार!

दोन्ही राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांची विलीनीकरणाची ईच्छा असली तरी वरिष्ठ नेत्यांची वक्तव्य मात्र याला अपवाद ठरत असल्याचे सध्याचे चित्र आहे. दोन्ही राष्ट्रवादीचे विलीनीकरण होवून शरद पवार राजकीय सन्यास घेणार, दोन्ही राष्ट्रवादी विलीनीकरणाद्वारे महायुती सरकारमध्ये सहभागी होणार आणि पुन्हा पक्षाची धुरा शरद पवार यांच्याकडे सोपवली जाणार!. त्याचबरोबर मोदींचे नेतृत्व मान्य नसलेल्या राष्ट्रवादी (शरद पवार) पक्ष आता मोदींचं नेतृत्व मान्य करणार का? विलीनीकरणाच्या टप्प्याला असे अनेक कंगोरे आहेत.

या सगळ्या घडामोडीत आमदार रोहित पवार यांची सावध भूमिका महत्वाची ठरते. मधल्या काळात आमदार रोहित पवार काँग्रेसमध्ये जाणार अशीही चर्चा होती. मात्र रोहित पवार यांनी याचं खंडन करत पक्षाची भूमिका सक्षमपणे निभावली आताही तेवढ्याच जोमाने निभावत आहेत.

आजारी असताना शरद पवार यांना पंतप्रधान नरेंद्र मोदींचा फोन विलीनीकरणाला खतपाणी घालणार ठरला. विलीनीकरण होवून राष्ट्रवादी पक्ष एनडीए सोबत सत्तेत सहभागी झाला तर शरद पवार पक्षाला केंद्रात मंत्रीपद, राज्यातही वजनदार खाती मिळणार आणि राज्यातील पक्षाची धुरा पुन्हा शरद पवार यांच्याकडे राहील असा तर्क सध्या लावला जातोय. विविध आंदोलनांच्या माध्यमातून विरोधी पक्षाची धुरा सांभाळणारे आमदार रोहित पवार पक्षासोबत सत्तेत सहभागी होणार? का, आपल्या कणखर आणि तेवढ्यात आक्रमक विरोधी भूमिकेसाठी पर्याय निवडणार?. दुसरीकडे विलीनीकरण मंत्रीपद गमावलेले राष्ट्रवादी अजित पवार पक्षाचे आमदार धनंजय मुंडे यांच्या पथ्यावर पडणार का? ते ही सत्तेत राहण्यासाठी भाजपची वाट धरणार?. या अनेक तर्क वितर्कापुढे दोन्ही राष्ट्रवादीतील काही नेत्यांसाठी विलीनीकरण सध्यातरी सुप आणि जात ठरतयं हे नक्कीच म्हणावं लागेल.

जय पवार यांच्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीवर भाष्य करत 'भाजपने काका आणि पुतन्यात भांडण लावून अजित दादा आणि शरद पवार यांना वेगळं केलं, आणि आता पार्थ आणि जय यांच्यात राजकीय वितुष्ठ निर्माण करून त्यांना वेगळं करण्याचं षडयंत्र रचल्या जात असल्याचा आरोप रोहित पवार यांनी केला. त्याचबरोबर नाव न घेता सुनेत्रा काकी आणि पार्थ पवार यांना राजकीय अनुभव कमी असल्याचा गैर फायदा घेवून राष्ट्रवादी (अजित पवार) तील काही नेते पक्षाची कमांड स्वत:कडे खेचण्याचा प्रयत्न करत असल्याचंही रोहित पवार म्हणाले. रोहित पवार यांच्या वक्तव्यात विलीनीकरणाचा 'व' नसला तरी राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाच्या नेतृत्वाला सुचक इशारा आहे. रोहित पवार यांच्या या वक्तव्याचा अर्थ सोईनुसार काढला तर सत्तेचा त्याग करून राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाने पुन्हा शरद पवार यांच्या नेतृत्वात यावं असाच निघतो म्हटलं, तर राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षातील नेते सत्तेचा त्याग करू शकत नाहीत ही काळ्या दगडावरील पांढरी रेघ आहे. त्याची दुसरी बाजू पाहिली तर विलीकरणाच्या माध्यमातून एनडीए सोबत सत्तेत सहभागी होणं रोहित पवार यांना पचनी पडणार काय, तर याचं उत्तर तुर्तास तरी नाही म्हणावं लागेल.

राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाच्या शिष्टमंडळाने केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची नुकतीच दिल्लीत भेट घेतली. ज्यामध्ये मंत्रीपदाचा राजीनामा दिलेले आमदार धनंज मुंडे यांचाही समावेश होता. पक्षाकडून ही भेट पूर्वनियोजीत होती, अजितदादांनंतर अर्थ खातं पक्षाकडे असायला हवं होत; ते अद्यापर्यंत मिळालेलं नाही, शिवाय अजित दादांच्या निधनानंतर काही प्रलंबीत कामांसाठी दस्तुखुद्द उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनीच या भेटीसाठी वेळ मागितला होता, असं स्पष्टीकरण देण्यात आलं. मात्र रोहित पवार यांनी या भेटीमागे वरील आरोप करत शिष्टमंडळातील एका खासदाराला राज्यात फायनान्स मिनिस्टर होयचं आहे, दुसऱ्याचं मंत्रीपद आपल्या कर्माने गेलं त्याला ही तिथं राज्यात मंत्रीपद मिळवायचं आहे. शिवाय बरेच सिनियर आहेत त्यांना अद्याप मंत्रिपद मिळालेलं नाही ते मंत्रिपदाच्या प्रतिक्षेत आहेत असं म्हणत प्रामुख्याने रोख असलेल्या नेत्यांवरील आरोप विस्तारीत करताना रोहित पवार यांनी राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षातील अंतर्गत धुसफूसील फुंकर दिली.

त्यातच शरद पवार यांची प्रकृती खालवल्याने त्यांना ब्रीच कँन्डी रुग्णालया पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा फोन आणि प्रफुल्ल पटेल यांची भेटी तिथपासून प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांच्या घुमजाव वक्तव्याने विलीनीकरणाची ढक्कलगाडी पुन्हा चर्चेच्या वळणावर आली असली, तरी प्रत्यक्षात विलीनीकरण बाबत दोन्ही राष्ट्रवादीची भूमिकाच महत्वाची असणार हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

पत्र मानस

राजापूर तालुक्यातील शिरसे - बाधे सागरी बंदर विकसित करावे

रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर तालुक्यातील शिरसे - बाधे बंदर प्राचीन आहे.मुंबईतून सागरी मार्गाने बोटीने प्रवासी वाहतूक सेवा सुरू होती तेव्हा या बंदरातून प्रवासी ये - जा करीत होते.सदरचे बंदर सागवे ग्रुप ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रात आहे. सागरी मार्गाने प्रवासी वाहतूक सेवा सुरू होती तेव्हा प्रवासी विजयदुर्ग बंदरात येऊन पुढे शिरसे - बाधे येथे येत असत.येथे त्या काळची (जेटी)बंदर आणि धर्मशाळा आहे.शिरसे - बाधे ते विजयदुर्ग रस्ता मार्गे अंतर ३५ किलोमीटर आहे. शासनाने कोकण पर्यटनाचा विचार केला तर येथून रो - रो प्रवाशी वाहतूक सेवा सुरू केली तर पर्यटनाला चालना मिळेल.रस्ता मार्गे प्रवास करण्यासाठी लागणारा पैसा व वेळ वाचेल.दोन्ही ठिकांच्या शेतकरी आणि हापूस आंबा शेतकरी यांना वाहतूक सेवा सुरू केल्याने चांगला फायदा होईल. यास्तव, शासनाच्या सागरी बंदर मंत्रालयाने याची नोंद घेऊन बंदर विकसित करावे अशी मागणी स्थानिकांनी ग्रामस्थ करीत आहेत.

- महादेव गोळवसकर, मुंबई

NCMC कार्ड अप्लाय ऑनलाईन का नाही ?

NCMC हे एक 'प्रीपेड स्मार्ट कार्ड' आहे. हे कार्ड केवळ एसटी प्रवासासाठीच नाही तर देशभरातील मेट्रो, बेस्ट बसेस, रेल्वे प्रवासासाठी वापरता येते. या मुळे ज्यांना सवलतीच्या तिकिटात प्रवास करणे आहे उदा. महिला , जेष्ठ नागरिक , दिव्यांग बांधव यांच्या साठी हे कार्ड म्हणजे जणू पर्वणीच ठरले आहे. MSRTC कडून वेळोवेळी सूचना संबंधित कार्ड काढण्यासाठी देऊन झाल्या. त्या अनुषंगाने आता जर का NCMC कार्ड नसेल तर सवलतीत ला प्रवास महिला , जेष्ठ नागरिक , दिव्यांग बांधव यांना करता येणे शक्य नाही त्या करता त्यांना पूर्ण तिकीट काढूनच प्रवास करावा लागेल. एकीकडे डिजिटल भारत , डिजिटल राज्य प्रशासन म्हणून वलग्ना करणारे प्रशासनाचा एक भाग म्हणजे महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळ (MSRTC) हे अजून पर्यंत बहुतांश डिजिटल झाले नसल्याचे दिसून येते. NCMC कार्ड जरी सर्व एस टी आगारात मिळत असले तरी एसटी डेपो हा गावाखेडयात बऱ्याच ठिकाणी लांब असतो. त्यात अनेकदा लाईट जाणे , नेटवर्क च्या अडचणी येणे हे प्रकार काही नवीन नाहीत. NCMC कार्ड काढण्यासाठी प्रवाशांना अडचण येऊ नये म्हणून राज्य परिवहन महामंडळाकडून ३००० , अधिकृत खाजगी एजंटची नेमणूक करण्यात आली आहे. त्या मध्ये त्या खाजगी एजंट ला नक्कीच काही तरी टक्के कमिशन महामंडळाला द्यावे लागणार हे निश्चित आहे. परंतु NCMC कार्ड हे ऑनलाइन पद्धतीने नागरिकांना अप्लाय चा पर्याय उपलब्ध करून दिल्यास त्यामध्ये एजंटला द्यावे लागणारे कमिशन हे वाचून त्यापासून महामंडळाला नक्कीच आर्थिक फायदा होईल आणि नागरिकांना सुद्धा एसटी डेपो मध्ये न जाता घरात बसून ते कार्ड अप्लाय करता येईल तसेच अप्लाय केल्यावर त्याची स्लीप डाऊनलोड करून त्या स्लीपच्या आधारे त्यांना NCMC कार्ड येईपर्यंत सवलतीतील प्रवास करणे उपलब्ध होईल. तरी राज्य परिवहन महामंडळाने उपरोक्त विषयाची गंभीर दखल घेऊन NCMC कार्ड प्रवाशांना ऑनलाइन पद्धतीने उपलब्ध कसे करून देता येईल याबाबत संबंधित यंत्रणेशी संपर्क साधून त्याची तात्काळ अंमलबजावणी करावी.जेणेकरून करून एसटी प्रवाशांची एसटी डेपो मध्ये NCMC कार्ड काढण्यासाठी गर्दी होणार नाही

- श्री. नितीन कदम मुंबई

न्यायाधीश दाबावाखाली आहेत काय ?

गोकुळ दूध संघाच्या नुकत्याच झालेल्या संचालक मंडळाच्या निवडणुकीत २५ जागांपैकी एका गटाला १३ तर दुसऱ्या गटाला १२ जागा मिळाल्या. निवडणुकीतून स्पष्ट झालेला हा कौल होता. मात्र अध्यक्ष निवडीच्यावेळी आवश्यक गणपूर्तीचा प्रश्न निर्माण झाला आणि अध्यक्षपदाची निवडणूक रखडली. त्यानंतर राज्य शासनाने मोठ्या उलाढालीच्या सहकारी संस्थांवर शासन नियुक्त संचालक नेमण्याची तरतूद करणारा अध्यादेश काढून गोकुळवर चार मतदान अधिकार असलेल्या संचालकांची नियुक्ती केली. या निर्णयाला न्यायालयात आव्हान देण्यात आले. निवडणुकीतून व्यक्त झालेल्या सभासदांच्या इच्छेचा विचार करून, तसेच या अध्यादेशामागील सरकारचा सुप्त उद्देश लक्षात घेऊन न्यायालयाने या अध्यादेशास स्थगिती का दिली नाही ? असा प्रश्न सर्वसामान्य जनतेला पडतो व न्यायाधीश सरकारच्या दबावाखाली आहेत की काय अशी शंका येते ?

- बकुल बोरकर, विले पार्ले मुंबई

देशद्रोह्यांना शोधण्यासाठी टास्कफोर्स उभारावा !

नाशिक जिल्ह्यातील सुप्रसिद्ध त्र्यंबकेश्वर ज्योतिर्लिंग मंदिर आणि सप्तशृंगी गड या २ प्रमुख देवस्थानांना बाँबने उडवण्याची धमकी ई-मेलद्वारे देण्यात आल्याने सुरक्षायंत्रणा सतर्क झाल्या आहेत. दिवाळीच्या सुटीनिमित्त मंदिरात दर्शनासाठी मोठी गर्दी होते त्यामुळे सुरक्षेचा उपाय म्हणून दोन्ही देवस्थानांच्या परिसरात कडक पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. पुढील वर्षीपासून नाशिक नगरीत सुरु होणाऱ्या सिहंस्थ कुंभमेळ्याच्या धर्तीवर दोन्ही देवस्थानाना आलेली धमकी सुरक्षा यंत्रणांच्या दृष्टीने अधिक सजग राहण्यासाठी इशारा ठरली आहे. हिंदूंच्या सण-उत्सवांच्या काळात देवस्थानाना, धार्मिक स्थळांना धमक्या येण्याचे प्रकरण तसे नवीन नाही. आश्चर्याची गोष्ट म्हणजे भारतात अन्य पंथीयांच्या धार्मिक स्थळांना कधी धमक्यांचे ईमेल अथवा फोन येत नाहीत. प्रत्येक वेळेस हिंदूंची धार्मिक स्थळे आतंकवाद्यांच्या हिटलिस्टवर असतात. हिंदूंच्या सण उत्सवांसह स्वातंत्र्यदिन आणि प्रजासत्ताक दिन यांसारखे राष्ट्रीय उत्सवही दरवर्षी आतंकवादाच्या सावटाखाली साजरे केले जातात. त्यामुळे भारतात राहून, येथील सुख सुविधा उपभोगुन शत्रूराष्ट्रासाठी काम करणाऱ्या नमकहरामांना शोधून काढण्याची मोहीम अंतर्गत सुरक्षा व्यवस्थांनी वर्षभर राबवायला हवी. कोणतिही आतंकवादी कारवाई जशी स्थानिकांच्या साहाय्याशिवाय पूर्णत्वाला नेता येत नाही तसे अशा प्रकारचे धमकीचे ईमेल आणि फोनही देशातील देशद्रोह्यांची मदतीशिवाय करण्याचे धाडस कोणी करू शकत नाही त्यामुळे केंद्र सरकारने या देशद्रोह्यांची पाळेमुळे खणून काढण्यासाठी स्पेशल टास्क फोर्स उभारावा !

- सौ. मोक्षदा घाणेकर, मुंबई

नवी मुंबई ते जेद्दा थेट विमानसेवा 15 डिसेंबरपासून

नवी मुंबई : नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून सौदी अरेबियातील जेद्दा शहरासाठी अकासा एअरची थेट विमानसेवा १५ डिसेंबरपासून सुरू होणार आहे. या मार्गावर दररोज दोन उड्डाणे चालविण्यात येणार असून, त्यामुळे मुंबई महानगर प्रदेशासह महाराष्ट्रातील प्रवाशांना सौदी अरेबियासाठी आणखी एक आंतरराष्ट्रीय पर्याय उपलब्ध होणार आहे. सेवेसाठी १९७ आसनक्षमतेच्या बोइंग ७३७ मॅक्स-८ विमानांचा वापर केला जाणार आहे. पहिल्या विमानाचे नवी मुंबई विमान तळावरून पहाटे ४.४५ वाजता जेद्दासाठी उड्डाण होईल. दुसरे सायंकाळी ५.२५ वाजता रवाना होईल. जेद्दाहून येणारी विमाने अनुक्रमे सकाळी ७.३५ आणि दुसऱ्या दिवशी पहाटे ५.२५ वाजता नवी मुंबईत दाखल होतील. मक्का आणि मदिना या पवित्र शहरांचे प्रवेशद्वार असलेल्या जेद्दासाठी थेट सेवा सुरू झाल्याने उमराह आणि हज यात्रेकरूंना मोठी सुविधा मिळणार आहे. इराकचे हवाई क्षेत्र भारतीय विमान कंपन्यांसाठी पुन्हा खुले झाल्याने एअर इंडियाची मुंबई आणि दिल्ली येथून न्यूयॉर्कला जाणारी विमानसेवा पुन्हा थेट सुरू झाली आहे. अमेरिके-इराण युद्धामुळे गेल्या काही महिन्यांपासून या विमानांना रोम येथे इंधन भरण्यासाठी थांबा घ्यावा लागत होता.



जमिनीचा वाद टोकाला गेला, मुलानं घरात घुसून वडील-भावावर झाडल्या गोळ्या

प्रतिनिधी
■ कल्याण

- टिटवाळ्याजवळील गुरवलीपाडा परिसरात गोळीबाराची धक्कादायक घटना
- कल्पेश शेलार याच्यावर वडील आणि भावावर गोळीबार केल्याचा आरोप
- वडिलोपार्जित मालमत्तेतील हिस्सा मिळावा यावरून वाद झाल्याची माहिती



मालमत्तेतील वाटा मिळावा, यासाठी सुरू असलेल्या वादातून एका मुलानेच आपल्या वडिलांसह सख्ख्या भावावर गोळीबार केल्याची धक्कादायक घटना टिटवाळ्याजवळील गुरवलीपाडा परिसरात घडली. या हल्ल्यात वडील बाळाराम शेलार आणि भाऊ भरत शेलार गंभीर जखमी झाले आहेत. दोघांनाही उपचारासाठी ज्युपिटर रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती आहे.

या घटनेतील आरोपीचे नाव कल्पेश शेलार असे आहे. मिळालेल्या माहितीनुसार, कल्पेश हा गेल्या दीड वर्षांपासून आपल्या कुटुंबापासून वेगळा राहत होता. मात्र, वडिलोपार्जित मालमत्तेत आपल्याला हिस्सा मिळावा, अशी त्याची मागणी होती. याच कारणावरून त्याचे कुटुंबासोबत वारंवार वाद होत होते. मालमत्तेतील वाटा देण्यासाठी तो वडिलांकडे सतत तगादा लावत होता.

याच वादातून कल्पेश संतप्त झाला. त्यानंतर तो थेट वडिलांच्या घरी पोहोचला. घरात गेल्यानंतर त्याने कोणताही विचार न करता वडील बाळाराम आणि भाऊ भरत यांच्यावर गोळ्या झाडल्या. अचानक झालेल्या या गोळीबारामुळे परिसरात एकच खळबळ उडाली. गोळ्या लागल्याने दोघेही रक्ताच्या थारोळ्यात पडले. घटनेची माहिती मिळताच त्यांना तातडीने रुग्णालयात हलवण्यात आले.

दरम्यान, गोळीबार केल्यानंतर आरोपी कल्पेश घटनास्थळावरून पळून जाण्याच्या तयारीत होता. मात्र, या घटनेची माहिती मिळताच कल्याण ग्रामीण पोलिसांनी तातडीने तपास सुरू केला. पोलिसांनी सापळा रचून आरोपीला ताब्यात घेतले. त्यामुळे पुढील अनर्थ टळला. या घटनेमुळे गुरवलीपाडा परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पोलिसांकडून या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

दिवा रेल्वे फाटक २५ मिनिटे उघडे, मध्य रेल्वेची वाहतूक विस्कळीत

प्रतिनिधी
■ ठाणे

९ लोकल, ५ मेल-एक्स्प्रेस खोळंबल्या

मध्य रेल्वेवरील दिवा रेल्वे स्थानकाजवळील समांतर रस्ता फाटक (लेव्हल क्रॉसिंग गेट) तब्बल २५ मिनिटे उघडे राहिल्याने मध्य रेल्वेची वाहतूक विस्कळीत झाली. रस्त्यावर वाहनांची मोठी गर्दी झाल्यामुळे फाटक बंद करता आले नाही. रेल्वे वाहतुकीवर त्याचा परिणाम झाला. या घटनेमुळे नऊ लोकल आणि पाच मेल-एक्स्प्रेस गाड्या खोळंबल्या.

मध्य रेल्वेच्या दिवा स्थानकाजवळील एलएक्स-२९ हे रेल्वे फाटक दुपारी १ वाजून ३५ मिनिटांनी उघडे राहिल्याची नोंद रेल्वे प्रशासनाकडे करण्यात आली आहे. रस्त्यावर वाहनांची मोठी गर्दी असल्याने फाटक बंद करण्यात अडथळा येत होता. त्यामुळे सुमारे २५ मिनिटे रेल्वे वाहतुकीला अडथळा निर्माण झाला. या कालावधीत लोकल आणि मेल-एक्स्प्रेस गाड्यांच्या वाहतुकीवर परिणाम झाला.

रेल्वेच्या नोंदीनुसार, या घटनेमुळे नऊ लोकल आणि पाच मेल-एक्स्प्रेस गाड्या खोळंबल्या. लोकल गाड्या उशिरा धावल्या. त्यामुळे रेल्वे प्रवाशांची गैरसोय झाली. रेल्वे फाटकावर रस्ते वाहतुकीचा ताण वाढल्याने रेल्वे वाहतुकीचे वेळापत्रकही विस्कळीत झाले. दरम्यान, रेल्वे फाटकावर वाहनांची गर्दी झाल्याने रेल्वे वाहतुकीला अडथळा निर्माण होण्याचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

दिवसाला ३९ वेळा फाटक बंद

दिवा येथील समांतर रस्ता फाटक दिवसाला सरासरी ३९ वेळा बंद होते. रेल्वे आणि रस्ते वाहतुकीचा भार एकाच ठिकाणी येत असल्याने वाहनांची गर्दी वाढली की फाटक बंद करण्यात अडथळा निर्माण होतो. त्यामुळे या ठिकाणी कायमस्वरूपी पर्यायी व्यवस्था किंवा पूल प्रकल्प तातडीने पूर्ण करण्याची मागणी प्रवाशांकडून होत आहे.

दिवा पूर्व-पश्चिम रस्ते वाहतूक करताना दिव्यातील १० रेल्वे मार्गिका ओलांडाव्या लागतात. दिव्यातील समांतर रस्ता फाटक (लेव्हल क्रॉसिंग गेट) सातत्याने खुले करून शेकडो वाहनांची वाहतूक होते.

नाट्यदिग्दर्शक प्रा. मंदार टिल्लू यांचे निधन



ठाणे : बालरंगभूमीच्या माध्यमातून अनेक बालकलाकार घडविणारे, नाट्यदिग्दर्शक, निर्माते आणि गंधार कला संस्थेचे अध्यक्ष प्रा. मंदार टिल्लू यांचे बुधवारी निधन झाले. त्यांच्या निधनाने ठाण्याच्या सांस्कृतिक आणि नाट्यविश्वातील एक महत्त्वाचे व्यक्तिमत्त्व हरपले आहे. बालरंगभूमीच्या विकासासाठी त्यांनी दिलेले योगदान मोठे होते.

प्रा. मंदार टिल्लू यांनी आपले संपूर्ण आयुष्य प्रामुख्याने बालरंगभूमी आणि बालकलाकारांना प्रोत्साहन देण्यासाठी वाहून घेतले होते. पत्नी पल्लवी टिल्लू यांच्या साथीने त्यांनी ठाण्यात गंधार कला संस्थेची स्थापना केली. या संस्थेच्या माध्यमातून गेल्या १५ वर्षांहून अधिक काळ बालनाट्य, नाट्य प्रशिक्षण शिबिरे आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत होते. अनेक मुलांना अभिनय, व्यक्तिमत्त्व विकास आणि रंगमंचावरील सादरीकरणाचे धडे देण्याचे काम त्यांनी केले.

उड्डाणपुलावर फटाके फोडणे भोवले, 60 फूट खोल पडलेल्या अल्पवयीनाची अग्निशमन दलाकडून सुटका

प्रतिनिधी
■ पनवेल

रहदारीसाठी नुकताच खुला झालेल्या कर्नाळा स्पोर्ट्सजवळील उड्डाणपुलावर फटाके फोडण्यासाठी गेलेल्या १६ वर्षीय युवकाला हा प्रकार चांगलाच भोवला. फटाके फोडताना तोल जाऊन हा युवक पुलावरून सुमारे ५० ते ६० फूट खाली चिखलात पडला. मंगळवारी रात्री साडेदहाच्या सुमारास घडलेल्या या घटनेची माहिती मिळताच पनवेल महापालिकेच्या अग्निशमन दलाने घटनास्थळी धाव घेत बचावकार्य केले. प्रतिकूल परिस्थितीत सुमारे दीड किलोमीटर पायी चालत घटनास्थळी पोहोचलेल्या जवानांनी दोरखंडांच्या साहाय्याने युवकाला सुखरूप बाहेर काढले.

मुख्यमंत्र्यांच्या हस्ते नुकतेच या उड्डाणपुलाचे ऑनलाइन लोकार्पण करण्यात आले होते. या पुलावरून नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि उलवेच्या दिशेने वाहतूक सुरू आहे. पुलावर फटाके फोडण्यासाठी गेलेला पनवेलमधील लाइन आळी परिसरातील हा युवक पुलावरून खाली पडला. त्याचवेळी पुलावरून जात असलेल्या अग्निशमन दलातील सागर जाधव यांनी ही घटना पाहून तत्काळ अग्निशमन दलाला माहिती दिली. त्यानंतर दोन अग्निशमन वाहने घटनास्थळी दाखल झाली.

कल्याणमधील मोहने, नांदिवलीत वीज चोरी करणाऱ्या १० जणांविरोधात गुन्हे

प्रतिनिधी
■ कल्याण



कल्याण पश्चिमेतील मोहने, आंबिवली, पूर्वेतील नांदिवली तलाव परिसरातील वस्तीत महावितरणच्या भरारी पथकाने छापे टाकून घरात वीज मीटर बसवून न घेता थेट महावितरणच्या वीज वाहिन्यांवरून चोरून वीज पुरवठा घेणाऱ्या, वीज देयक भरणा केला नाही म्हणून काही ग्राहकांचा वीज पुरवठा महावितरणने खंडित केला असताना, अशा रहिवाशांनी चोरून वीज पुरवठा घरात घेऊन सुरळीत वीज पुरवठा केला असल्याचे निदर्शनास आल्यावर अशा १० वीज ग्राहकांविरोधात महावितरणने महात्मा फुले पोलीस ठाण्यात वीज चोरीचे गुन्हे दाखल केले आहेत.

कल्याण जवळील आंबिवली मोहने येथील भोईर निवासमध्ये मकरंद सुरेश भोईर कुटुंबीयांसह राहतात. फेब्रुवारी ते ऑगस्ट या कालावधीतील वीज वापराचे सात हजाराचे देयक भोईर यांनी थकवले होते. महावितरणने त्यांच्या घराचा वीज पुरवठा खंडित केला होता. भोईर यांच्या घराचा वीज मीटर महावितरणने काढून नेला होता. तरीही वीज मीटर पेटीतील मीटरच्या वीज वाहक वाहिन्या थेट वीज वाहिन्यांना जोडून तेथून चोरून वीज पुरवठा घेऊन भोईर यांनी घरातील वीज पुरवठा सुरू केला होता, असे महावितरण भरारी पथकाच्या गेल्या महिन्यात निदर्शनास आले. तंत्रज्ञ भारती डबेराव, विद्युत साहाय्यक रोशन दोड या कारवाईत सहभागी झाले होते.

मागील आठ महिन्याच्या काळात भोईर यांनी साडे सहा हजार रूपयांची वीज चोरी केली असल्याचे उघड झाले होते. चोरून वीज वापरून महावितरणचे आर्थिक नुकसान केले म्हणून महावितरणचे साहाय्यक अभियंता मंगेश नागरे यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी मकरंद भोईर यांच्या विरूध्द गुन्हा दाखल केला आहे.

कल्याण डोंबिवलीसह तळोजा-खोणी, काटई-बदलापूर, शिळफाटा रस्ता कोंडीत

प्रतिनिधी
■ कल्याण



दिवाळीनिमित्त एकावेळी हजारो वाहने रस्त्यावर आल्याने कल्याण, डोंबिवली शहर परिसरातील रस्ते बुधवारी दुपारपासून वाहनांनी गजबजून गेले. प्रशासनाकडून वाहतूक नियंत्रणाचे कोणतेही नियोजन नसल्याने कल्याण, डोंबिवली शहर परिसरासरासह शिळफाटा रस्ता, काटई बदलापूर रस्ता, तळोजा-खोणी रस्ता, शहाड परिसरातील रस्ते वाहन कोंडीने गजबजून गेले. पाच मिनिटांच्या प्रवासासाठी प्रवाशांना दीड ते दोन तासांचा कालावधी लागत होता. भाऊबिजेनिमित्त एकाचवेळी वाहने रस्त्यावर येतात, याची माहिती असूनही वाहतूक विभागाकडून मुख्य वर्दळीच्या रस्त्यांवर कोणतेही नियोजन न केल्याने प्रवाशांचे सर्वाधिक हाल झाले.

भाऊबीज निमित्त कुटुंबीय सकाळपासून घराबाहेर पडले. लोकलला तुफान गर्दी असल्याने प्रवाशांनी आपली खासगी वाहने, ओला, उबेर, खासगी इतर भाड्याच्या वाहनांना पसंती दिली. ही वाहने एकाचवेळी रस्त्यावर आल्याने कल्याण, डोंबिवली शहरातील अंतर्गत रस्ते, त्याच बरोबर शिळफाटा रस्ता, काटई बदलापूर रस्ता, मलंगगड रस्ता, शहाड पूल भागात बुधवारी तुफान वाहन कोंडी झाली.

आसनगाव - कसारा तिसऱ्या रेल्वे मार्ग परियोजना पूर्ततेसाठी 'पॉवर ब्लॉक'

प्रतिनिधी
■ कसारा

आसनगाव - कसारा तिसरी रेल्वे मार्ग परियोजना आणि कसारा यार्डमधील 'अप' यार्ड लाईन विस्तारीकरणाच्या अनुषंगाने कसारा येथे 'पोस्ट नॉन-इंटरलॉकिंग' आणि 'पॉवर ब्लॉक' घेण्यात येणार आहेत. मध्य रेल्वेद्वारे १३/१४.११.२०२६ (शुक्रवार/शनिवारची रात्र) आणि दिनांक १४/१५.११.२०२६ (शनिवार/रविवारची रात्र) रोजी कसारा येथे 'पोस्ट नॉन-इंटरलॉकिंग' आणि 'पॉवर ब्लॉक' घेण्यात येणार आहेत. हे काम आसनगाव - कसारा तिसरी रेल्वे मार्ग परियोजना आणि कसारा यार्डमधील 'अप' यार्ड लाईनच्या (इगतपुरी बाजूकडील) विस्तारीकरणाशी संबंधित आहे.

ब्लॉकची तारीख: दिनांक १३/१४.११.२०२६ (शुक्रवार/शनिवारची रात्र) आणि दिनांक १४/१५.११.२०२६ (शनिवार/रविवारची रात्र),ब्लॉकचा कालावधी: रात्री ११.१० ते मध्यरात्री ०१.४० वाजेपर्यंत,ब्लॉकचा विभाग: खर्डी – कसारा दरम्यान 'अप' मेन लाइन आणि तिसरी लाईन. मेल/एक्सप्रेस गाड्यांवर होणारा परिणाम खालील 'डाऊन' दिशेने जाणाऱ्या गाड्या कसारा स्थानकावर २० ते २५ मिनिटे उशिराने चालतील: १३/१४.११.२०२६ रोजी गाडी क्रमांक 14122 लोकमान्य टिळक टर्मिनस – सूबेदारगंज अमृत भारत एक्सप्रेस,गाडी क्रमांक 12879 लोकमान्य टिळक टर्मिनस – भुवनेश्वर एक्सप्रेस, १३/१४.११.२०२६ आणि १४/१५.११.२०२६ रोजीगाडी क्रमांक 12322 छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस – हावडा एक्सप्रेस,गाडी क्रमांक 12167 लोकमान्य टिळक टर्मिनस - बनारस एक्सप्रेस,गाडी क्रमांक 01079 छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस – गोरखपूर विशेष एक्सप्रेस,गाडी क्रमांक 12141 लोकमान्य टिळक टर्मिनस – पाटलिपुत्र एक्सप्रेस, गाडी क्रमांक 11057 छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस – अमृतसर एक्सप्रेस, गाडी क्रमांक 22177 छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस – बनारस महानगरी एक्सप्रेस गाडी क्रमांक 22538 लोकमान्य टिळक टर्मिनस – गोरखपुर कुशीनगर एक्सप्रेस, १४/१५.११.२०२६ रोजी:- गाडी क्रमांक 12811 लोकमान्य टिळक टर्मिनस – हटिया एक्सप्रेस, ब्लॉक कालावधीत (दिनांक १३/१४.११.२०२६ आणि दिनांक १४/१५.११.२०२६) या गाड्या विलंबाने धावणार आहेत

बदलापूर येथे उल्हास नदीत विषारी पाण्याने हजारो माशांचा मृत्यू

प्रतिनिधी
■ बदलापूर



उल्हास नदी सद्या जणू विषारी मृत्यूच्या छायेखाली सापडली आहे. कारण बदलापूर जवळील जांभूळ परिसरात गेल्या दोन-तीन दिवसांत अचानक हजारो मृत मासे पाण्यावर तरंगताना आढळून आले आणि तो भयानक नजारा पाहून संपूर्ण नदीकाठ हादरून गेला आहे. सकाळी मासेमारीसाठी नदीवर गेलेल्या स्थानिक मच्छिमारांना नदीचे पाणी नेहमीसारखे न दिसता वेगळ्याच रंगाचे आणि दुर्गंधी येणारे दिसले आणि पाण्यावर तरंगणारे हजारो मृत मासे पाहून त्यांच्या पायाखालची जमीनच सरकली.

कर्जत पासून निघणारी आणि बदलापूर, अंबरनाथ, उल्हासनगर, कल्याण डोंबिवली मार्गे ठाण्यापर्यंत वाहणारी ही उल्हास नदी म्हणजे ठाणे जिल्ह्यातील सात महानगरपालिकांमधील जवळपास एक कोटी नागरिकांची जीवनवाहिनी आहे. याच नदीचे पाणी जांभूळ येथील जलशुद्धीकरण केंद्रात उचलून प्रक्रिया करून लाखो घरांमध्ये पिण्यासाठी पाठवले जाते. पण ज्या जांभूळ परिसरात हे मासे मरून पडले आहेत त्याच ठिकाणाहून पाणी उचलले जात असल्याने आता लाखो नागरिकांच्या आरोग्यावर थेट घाला घातला गेला आहे का ? असा संतप्त सवाल सर्वत्र विचारला जात आहे.

प्रतिनिधी
■ उरण

"आगरी-कोळी समाजावर माझे नितांत प्रेम आहे. मच्छीमारांना सरकारदरबारी सुविधा मिळतात, पण त्यासाठी एकत्र येऊन सुविधा मिळवायला हव्यात. लांगेश्वराच्या कृपेने आणि मुर्बा गणपतीमुळे मोरावे गावाचे नाव सुप्रसिद्ध होत आहे. मोरावे गावासाठी सिडकोकडून मी अधिकृत मैदान मिळवून दिले आहे. आता समाज मंदिर आणि इतर विकासकामांचा पाठपुरावा सुरू आहे. मोरावे ग्रामस्थ एकजुटीने राहिले तर त्यांची अनेक प्रलंबित कामे मार्गी लागू

मोरावे येथे मच्छीमार सहकारी सोसायटीच्या नामफलकाचे महेंद्र घरत यांच्या हस्ते अनावरण



शकतात. जेटीचे काम मार्गी लावण्यासाठी सत्ताधाऱ्यांनी आता जोर लावला पाहिजे. गावच्या विकासासाठी हातात हात घालून काम करायला तयार असाल तर मी तुमच्या मागे कायम आहे," असे

आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्रशेठ घरत मोरावे येथे मच्छीमार सोसायटीच्या नामफलक अनावरणप्रसंगी म्हणाले. मोरावे येथे आई जरी मरी पारंपारिक व्यावसायिक मच्छीमार सहकारी संस्थेच्या नामफलकाचे अनावरण आंतराष्ट्रीय कामगार नेते महेंद्र घरत यांच्या हस्ते मंगळवारी करण्यात आले.

नाकाबंदीदरम्यान पोलिसाला कारच्या बोनेटवर फरफटत नेले

प्रतिनिधी
■ पनवेल

कळंबोलीतील धक्कादायक घटना

नाकाबंदीदरम्यान मोटार थांबविण्याचा इशारा करूनही चालकाने पोलिसांच्या अंगावर वाहन घातले. पोलीस शिपायाने मोटार पकडण्याचा प्रयत्न केला असता चालकाने वेग वाढविल्याने शिपायाला काही मीटर अंतर बोनेटवरून फरफटत जावे लागले. रविवारी (ता.८) मध्यरात्री कळंबोलीतील रोडपाली परिसरात ही घटना घडली. पोलिसांकडून रात्रीच्या वेळी संशयित वाहनांची तपासणी सुरू असताना काळ्या काचा असलेल्या मोटारीच्या चालकाने नाकाबंदीवरील पोलिसांच्या सूचनांकडे दुर्लक्ष करून पळ काढण्याचा प्रयत्नात हा प्रकार घडल्याचे समोर आले आहे. यावेळी मोटार थांबविण्यासाठी पुढे उभ्या असलेल्या पोलीस शिपायाला चालकाने मोटारीच्या बोनेटवर फरफटत नेल्याने पुन्हा एकदा पोलिसांच्या सूरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. काही अंतरानंतर वेग वाढविल्याने शिपाई रस्त्यावर पडून जखमी झाले. त्यांच्या पाय व गुडघ्याला गंभीर मार लागला असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

कळंबोली पोलीस ठाण्याचे गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दिलीप चव्हाण यांनी दिलेल्या माहितीनुसार, रविवारी (८ नोव्हेंबर) मध्यरात्री रोडपाली परिसरात पोलिसांचे पथक संशयित मोटारी आणि दुचाकीस्वारांची तपासणी करीत होते. या पथकात पोलीस शिपाई दिलीप भोई कार्यरत होते. यावेळी काळ्या काचा असलेली स्विफ्ट मोटार तेथे आली. पोलिसांनी चालकाला मोटार थांबविण्याचा इशारा केला. मात्र, त्याने त्याकडे दुर्लक्ष करून मोटार पुढे नेण्याचा प्रयत्न केला.

आदिवासी बांधव आणि शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणारे संवेदनशील शासन !

ठाण्यात मंत्री प्रताप सरनाईक यांनी आदिवासी बांधवांसोबत साजरी केली आनंदाची दिवाळी !!

प्रतिनिधी
■ ठाणे



दीपावलीचा सण संपूर्ण महाराष्ट्रात आनंदाने आणि उत्साहाने साजरा केला जात असताना, संकटांचा आणि आर्थिक अडचणींचा सामना करणाऱ्या शेतकरी व आदिवासी बांधवांच्या आयुष्यात आनंदाचा प्रकाश पसरवण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध असल्याचे चित्र ठाण्यात पाहायला मिळाले. १४६ ओवळा-माजिवडा मतदारसंघातील घोडबंदर रोड येथील पानखंडा येथे आयोजित खास उपक्रमात महाराष्ट्र राज्याचे परिवहन मंत्री तथा धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री प्रताप इंदिराबाई बाबुराव सरनाईक यांनी स्थानिक आदिवासी शेतकरी आणि शेतमजुरांसोबत प्रत्यक्ष उपस्थित राहून दिवाळीचा आनंद द्विगुणित केला.

शासनाचा कारभार केवळ प्रशासकीय निर्णय आणि आर्थिक मदतीपुरता मर्यादित न ठेवता, प्रत्यक्ष तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचून त्यांच्या सुख-दुःखात सहभागी होणे हेच एका संवेदनशील प्रशासनाचे लक्षण असते. याच भावनेतून या विशेष सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात महामानवांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून व आदरांजली वाहून करण्यात आली. यावेळी स्थानिक आदिवासी बांधवांनी पारंपरिक वेशभूषेत आणि लोकनृत्याच्या तालावर मान्यवरांचे स्वागत केले. या सोहळ्यात आदिवासी कुटुंबांना दिवाळीचा आनंदाचा शिधा आणि जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले. तसेच, भावी पिढीच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी लहान विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे व शालेय वस्तूंचे मोफत वाटप करण्यात आले. केवळ औपचारिकता न पाळता मंत्री प्रताप सरनाईक यांनी आपल्या परिवारासह आदिवासी बांधवांच्या घरी जात जमिनीवर बसून त्यांच्यासोबत दिवाळीच्या फराळाचा मनमोकळा आस्वाद घेतला. त्यांच्या अडचणी, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न आणि शेतीशी संबंधित समस्या अत्यंत आत्मीयतेने जाणून घेत, "कोणत्याही परिस्थितीत आपल्या बळीराज्याला आणि आदिवासी बांधवांना वाऱ्यावर सोडणार नाही," असा ठाम विश्वास त्यांनी यावेळी दिला.

दिवाळीनंतरही प्रदूषणाचा विळखा कायम हवेच्या गुणवत्तेत अंबरनाथ शहराची आघाडी

प्रतिनिधी
■ अंबरनाथ

दिवाळीतील लक्ष्मीपूजनाच्या रात्री फटाक्यांच्या आतिषबाजीमुळे ठाणे जिल्ह्यातील शहरांची हवा अत्यंत विषारी झाली होती. मात्र, दिवाळी सरत आली तरी या प्रदूषणाचा विळखा अद्याप सुटलेला नाही. नुकत्याच समोर आलेल्या सुधारित आकडेवारीनुसार अंबरनाथ, बदलापूर आणि उल्हासनगर या तीन प्रमुख शहरांमध्ये हवेच्या दर्जा निर्देशांकात पुन्हा एकदा मोठी वाढ पाहायला मिळाली आहे. या तिन्ही शहरांची तुलना केल्यास, प्रदूषणाच्या पातळीत अंबरनाथ शहराने सर्वाधिक आघाडी घेतली असून येथील हवा अत्यंत धोकादायक पातळीवर पोहोचली होती.

सध्या या तिन्ही शहरांमध्ये अंबरनाथची परिस्थिती सर्वाधिक चिंताजनक आहे. लक्ष्मीपूजनाच्या रात्री अंबरनाथमध्ये हवेचा दर्जा निर्देशांक ४९६ वर गेला होता. त्यानंतर १० नोव्हेंबर रोजी रात्री ११ वाजता अंबरनाथच्या कानसई विभागात पुन्हा एकदा प्रदूषणाने उच्चांक गाठत हवेचा दर्जा निर्देशांक ३९७ इतका नोंदवला गेला. याच वेळी येथील हवेत अत्यंत घातक असलेल्या सूक्ष्म धूलिकणांचे म्हणजेच पीएम २.५ चे प्रमाण २४६ मायक्रोग्रॅम प्रति घनमीटर इतके होते. तर, पीएम १० ची पातळी तब्बल ३७० इतकी नोंदवली गेली आहे. अंबरनाथमधील हवेची ही गुणवत्ता बदलापूर आणि उल्हासनगरच्या तुलनेत सर्वाधिक खराब आणि आरोग्यासाठी अत्यंत हानिकारक असल्याचे या आकडेवारीवरून स्पष्ट होते.

अंबरनाथपाठोपाठ बदलापूर शहरातही हवेचे प्रदूषण मोठ्या प्रमाणावर वाढलेलेच आहे. बदलापूरमध्ये लक्ष्मीपूजनाच्या रात्री हवेचा दर्जा निर्देशांक ५७६ असा विक्रमी नोंदवला गेला होता. त्यानंतर १० नोव्हेंबर रोजी रात्री ११ वाजता बदलापूरमध्ये हवेचा दर्जा निर्देशांक ३४६ वर पोहोचल्याचे समोर आले आहे. याच वेळेत बदलापूर शहरात पीएम २.५ ची पातळी १८० आणि पीएम १० ची पातळी २६५ इतकी नोंदवली गेली आहे. या तुलनेत उल्हासनगर शहरात प्रदूषणाची पातळी अंबरनाथ आणि बदलापूरपेक्षा किंचित कमी असली तरी ती आरोग्यासाठी धोक्याच्या रेषेवरच आहे.

मुंबई : शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नंदुरबार-नवापूर संपर्कप्रमुख तथा शिव अवजड वाहतूक चालक सेना महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष संदीप बाबू मोरे यांची कन्या कु. निकिता हिच्या साखरपुडा समारंभानिमित्त तिला शुभाशीर्वाद देण्यासाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उपसचिव प्रवीण महाले यांनी सहकुटुंब उपस्थित राहून नवदांपत्यास भावी आयुष्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.



भाऊबीजेला ऊसतोड कामगारांच्या पालावर मंत्री पंकजा मुंडेंची मायेची भेट; कामगारांसोबत साजरी केली दिवाळी

ऊसतोड कामगारांच्या कष्टाला न्याय मिळवून देण्यासाठी सतत प्रयत्नशील - पंकजा मुंडे

प्रतिनिधी
■ पुणे

ऊन-पावसाची तमा न बाळगता कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी ऊसतोडीच्या कामात राबणाऱ्या कामगारांशी आपुलकीचे नाते जपत राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी आज मुळशी तालुक्यातील कासारसाई-दारुंब्रे येथील संत तुकाराम साखर कारखान्याच्या परिसरातील ऊसतोड कामगारांच्या पालावर जाऊन भाऊबीज साजरी केली. यावेळी त्यांनी कामगारांशी संवाद साधत त्यांच्या सुख-दुःखाची विचारपूस केली. तसेच पालावर चुलीवर स्वयंपाक करून कामगारांसोबत स्नेहभोजनाचा आनंद घेतला. त्यांच्या या भेटीमुळे कामगारांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.



राज्यातील दुष्काळी परिस्थितीमुळे रोजगारासाठी गाव सोडून आलेल्या ऊसतोड कामगारांच्या पालावर जाऊन त्यांच्यासोबत सण साजरा करण्याचा हा प्रसंग कामगारांसाठी आनंददायी ठरला.भाऊबीजेच्या निमित्ताने कामगारांच्यावतीने त्यांना साडीचोळीची ओवाळणी भेट दिली. श्रीमती मुंडे म्हणाल्या, दरवर्षी नेहमी कष्टकारी कामगारांसोबत दिवाळी साजरी करीत असते. काही दिवसांपूर्वी २२ वर्षाचा ऊसतोड कामगारांचा मृत्यू झाला, हे ऐकून मन सुन्न झाले. ऊसतोड कामगारांचे पाल्यांना शिक्षण, आरोग्यासाठी मदत व्हावी तसेच ऊसतोड कामगारांचे प्रश्न सोडवण्यासाठी लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे.

ऊसतोड कामगारांच्या कष्टाला न्याय देण्यासाठी नेहमी प्रयत्नशील आहे, आपल्या अडीअडचणीबाबत मोकळ्यापणे व्यक्त व्हा, असे सांगून श्रीमती मुंडे यांनी पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. आमदार शेळके म्हणाले, सर्व सामान्य कष्टकऱ्यांच्या पाठीमागे ताईसाहेब नेहमी उभ्या राहत असतात. ऊसतोड कामगारांच्या पालावर भेट देवून कामगारांसोबत खऱ्याअर्थाने दिवाळी साजरी केल्यासारखे वाटत आहे, असेही श्री. शेळके म्हणाले.

शेतकरी संकटात असताना कर्ज वसुलीसाठी तगादा नको, फायनान्स कंपन्यांना कृषीमंत्र्यांचे स्पष्ट निर्देश

प्रतिनिधी
■ इंदापूर

"शेतकरी शेतातच उध्वस्त झाला आहे. त्यामुळे त्याच्या आर्थिक अडचणींचा विचार करून फायनान्स कंपन्यांनी वाहने व इतर कुठल्याही स्वरुपाच्या कर्जवसुलीसाठी शेतकऱ्यांकडे तगादा लावू नये.," असे स्पष्ट निर्देश कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी आज इंदापूर येथे दिले.

बुलढाणा जिल्ह्यात फायनान्स कंपन्यांकडून शेतकऱ्यांच्या वाहनांच्या वसुलीसाठी होत असलेल्या तगाद्याबाबत शासनाने कारवाई केली आहे. यासंदर्भात महसूलमंत्री आणि मुख्यमंत्री यांच्यासोबत बैठका घेण्यात आल्याचे भरणे यांनी सांगितले. फायनान्स कंपन्यांचा विषय केंद्र सरकारच्या अखत्यारीत येत असल्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन तसेच केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्याशी चर्चा करून यावर योग्य तो मार्ग काढतील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, इंदापूर तालुक्यातील घोरपडवाडी येथील लावंड वस्तीवर शेतकरी हनुमंत लावंड यांच्या घरी भेट देत कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी शेतकरी कुटुंबासोबत दिवाळी साजरी केली. यावेळी त्यांनी दिवाळीच्या फराळाचा आस्वाद घेतला तसेच जनावरे व शेळ्यांच्या गोठ्याची पाहणी करून शेतकऱ्यांशी संवाद साधला. परिसरातील दुष्काळी परिस्थिती, पीक नुकसानीचे पंचनामे आणि पाणी उपलब्धतेच्या नियोजनाचा त्यांनी आढावा घेतला.

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या अग्रिम मदतीबाबत बोलताना भरणे म्हणाले की, पंचनाम्याचे काम युद्धपातळीवर केल्यामुळे आतापर्यंत ८७ लाख ४५ हजार शेतकऱ्यांना प्रति ५ हजार रुपयांप्रमाणे ४ हजार ३७२ कोटी रुपयांची अग्रिम मदत देता आली. उर्वरित शेतकऱ्यांना देखील पुढील दोन-तीन दिवसांमध्ये मदत दिली जाईल. ही केवळ अग्रिम मदत असून यापुढेही शासनाकडून मदत केली जाणार आहे.

दत्तात्रय भरणे यांनी शेतकऱ्यांसोबत साजरी केली दिवाळी



२० लाखांहून अधिक शेतकऱ्यांना १८ हजार कोटींची कर्जमाफी

कर्जमाफीबाबत बोलताना कृषीमंत्री म्हणाले, आतापर्यंत चार टप्प्यांमध्ये २० लाख ७२ हजार २५० शेतकऱ्यांना तब्बल १८ हजार ४० कोटी रुपयांची कर्जमाफी देण्यात आली आहे. सोबतच दोन लाखांपर्यंतच्या कर्जाच्या कागदपत्रांची पूर्तता करण्याचे काम सुरू असून नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचे प्रोत्साहन दिले जात असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच शेततळी, गाळ काढणे, मोफत बियाणे आणि वीजबिल सवलतीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना दिलासा देण्याचे काम सुरू असून या सर्व योजनांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना मदत केली जात असल्याचेही भरणे यांनी स्पष्ट केले.

दिवाळीच्या सुट्टीत बाल मावळ्यांनी साकारली ऐतिहासिक किल्ले शिवनेरीची भव्य प्रतिकृती!



- मातीचा सुगंध आणि इतिहासाचा साक्षात्कार
- बालचमूंनी जपला छत्रपती शिवरायांचा ऐतिहासिक वारसा

प्रतिनिधी
■ मुंबई

दिवाळीच्या सुट्टीचा आनंद घेत असतानाच महाराष्ट्राच्या गौरवशाली इतिहासाची ओळख नव्या पिढीला व्हावी, या उद्देशाने घाटकोपर पूर्व येथील पंतनगर विभागातील शिवनेरी इमारतीच्या आवारात बालचमूंनी एक अनोखा उपक्रम राबविला.

चिखल, माती आणि दगडांचा वापर करून छत्रपती शिवाजी महाराजांचे जन्मस्थान असलेल्या ऐतिहासिक किल्ले शिवनेरीची भव्य आणि हुबेहूब प्रतिकृती या बाल मावळ्यांनी साकारली. दिवाळीच्या सुट्टीत मुलांनी मोबाईल आणि टीव्हीपासून दूर राहून आपल्या कल्पकतेला आणि कलागुणांना वाव देत हा ऐतिहासिक किल्ला उभारला. किल्ल्याच्या प्रतिकृतीतून छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास, गड-किल्ल्यांचे महत्त्व आणि महाराष्ट्राची समृद्ध संस्कृती जपण्याचा सुंदर संदेश देण्यात आला. बालचमूंच्या या कल्पक उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले. या प्रसंगी घाटकोपर पूर्व विधानसभा कार्यालय प्रमुख प्रकाश वाणी, ग्राहक संरक्षण चिटणीस रमेश सावंत, चंद्रकांत हळदणकर, आयुष राणे, अर्थव साळुंखे, वैभव राऊत, दीक्षा पास्टे, आदिती निरगुडकर, तनिषा भोंडिवले, करण पुजारी, निशांक राणे, ओम पष्टे, धार्मिक पष्टे, हार्दिनी पष्टे, दीक्षा भोंडीवाले, ऋषभ आंब्रे आदी उपस्थित होते. बाल मावळ्यांनी साकारलेल्या या शिवनेरी किल्ल्यामुळे परिसरात दिवाळीच्या उत्साहासोबतच शिवइतिहासाचा जागरही पाहायला मिळाला.

नागपुरात सावत्र वडिलांकडून 10 वर्षीय मुलीवर अत्याचार

नागपूर : बाप-लेकीच्या पवित्र नात्याला काळिमा फासणारी धक्कादायक घटना नागपुरातील पाचपावली परिसरात उघडकीस आली आहे. अवघ्या 10 वर्षांच्या चिमुरडीवर तिच्याच सावत्र वडिलांकडून वारंवार लैंगिक अत्याचार करण्यात आल्याचा गंभीर आरोप आहे. विशेष म्हणजे, मुलीच्या शरीरावर दिसणाऱ्या संशयास्पद खुणांमुळे आईला पतीच्या वागणुकीबाबत शंका आली. मात्र, घरात नेमके काय घडत आहे, हे समजत नसल्याने तिने सत्य शोधण्यासाठी घरात गुपचूप सीसीटीव्ही कॅमेरा बसवला. टीव्हीच्या मागे लपवून ठेवलेल्या या कॅमेऱ्याच्या माध्यमातून आरोपीचे कृत्य समोर आल्याचे सांगण्यात येत आहे. या प्रकरणी पोलिसांनी 45 वर्षीय आरोपीला अटक केली असून न्यायालयाने त्याला तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

राजस्थानी समाजातील प्रतिष्ठित संस्थांचे भव्य दीपावली स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

प्रतिनिधी
■ मुंबई



- अनेक वर्षांनंतर जुन्या परिचितांच्या भेटीगाठी
- राजस्थानी समाजातील मान्यवरांचा मोठ्या संख्येने सहभाग

राजस्थानी समाजातील प्रतिष्ठित संस्था आणि मान्यवरांच्या सहभागाने दीपावली स्नेहसंमेलनाचे आयोजन गोरेगाव पूर्व येथील गोकुळधाम परिसरातील लक्षधाम हायस्कूलच्या सभागृहात उत्साहात पार पडले. या स्नेहसंमेलनाला समाजातील मान्यवर, उद्योजक, व्यावसायिक आणि प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. मुंबईत वास्तव्यास असलेल्या राजस्थानी समाजातील अनेक सदस्यांना या संमेलनाच्या निमित्ताने अनेक वर्षांनंतर एकमेकांना भेटण्याची आणि जुन्या आठवणींना उजाळा देण्याची संधी मिळाली. त्यामुळे हे संमेलन केवळ दिवाळी स्नेहमेळावा न राहता समाजातील एकोपा, आपुलकी आणि बंधुभाव वृद्धिंगत करणारे व्यासपीठ ठरले. या प्रसंगी श्री देवकीनंदन जिंदल, सुरेश भगेरिया, डॉ. श्याम अग्रवाल, डॉ. अनिल काशी मुरारका, रमाकांत टिबडेवाला, जगदीश गुप्ता, राज दीदी, श्यामसुंदर पंसारी, जयकुमार गुप्ता, अनिल कैंया, रमन अग्रवाल, बंकेश अग्रवाल, कृष्णकुमार झुनझुनवाला, अनिल पाटोदिया, डालचंद गुप्ता, विजय केडिया, वीरेंद्र याज्ञनिक, प्रदीप पंसारी, सज्जन गोयनका, डॉ. राहुल मोदी, डॉ. रोहित मोदी, डॉ. राजेश हिम्मतरामका, श्रीराम शर्मा, सुनील गोयल, लालचंद चौधरी, मधू महेश्वरी, मनोज सिंगडोदिया, उमेश मोदी, प्रदीप बंका, हरिप्रसाद अग्रवाल, दीनबंधु जालान, विष्णु मुरारका, श्रीकांत अग्रवाल, रामस्वरूप अग्रवाल, स्वदेश खेतावत, प्रवीण मुकीम, रमेश मोदी, प्रकाश रूईया, रवी खेतान, प्रकाश झुनझुनवाला यांच्यासह समाजातील अनेक प्रतिष्ठित मान्यवर उपस्थित होते. राजस्थानी मंडळ गोकुळधाम-यशोधाम यांच्या वतीने उपस्थित सर्व मान्यवरांचा सन्मान करण्यात आला.

संस्थेचे संस्थापक व मानद सचिव राजेंद्र तुलस्यान यांनी सर्व आगंतुकांचे आभार मानले. तसेच दीपावली आणि आगामी नवीन वर्ष प्रत्येकाच्या कुटुंबासाठी, व्यवसायासाठी व उद्योगासाठी सुख, समृद्धी आणि भरभराट घेऊन येवो, अशा शुभेच्छा दिल्या. या स्नेहसंमेलनामुळे राजस्थानी समाजातील सामाजिक एकोपा आणि परस्पर संबंध अधिक दृढ झाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

बोरीवलीत रंगली सुरेल दिवाळी पहाट – 'स्वरत्रिवेणी'

प्रतिनिधी
■ मुंबई

दिवाळीच्या मंगलमय पहाटे संगीतप्रेमी रसिकांसाठी एक अनोखी संगीत मेजवानी 'अनुबोध' व 'नवचैतन्य प्रतिष्ठान' यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार, 10 नोव्हेंबर रोजी घेऊन आले होते. बोरीवली येथील प्रबोधनकार ठाकरे नाट्यमंदिरात दिवाळी पहाट 'स्वरत्रिवेणी' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



या कार्यक्रमात ख्यातनाम गायिका गानसाम्राज्ञी लता मंगेशकर, आशा भोसले, आणि सुमन कल्याणपूर यांच्या अविस्मरणीय आणि लोकप्रिय गीतांचा सुरेल नजराणा बोरीवलीकर रसिकांनी अनुभवला. या दिग्गज गायिकांच्या अजरामर गीतांना आपल्या सुमधुर आवाजात सादर केले गायिका अर्चना गोरे, धनश्री देशपांडे, मधुरा कुंभार, व गायक शार्दुल कवठेकर यांनी. यावेळेस या स्वरत्रयीची अनेक उत्तमोत्तम गाणी रसिकांना ऐकता आली. *ऋतू हिरवा, जिवलगा, मलमली तारुण्य माझे, झिमझिम झरती श्रावण धारा, परवशता पाश दैवे या गाण्यांनी गान रसिकांची विशेष दाद मिळवली. अभिनेता व निवेदक विघ्नेश जोशी यांच्या रसाळ निवेदनातून कार्यक्रम उत्तरोत्तर रंगत गेला. कार्यक्रमाची सांगता ने मजसी ने या गीताने झाली कार्यक्रमाचे संगीत संयोजन संजय मराठे यांनी केले. या सुरेल संगीत सोहळ्याचे आयोजन भूषण पाटील, सुबोध खेर, अनुप चलकरण, मनोज नायर व अनिल परब यांनी केले. या अनोख्या संगीत सोहळ्याला मोठ्या संख्येने बोरिवलीकर रसिक श्रोते उपस्थित होते.

पुण्यात गुन्हेगार 'लाल्या येवले'ची करून हत्या

पुणे : पुणे आणि मुंबईत गुन्हेगारीच्या घटनांनी पुन्हा एकदा खळबळ उडाली आहे. पुण्यातील कोथरूड परिसरात पूर्ववैमनस्यातून सराईत गुन्हेगार प्रकाश ऊर्फ लाल्या येवले याची धारदार शस्त्रांनी वार करून निर्घृण हत्या करण्यात आली. दुचाकीवरून जात असताना हल्लेखोरांनी त्याला रस्त्यात अडवून तलवार, कोयते आणि लोखंडी हत्यारांनी हल्ला केला. या संपूर्ण हल्ल्याचा थरार परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला असून, त्याचे फुटेज समोर आले आहे. दुसरीकडे, मुंबईतील कुर्ला परिसरातही जुन्या वादातून गोळीबाराची घटना घडली. या गोळीबारात विनोद पवार यांचा मृत्यू झाला.

प्रतिनिधी
■ मुंबई

अमेझॉन पेकडून 'इम्पॉसिबल ट्रॅव्हल डील्स २०२६' ची घोषणा

amazon pay

अमेझॉन पेने आज आपला प्रमुख सेल 'इम्पॉसिबल ट्रॅव्हल डील्स'च्या पुनरागमनाची घोषणा केली. १२ नोव्हेंबर ते २६ नोव्हेंबर २०२६ या १५ दिवसांच्या कालावधीत चालणाऱ्या या महासेलमध्ये ग्राहकांना देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय विमान प्रवास तसेच हॉटेल बुकिंगवर विमानांच्या तिकिटांवर ३०% पर्यंत आणि ५-स्टार हॉटेल्सवर ६५% पर्यंत मोठी सवलत मिळणार आहे.

ग्राहक लोकप्रिय आंतरराष्ट्रीय स्थळांसाठी आकर्षक भाड्यांचे पर्याय शोधू शकतात, ज्यामध्ये दिल्ली ते बँकॉक १२,२९९ रुपयांपासून, मुंबई ते दुबई १३,९९९ रुपयांपासून आणि कोलकाता ते हो ची मिन्ह सिटी १५,५९९ रुपयांपासून तिकिटे उपलब्ध आहेत. देशांतर्गत प्रवासासाठी ग्राहक मुंबई ते गोवा ३,०९९ रुपयांपासून, बेंगळुरू ते कोची ४,१९९ रुपयांपासून आणि मुंबई ते दिल्ली ६,०९९ रुपयांपासून तिकिटे बुक करू शकतात. हॉटेल बुकिंगसाठी ग्राहकांना ६५ टक्क्यांपर्यंत सवलतींसह ५-स्टार हॉटेल्समधून निवड करता येईल. यामध्ये ड्युसिट थानी दुबई येथे ६,६४९ रुपयांपासून, कार्लटन सिटी हॉटेल सिंगापूर येथे १५,०८९ रुपयांपासून, तसेच गोव्यातील हॉटेल्स ४,८९९ रुपयांपासून आणि कोचीमधील हॉटेल्स ३,५४९ रुपयांपासून उपलब्ध असलेल्या प्रमुख ऑफर्सचा समावेश आहे. सेलची सुरुवात १२-१३ नोव्हेंबर दरम्यान 'अर्ली बर्ड' ऑफरने होईल, तर १४ नोव्हेंबरपासून विशेष कॅशबॅक ऑफर्स प्रथमच बुकिंग करणाऱ्या ग्राहकांसाठी उपलब्ध असतील.

शिपरॉकेटची दुस-या तिमाहीत दमदार कामगिरी

३५% च्या महसुली वाढीसह कंपनी नफ्यात

Shiprocket

प्रतिनिधी
■ मुंबई

भारतातील सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांसाठी (एमएसएमई) सर्वात मोठा ई-कॉमर्स इनेबलमेंट प्लॅटफॉर्म असलेल्या शिपरॉकेटने ३० सप्टेंबर २०२६ रोजी संपलेल्या दुसऱ्या तिमाहीचे अनअऑडिटेड आर्थिक निकाल जाहीर केले आहेत. कंपनीने कामकाजातील महसुलात ३५% ची जोरदार वाढ नोंदवत ६,७३६ दशलक्ष रुपयांचा टप्पा गाठला आहे. तसेच तोट्यातून बाहेर पडत कंपनीने ६ दशलक्ष रुपयांचा करानंतरचा निव्वळ नफा मिळवला आहे.

कंपनीच्या या प्रगतीत कोर आणि इमर्जिंग या दोन्ही बिझनेस सेगमेंटचा महत्त्वपूर्ण वाटा राहिला आहे. कोर बिझनेसने ४,६१५ दशलक्ष रुपयांचा महसूल मिळवला, तर इमर्जिंग बिझनेस ६१% नी वाढून २,१२२ दशलक्ष रुपयांवर पोहोचला. क्विक-कॉमर्स प्लॅटफॉर्म्सच्या डार्क स्टोअर्सच्या मागणीनुसार री-स्टॉकिंगमुळे ओम्नीचॅनेल विभागात ७९% आणि मारटेक (फास्टर) विभागात १०२% ची मोठी वाढ नोंदवली गेली आहे.

दहिसरच्या स्वामीनारायण (जाप्स) मंदिरात गोवर्धन उत्सव मोठ्या थाटामाटात साजरा

प्रतिनिधी
■ मुंबई

दिवाळीच्या नवीन विक्रम संवत वर्ष - २०८३ च्या बलिप्रतिपदा या पावन पर्वाच्या निमित्ताने दहिसरमधील आनंद नगर, बाभळी पाडा जवळील जागा स्वामी अक्षर पुरुषोत्तम स्वामीनारायण (जाप्स) मंदिरात अन्नकूट उत्सवाचे भव्य आयोजन करण्यात आले होते. मंदिराचे संस्थापक पू. सच्चिदानंद स्वामी यांचे पट्टशिष्य संत श्री योगीजी तसेच संत महानुभवानंद (मोठे स्वामी), संत घनश्याम प्रसाद स्वामी आणि संत मित्री स्वामी यांच्या सान्निध्यात हरिभक्तांनी सत्संग सभाचा लाभ घेतला.



या प्रसंगी भगवान श्री स्वामीनारायण यांना सुंदर वस्त्रांनी सजवण्यात आले होते. बी. जाप्स परिवारातील सर्व हरिभक्त आणि महिला मंडळातर्फे गोवर्धन पूजा व अन्नकूटसाठी १,१११ (1,111) प्रकारचे खाद्यपदार्थ बनवण्यात आले होते, ज्यामध्ये विविध प्रकारचे फराळ, मिठाई, भाज्या, चटणी, लोणची, फरसाण, सरबते, फळे, पान-मुखवास, चॉकलेट इत्यादी साहित्याचे ताट देवाला अर्पण करण्यात आले. संत श्री योगीजी यांनी आपल्या मधुर वाणीने साक्षात भगवंताने साजऱ्या केलेल्या उत्सवाचे निरूपण करून महाआरती केली आणि सर्व हरिभक्तांना नवीन वर्षाचा आशीर्वाद दिला. बाल मंडळ आणि तरुण मंडळाने कीर्तन सादर केले.

तळलेले मसालेदार पदार्थ आरोग्यदायी पौष्टिक खाद्यपदार्थांच्या यादीत

■ मुंबई

महाराष्ट्र सरकारच्या मंत्रालये आणि सरकारी कार्यालयांच्या कॅन्टीनमध्ये आता कर्मचारी आणि अधिकाऱ्यांना चहा आणि नाश्त्यासाठी केवळ फळे, उकडलेली कडधान्ये किंवा हलके पदार्थच नव्हे, तर गरमागरम समोसे, भजी, कचोऱ्या आणि ब्रेड पकोड्यांचाही आस्वाद घेता येणार आहे. विशेष म्हणजे, सरकारने या तळलेल्या आणि मसालेदार पदार्थांचा आरोग्यदायी आणि पौष्टिक खाद्यपदार्थांच्या यादीत समावेश केला आहे. राज्याच्या सामान्य प्रशासन विभागाने या संदर्भात एक शासन निर्णय (GR) जारी केला असून, सचिवालय, विधान भवन आणि कोकण भवन येथील कॅन्टीनच्या मेन्यूमध्ये 54 नवीन खाद्यपदार्थांचा समावेश करण्यास मंजुरी दिली आहे. आदेशासोबत प्रसिद्ध झालेल्या यादीच्या पहिल्या भागात कॉकटेल समोसा, मूग डाळ भजी, पंजाबी समोसा आणि ब्रेड पकोडा यांसारख्या मसालेदार पदार्थांसह सर्व पदार्थांना पौष्टिक आणि आरोग्यदायी अन्न म्हणून वर्गीकृत केले आहे.

राज्य सरकार सामान्य प्रशासनाचा जी.आर.

विदर्भातील प्रसिद्ध शेगाव कचोरीचाही या यादीत समावेश आहे. यासाठी कर्मचाऱ्यांना प्रति नग 30 रुपये आणि अधिकाऱ्यांना प्रति नग 35 रुपये द्यावे लागतील. याव्यतिरिक्त, चीज सँडविच, व्हेजिटेबल पोटॅटो शॉट्स, आलू टिक्की, पाव भाजी आणि पोटॅटो रोल यांसारखे पदार्थही सरकारी कॅन्टीनच्या मेनूचा भाग असतील.

'माझी छोटी आजी'तून उलगडले बाप-लेकीच्या नात्यातील भावविश्व...

प्रतिनिधी
■ मुंबई

डॉ. बाळू दत्तात्रय राठोड यांच्या 'माझी छोटी आजी -बाप-लेकीच्या बालपणातल्या गप्पा' या पुस्तकाचे प्रकाशन एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या प्रभारी कुलगुरू कर्नल प्रा. हेमलता के. बागला यांच्या हस्ते नुकतेच पार पडले. ओंकार प्रकाशन संस्थेने हे पुस्तक प्रकाशित केले आहे. या प्रकाशन सोहळ्याला विद्यापीठाचे प्रभारी प्र-कुलगुरू विलास नांदवडेकर, आस्थापना विभागाचे उपकुलसचिव राकेश वळवी, डॉ. संजय शेडमाके यांची प्रमुख उपस्थिती होती.

'माझी छोटी आजी' हे पुस्तक म्हणजे एका वडिलांनी आपल्या मुलीसोबत अनुभवलेल्या निरागस क्षणांचे, छोट्या छोट्या संवादांचे आणि भावविश्वाचे शब्दरूप आहे. बाळू राठोड हे एसएनडीटी महिला विद्यापीठ चंद्रपूर कॅम्पसचे उपकुलसचिव म्हणून कार्यरत आहे. मुलीच्या 'पप्पा, एक सांगू?' या सहज, निरागस प्रश्नापासून सुरू होणारा हा बाप-लेकीच्या गप्पांचा प्रवास वाचकांना बालपणाच्या रम्य जगात घेऊन जातो. मुलांचे निरागस प्रश्न, हट्ट, रुसवे-फुगवे, खोड्या, हसण्याचे क्षण, त्यांच्या कल्पनाविश्वातील गमतीजमती आणि कुटुंबातील जिव्हाळ्याचे संवाद यांचे लेखकाने अत्यंत संवेदनशीलपणे चित्रण केले आहे.



डॉ. बाळू राठोड लिखित पुस्तकाचे प्रकाशन

या पुस्तकाचे वैशिष्ट्य म्हणजे यात केवळ एका बाप-लेकीच्या आठवणी नाहीत, तर प्रत्येक कुटुंबात घडणाऱ्या छोट्या छोट्या प्रसंगांचे प्रतिबिंब आहे. मुलांच्या बोलण्यातून व्यक्त होणारे निरागस शहाणपण, त्यांच्या भावविश्वातील अनोखे विचार आणि पालकत्वाच्या प्रवासात नकळत जपल्या जाणाऱ्या आठवणी यांचा सुंदर पट या पुस्तकातून उलगडतो. दैनंदिन जीवनातील साधे प्रसंगही किती अर्थपूर्ण आणि अविस्मरणीय असू शकतात, याची जाणीव हे लेखन करून देते. आजच्या धावपळीच्या आणि डिजिटल युगातील जीवनशैलीत पालक आणि मुलांमधील संवादाचे महत्त्व अधोरेखित करणारे हे पुस्तक असल्याचे लेखक बाळू राठोड यांनी सांगितले.

यावेळी प्रभारी कुलगुरू प्रा. हेमलता के. बागला यांनी बालपणीच्या निरागस आठवणी आणि बाप-लेकीच्या नात्यातील भावनिक ओलावा लेखनातून सुंदररीत्या व्यक्त केल्याबद्दल लेखकाचे अभिनंदन केले. प्रभारी प्र-कुलगुरू विलास नांदवडेकर यांनीही पुस्तकाच्या आशयाचे कौतुक केले.

मुंबई : दिवाळी पाडवा आणि बलिप्रतिपदा या नुतनवर्षाच्या मंगलमय निमित्ताने नायगावचे कट्टर शिवसैनिक सुरेश गणपत काळे यांनी मातोश्री निवासस्थानी ठाकरे शिवसेना पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांना शुभेच्छा दिल्या आणि वंदनीय हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख श्रीमान बाळासाहेब ठाकरे यांना विनम्र अभिवादन केले.बाळासाहेबांनी दिलेले विचार, शिवसेनेचा भगवा आणि ठाकरे घराण्याशी असलेली निष्ठा ही केवळ राजकीय भूमिका नाही, तर आमच्यासाठी ती अस्मिता, स्वाभिमान आणि आयुष्यभर जपायची बांधिलकी आहे.वादळे कितीही आली, परिस्थिती कितीही बदलली, प्रलोभने कितीही आली तरी विचारांशी आणि निष्ठेशी कधीही तडजोड नाही!कारण...आम्ही सत्तेसाठी नाही, तर साहेबांच्या विचारांसाठी आहोत. आम्ही सोयीने भूमिका बदलणारे नाही, तर निष्ठेने शेवटपर्यंत साथ देणारे आहोत! शिवसेनेचा भगवा हाच अभिमान, ठाकरे हेच श्रद्धास्थान आणि निष्ठा हाच आमचा स्वाभिमान! अहं... निष्ठेची तडजोड नाही!आम्ही निष्ठावंत होतो, आहोत आणि कायम राहणार असे वचन उपस्थितांनी पक्षप्रमुखांना दिले.



'मुंबईचा राजा' च बनणार 'पलटन'चा कॅप्टन

प्रतिनिधी
■ मुंबई



मुंबई इंडियन्स आणि पंजाब किंग्स यांच्यातील खेळाडूंची ट्रेड चर्चेचा विषय ठरला आहे. दोन्ही संघांमधील खेळाडूंची ट्रेड बुधवारी अधिकृतपणे पूर्ण झाली. हार्दिक पांड्या पंजाब किंग्समध्ये सामील झाला, तर अर्शदीप सिंग पाच वेळा चॅम्पियन ठरलेल्या मुंबई इंडियन्समध्ये दाखल झाला. हार्दिक गेल्या तीन हंगामांपासून मुंबईचे कर्णधारपद भूषवत होता आणि आता त्याच्या जाण्याने संघाला एका कर्णधाराची गरज भासेल. कर्णधारपदाच्या शर्यतीत तिलक वर्मा आणि सूर्यकुमार यादव असू शकतात, पण सर्वांचे लक्ष रोहितवर आहे, जो या फ्रँचायझीचा दीर्घकाळचा कर्णधार असून त्याने संघाला पाच विजेतेपदे मिळवून दिली आहेत.

रोहित सध्या न्यूझीलंडच्या दौऱ्यावर आहे, जिथे भारतीय संघ पाच एकदिवसीय सामन्यांची मालिका खेळत आहे. हॅमिल्टन येथे तिसरा एकदिवसीय सामना पावसामुळे रद्द झाल्यानंतर रोहित शर्मा न्यूझीलंडच्या खेळाडूंना भेटत असल्याचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. यावेळी रोहित न्यूझीलंडचा कर्णधार मिचेल सँटनरला म्हणाला, "हॅलो मिची." मिचेलने उत्तर दिले, "हॅलो, कॅप्टन." मिचेल सँटनरच्या या वक्तव्यामुळे सोशल मीडिया वापरकर्त्यांमध्ये अशी अटकळ बांधली जात आहे की, रोहित पुढच्या हंगामात मुंबईचा कर्णधार होऊ शकतो.

भारत पाक पुन्हा आमने सामने, टीम इंडियाकडे बदला घेण्याची संधी, जेतेपदासाठी रंगणार सामना...

वृत्तसंस्था
■ ओमान



ओमानमध्ये खेळल्या जात असलेल्या १९ वर्षांखालील आशिया कप २०२६ मध्ये भारतीय युवा संघाने आपले वर्चस्व सिद्ध करत उपांत्य फेरीत स्थान मिळवले आहे. गट फेरीतील एका महत्त्वपूर्ण आणि निर्णायक सामन्यात, भारतीय संघाने युएईच्या १९ वर्षांखालील संघाचा तब्बल ७० धावांनी पराभव केला. युएईवरील या एकतर्फी आणि दणदणीत विजयामुळे भारतीय संघाने बाद फेरीतील आपले स्थान निश्चित केले आहे. भारताच्या या विजयामुळे, विजेतेपदाच्या सामन्यात भारत आणि पाकिस्तान यांच्यातील संभाव्य लढतीबद्दल संपूर्ण क्रिकेट जग पुन्हा एकदा उत्साहाने भारले आहे.

जर भारतीय संघाने उपांत्य फेरीत अफगाणिस्तानला हरवले आणि दुसरीकडे पाकिस्तानने बांगलादेशवर विजय मिळवला, तर भारत आणि पाकिस्तान पुन्हा एकदा १९ वर्षांखालील आशिया कप २०२६ च्या अंतिम सामन्यात आमनेसामने येतील.

जर दोन्ही संघांनी आपापले उपांत्य सामने जिंकून अंतिम फेरीत प्रवेश केला, तर ही लढत केवळ आशिया कप ट्रॉफीसाठीची लढाई नसेल, तर भारताला हिशोब चुकता करण्यासाठी एक मोठे व्यासपीठही उपलब्ध करून देईल. याच स्पर्धेच्या गट टप्प्यात ८ नोव्हेंबर रोजी झालेल्या एका रोमांचक सामन्यात पाकिस्तानने भारताला ३ गडी राखून पराभूत केले होते. त्या पराभवानंतर, भारतीय संघाने युएईविरुद्ध एक उल्लेखनीय पुनरागमन केले होते. आता, भारतीय संघाला त्या पराभवाचा बदला घेण्याची आणि विजेतेपदाच्या सामन्यात पाकिस्तानला हरवून चॅम्पियन बनण्याची एक मोठी संधी दिली आहे.

युएईविरुद्धच्या ७० धावांच्या मोठ्या विजयाने भारतीय ड्रेसिंग रूमचा आत्मविश्वास वाढवला आहे. भारताचे आघाडीचे फलंदाज फॉर्मात परतले आहेत, त्याचबरोबर त्यांच्या गोलंदाजांनीही आपल्या भेदक गोलंदाजीने प्रतिस्पर्धी संघाला सावध केले आहे. जगभरातील क्रिकेट चाहत्यांचे लक्ष आता या दोन उपांत्य फेरीच्या सामन्यांवर केंद्रित झाले आहे. भारत आणि पाकिस्तानने आपले सामने जिंकून अंतिम फेरीत पोहोचावे, जेणेकरून त्यांना २०२६ सालचा सर्वात रोमांचक ज्युनियर क्रिकेट सामना पाहता येईल अशी चाहत्यांची इच्छा आहे.

भारताविरुद्ध कसोटी मालिकेसाठी न्यूझीलंडचा संघ जाहीर

दुखापतीतून सावरून रचिन रवींद्रचे पुनरागमन

वृत्तसंस्था
■ वेलिंग्टन

भारताविरुद्ध १९ नोव्हेंबरपासून वेलिंग्टन येथे सुरू होणाऱ्या दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेसाठी न्यूझीलंडने १४ सदस्यीय संघ जाहीर केला आहे. संघात अष्टपैलू रचिन रवींद्रचे पुनरागमन झाले आहे. सप्टेंबरमध्ये एका प्रमोशनल शूटदरम्यान डाइव्ह मारताना त्याचा उजवा खांदा निखळला होता. या दुखापतीमुळे तो भारताविरुद्धच्या टी-२० आणि एकदिवसीय मालिकेत खेळू शकला नव्हता. केन विल्यमसनच्या अनुपस्थितीत टॉम लॅथम संघाचे नेतृत्व करेल.

न्यूझीलंड क्रिकेटनुसार, रचिनसोबत डेव्हॉन कॉनवे आणि यष्टिरक्षक टॉम ब्लंडेलही आपल्या दुखापतींतून सावरत आहेत. एकदिवसीय मालिकेपूर्वी सरावादरम्यान कॉनवेला डोक्याला दुखापत झाली होती, तर ब्लंडेल क्वाड्रिसेप्सच्या दुखापतीतून सावरत आहे. तिन्ही खेळाडू पहिल्या कसोटीसाठी उपलब्ध होण्याचा प्रयत्न करत आहेत.

ब्लंडेलला ५०वा कसोटी सामना खेळण्याची संधी

टॉम ब्लंडेलने भारताविरुद्ध दोन्ही कसोटी सामने खेळले, तर तो न्यूझीलंडसाठी ५० कसोटी सामने खेळणारा यष्टिरक्षक फलंदाज बनेल. मात्र, पहिल्या कसोटीत त्याचा सहभाग फिटनेसवर अवलंबून असेल.

इंग्लंड दौऱ्यावर गेलेल्या संघात एक बदल

न्यूझीलंडचा संघ बहुतांश जूनमध्ये इंग्लंडला त्यांच्याच मायभूमीत २-१ ने पराभूत करणाऱ्या संघासारखाच आहे. केन विल्यमसन आणि वेगवान गोलंदाज विल ओ'रुर्क, बेन सीअर्स व जॅक फॉल्क्स या संघाचा भाग नाहीत. विल ओ'रुर्कच्या कामाच्या ताणाचे व्यवस्थापन केले जात आहे, तर सीअर्स घोट्याच्या आणि फॉल्क्स कंबरेच्या दुखापतीतून सावरत आहेत. वेगवान गोलंदाज जेकब डफी हे संघातील नवे नाव आहे. पितृत्व रजेच्या कारणामुळे ते इंग्लंड दौऱ्यावर गेले नव्हते.

बीजे वॉटलिंग न्यूझीलंडचे नवे फलंदाजी प्रशिक्षक

न्यूझीलंडचे माजी यष्टीरक्षक फलंदाज बीजे वॉटलिंग संघाचे नवे फलंदाजी प्रशिक्षक असतील. ते ल्यूक रोंची यांची जागा घेतील. पहिल्या कसोटी सामन्याच्या तीन दिवस आधी, सोमवारी वॉटलिंग संघासोबत जोडले जातील.

WTC अंतिम सामन्याच्या शर्यतीसाठी महत्त्वाची मालिका

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील ही मालिका वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप (WTC) 2025-27 च्या दृष्टीने महत्त्वाची आहे. न्यूझीलंड सध्या गुणतालिकेत पहिल्या स्थानावर आहे, तर दक्षिण आफ्रिका आणि ऑस्ट्रेलियाही त्याच्या जवळ आहेत. भारत चौथ्या स्थानावर आहे. जून 2027 मध्ये होणाऱ्या अंतिम सामन्याच्या शर्यतीत कायम राहण्यासाठी भारताला उर्वरित सात कसोटी सामन्यांपैकी बहुतेक सामने जिंकावे लागतील.

न्यूझीलंडचा 14 सदस्यीय संघ

टॉम लॅथम (कर्णधार), टॉम ब्लंडेल (यष्टीरक्षक), डेव्हॉन कॉनवे, जेकब डफी, मॅट हेन्री, काइल जेमिसन, डॅरिल मिचेल, हेन्री निकोल्स, ग्लेन फिलिप्स, रचिन रवींद्र, मिचेल सँटनर, नॅथन स्मिथ, ब्लेअर टिकनर आणि विल यंग.

कौशल्या बरोबरच मेहनत, शिस्त आणि समर्पण आवश्यक - वेंगसरकर

प्रतिनिधी
■ मुंबई



क्रिकेटचा कुठलाही सामना खेळत असताना फलंदाजीत शतकी खेळी कशी करता येईल आणि गोलंदाजीत ५ बळी कसे मिळविता येतील ते शिकून घ्या असे मुंबईच्या १९ वर्षाखालील निवड समितीचे चेअरमन मंदार फडके यांनी म्हटले आहे. चेंबूर, माहुल येथील वेंगसरकर क्रिकेट अकादमीच्या मैदानावर झालेल्या ए . वाय. एम. सिंटेक्स चषक १६ वर्षाखालील मुलांच्या क्रिकेट स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभात ते बोलत होते. आम्ही निवड समिती म्हणून काम करताना कोणता खेळाडू फलंदाजीत सातत्य राखताना मोठ्या शतकी खेळी करतो किंवा कोणते गोलंदाज ५ किंवा अधिक बळी मिळवत आहेत हेच पाहतो असेही ते पुढे म्हणाले.

भारताचे माजी कर्णधार दिलीप वेंगसरकर यांनी देखील तोच मुद्दा पुढे नेताना खेळाडूंकडे नुसते क्रिकेट कौशल्य असून उपयोग नाही तर त्याच्या जोडीला कठोर मेहनत करण्याची तयारी, शिस्त आणि खेळातील समर्पणाची भावना असेल तरच तो खेळाडू यशोशिखरापर्यंत पोहोचू शकतो असे सांगितले.

तत्पूर्वी या स्पर्धेच्या अंतिम सामन्यात क्रिकेट मंत्रास संघाने सुलक्षण कुलकर्णी क्रिकेट अकादमी संघावर ३ विकेट्सने विजय मिळवत स्पर्धेचे अजिंक्यपद पटकावले. प्रथम फलंदाजी करणारा सुलक्षण कुलकर्णी क्रिकेट संघ ४० षटकांच्या सामन्यात २२.४ षटकांतच केवळ ८७ धावांत गारद झाला. स्वर भोसले याने ३५ धावांत ५ बळी तर शौर्य नवले याने २६ धावांत ४ बळी मिळवत ही करामत केली. हर्ष मेनन (१२), धीर छाजेर (११) आणि अर्णव कोरे (नाबाद १५) यांनाच होती. मात्र शौर्य नवले याने नाबाद १२ धावा करून आपल्या संघाचा विजय निश्चित केला. सुलक्षण कुलकर्णी क्रिकेट अकादमीच्या तनिश साळी (२० धावांत ४ बळी) आणि आर्यन मंदोरा (१९ धावांत ३ बळी) यांनी टिच्चून गोलंदाजी केली, मात्र संघाला विजयी करण्यात त्यांचे प्रयत्न अपुरे ठरले.

सामन्यातील सर्वोत्तम खेळाडू माहुल), सर्वोत्तम गोलंदाज म्हणून आर्यन मंदोरा (सुलक्षण कुलकर्णी क्रिकेट अकादमी) आणि सर्वोत्तम क्षेत्ररक्षक म्हणून नील भट्ट (क्रिकेट मंत्रास) यांना गौरविण्यात आले. मुंबईच्या १९ वर्षाखालील निवड समितीचे चेअरमन मंदार फडके आणि भारताचे माजी कर्णधार दिलीप वेंगसरकर यांच्या हस्ते विजेत्यांना गौरविण्यात आले.

संक्षिप्त धावफलक - सुलक्षण कुलकर्णी क्रिकेट अकादमी - २२.४ षटकांत सर्वबाद ८७ (हर्ष मेनन १२, धीर छाजेर ११, अर्णव कोरे नाबाद १५; स्वर भोसले ३५ धावांत ५ बळी, शौर्य नवले २६ धावांत ४ बळी) पराभूत वि. क्रिकेट मंत्रास - २२.४ षटकांत ७ बाद ८८ (धार्मिक प्रभू २६, नील भट्ट १३, अर्णव पारेख १२, शौर्य नवले नाबाद १२ ; तनिश साळी २० धावांत ४ बळी, आर्यन मंदोरा १९ धावांत ३ बळी) - सामनावीर - स्वर भोसले

वर्ल्डकपनंतरचे 2 महिने कठीण गेले, कर्णधारपद गेले, संघातूनही बाहेर - सूर्यकुमार

मुलीच्या जन्मानंतर नव्या भरारीची प्रेरणा

प्रतिनिधी
■ मुंबई



टीम इंडियाला सलग दोन टी-20 विश्वचषक जिंकून देणाऱ्या सूर्यकुमार यादवने कबूल केले की, 2026 च्या विश्वचषकानंतरचे सुरुवातीचे दोन महिने त्याच्यासाठी कठीण होते. मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या एका कार्यक्रमात 36 वर्षीय सूर्यकुमारने या कालखंडाबद्दल संवाद साधला. त्याने सांगितले की, मे महिन्यात आयपीएलदरम्यान मुलीचा जन्म झाल्याने त्याचे लक्ष बदलले आणि तिच्यासोबत घालवलेले मागील काही महिने अत्यंत सुंदर होते.या घटनेनंतर आपल्याला नव्या भरारीची प्रेरणा मिळाल्याचे सूर्या म्हणाला.

सूर्यकुमारची 2022 आणि 2023 मध्ये ICC टी-20 आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू ऑफ द इयर म्हणून निवड झाली होती. 2022 मध्ये तो ICC टी-20 फलंदाजी क्रमवारीत जगातील क्रमांक-1 फलंदाजही ठरला होता.

सूर्यकुमारने २०२४ मध्ये भारताच्या टी-२० संघाचे कर्णधारपद स्वीकारले होते. त्यांच्या नेतृत्वाखाली संघाने सलग आठ द्विपक्षीय मालिका जिंकल्या आणि एक मालिका अनिर्णित राहिली. त्यांच्या नेतृत्वाखाली भारताने २०२५ चा आशिया कपही जिंकला. त्यानंतर मार्च २०२६ मध्ये मायदेशात टी-२० विश्वचषकाचे विजेतेपद राखत इतिहास रचला. भारत सलग दोनदा ही स्पर्धा जिंकणारा पहिला संघ ठरला.मात्र या यशानंतर काही काळातच संघात मोठा बदल झाला. आयपीएलनंतर भारताच्या पुढील टी-२० मालिकेसाठी श्रेयस अय्यरची कर्णधार म्हणून निवड करण्यात आली आणि सूर्यकुमारची संघातही निवड झाली नाही.

सूर्यकुमारने यापूर्वीही या निर्णयाबद्दल निराशा व्यक्त केली होती. त्यांनी म्हटले होते की, दोन वर्षे संघाने एकही मालिका न गमावणे, आशिया कप आणि विश्वचषक जिंकणे यानंतर कर्णधारपदात बदल करण्याचे कारण त्यांना समजले नाही. मात्र, निवड समितीने या बदलामागचे कोणतेही स्पष्ट कारण सांगितले नाही. त्याच्या अलीकडील कामगिरीतील घसरणही चर्चेचा विषय ठरली. 2026 टी-20 वर्ल्ड कपमध्ये त्यांनी 242 धावा केल्या होत्या, तर IPLमध्ये त्याच्या फलंदाजीतून 270 धावा निघाल्या.

पत्नीशी बोलून क्रिकेटमध्ये परतलो

सूर्यकुमार यांनी सांगितले की, IPLनंतरचे सुरुवातीचे दोन महिने त्यांच्यासाठी सर्वांत कठीण होते. या काळात त्यांनी आपल्या पत्नीशी बोलून क्रिकेटला सुरुवात करताना त्यांचे स्वप्न काय होते, याचा विचार करण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी त्यांना मुंबईसाठी वयोगटातील म्हणजेच अंडर-एज क्रिकेट खेळायचे होते. त्यानंतर मुंबईकडून फर्स्ट क्लास क्रिकेट खेळणे हे त्यांचे लक्ष्य बनले.त्यांच्या पत्नीनेही त्यांना वयाच्या १५व्या वर्षी मुंबईचे प्रतिनिधित्व करण्याचे स्वप्न पाहताना असलेले तेच जुने प्रेम आणि उत्कटता पुन्हा जागवण्याचा सल्ला दिला. सूर्यकुमार यांनी सांगितले की, त्यांनी १०-१५ वर्षांपूर्वी जसे प्रशिक्षण घेतले होते, तसेच पुन्हा प्रशिक्षण सुरू केले. त्यांचे म्हणणे आहे की, जेव्हा खेळाडूचे लक्ष खेळावर केंद्रित असते आणि त्याला आपल्या संघासाठी व कुटुंबासाठी चांगली कामगिरी करायची असते, तेव्हा गोष्टी बदलू लागतात. आता ते याच विचाराने पुढे जात आहेत. ४ दिवसांपूर्वी सूर्याने PM मोदींची भेट घेतली होती. त्यावेळी त्याच्यासोबत पत्नी देविशा शेट्टी आणि मुलगी रिद्धिमाही उपस्थित होत्या.

पायाला प्लॅस्टर लावलेला रुग्ण जेव्हा केईएममध्ये लिफ्टअभावी सरकत सरकत जिने उतरतो तेव्हा...

प्रतिनिधी
■ मुंबई

आशिया खंडात सर्वात मोठी व श्रीमंत असेलेल्या मुंबई महानगपालिकेच्या रुग्णालयातील आरोग्य सेवेसाठी महानगपालिका ७ हजार कोटीहून अधिक रुपये खर्च करते.पण हा खर्च नेमका कुठे खर्च होतो हा संधोधनाचा विषय झाला आहे. लिफ्ट बंद पडल्यामुळे पायाला प्लास्टर लावलेल्या रुग्णाला अक्षरशः जिन्यावरून सरकत सरकत खाली उतरावे लागत असल्याचे दृश्य स्वतः पालिका आरोग्य समितीचे अध्यक्ष हरिष भांदिर्गे यांना बघावे लागल्याची घटनांघडली आहे.

केईएम रुग्णालयातील सेठ धुरमल बजाज अस्थिव्यंग केंद्रामध्ये रुग्णांना किती हाल सहन करावे लागत आहेत, याबाबतचे चित्रीकरणचे व्हिडिओ माझ्याकडे आहेत. ही अत्यंत खेदजनक बाब आहे. असे ते म्हणाले.

पायाला प्लास्टर असलेला एक वृद्ध रुग्ण जिन्याच्या पायऱ्यांवर बसून, एकेक पायरी घसरत खाली उतरत आहे. त्यांना व्हीलचेअर नाही, स्ट्रेचर नाही, आधाराला कर्मचारी नाही. बाजूने लोक ये-जा करत आहेत, पण कोणीही मदतीला येत नाही. प्लास्टर घातलेल्या पायाला धक्का लागला तर फ्रॅक्चर बिघडू शकते, रुग्ण पडू शकतो. आणि त्यांचा जीवही धोक्यात येऊ शकतो. आपण या आरोग्य व्यवस्थेवर हजारो कोटी रुपये खर्च करत असतो आणि जर आपण उपचार करण्यास येणाऱ्या रुग्णांसाठी लिफ्टची सुविधा देऊ शकत नसू तर ही अत्यंत लाजिरवाणी गोष्ट आहे. महापालिकेची प्रतिमा यामुळे मलिन होत असून याप्रकरणी यांत्रिक आणि विद्युत विभागाचे अधिकारी दोषी आहेत. असा आरोपही हरिष भांदिर्गे यांनी केला आहे. या लिफ्टचे मेंटेनेन्स का नाही झाले? जर लिफ्ट खराब झाली होती तर ती बदलण्यासाठी का प्रयत्न झाले नाही?. कुणी यांना या लिफ्टचे काम करू नका म्हणून सांगितले होते का? कुणी यांचे प्रस्ताव रोखून ठेवले होते का? असे सवालही त्यांनी उपस्थित केले.

खरं तर माझी कुणाला दोष देण्याची इच्छा नाही. पण यांत्रिक व विद्युत विभागाच्या अधिकाऱ्यांची ज्या प्रकारे मनमानी सुरू आहे, त्यामुळे के.ई.एम रुग्णालयाच्या आरोग्य व्यवस्थेवर परिणाम होतो. महापालिका रुग्णालयांची बदनामी होतो. यामुळे नाहक रुग्णांना त्रास सहन करावा लागतो. मग ती सेवा एम.आर.आय.ची असो सिटी स्कॅनची सेवा असो वा लिफ्टची सेवा असो.यामध्ये त्यांचे अजिबात लक्ष दिसून येत नाही. त्यामुळे सर्व प्रथम यांत्रिक व विद्युत विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांना त्वरित निलंबित करून त्यांना त्या पदावरून बाजूला करावे असे निर्देश सार्वजनिक आरोग्य समितीचे अध्यक्ष हरिष भांदिर्गे यांनी प्रशासनाला दिले आहेत.

गुरनूरला वनडे गोलंदाजी क्रमवारीत 60 स्थानांचा फायदा

फलंदाजांमध्ये टॉप-4 मध्ये तीन भारतीय

प्रतिनिधी
■ मुंबई

भारतीय वेगवान गोलंदाज गुरनूर ब्रारला ICCच्या ताज्या वनडे क्रमवारीत 60 स्थानांचा फायदा झाला आहे. तो गोलंदाजांच्या क्रमवारीत 48व्या क्रमांकावर पोहोचला आहे.

दरम्यान, फलंदाजांच्या क्रमवारीत भारताचे तीन खेळाडू टॉप-4मध्ये सामील आहेत. शुभमन गिल 822 रेटिंग गुणांसह पहिल्या स्थानावर कायम आहे. त्याच्याशिवाय विराट कोहली तिसऱ्या आणि रोहित शर्मा चौथ्या क्रमांकावर कायम आहेत. भारत आणि न्यूझीलंड यांच्यात सुरू असलेल्या वनडे मालिकेत गुरनूर ब्रारने शानदार गोलंदाजी केली आहे. त्याने 3 सामन्यांत 7 बळी घेतले आहेत. ब्रार याच्याव्यतिरिक्त अक्षर पटेललाही गोलंदाजी क्रमवारीत फायदा झाला आहे. तो 23 स्थानांनी वर चढून 21व्या क्रमांकावर पोहोचला आहे. अर्शदीप सिंह 11 स्थानांची झेप घेत संयुक्तपणे 31व्या क्रमांकावर आला आहे.

अफगाणिस्तानचा कसोटी आणि वनडे कर्णधार रहमत शाह ICCच्या कसोटी फलंदाजांच्या क्रमवारीत सातव्या क्रमांकावर पोहोचला आहे. ICCच्या पुरुष कसोटी क्रमवारीतील कोणत्याही श्रेणीच्या टॉप-10मध्ये स्थान मिळवणारा तो अफगाणिस्तानचा पहिला खेळाडू ठरला आहे. रहमतने झिम्बाब्वेविरुद्ध शारजाहमध्ये खेळल्या गेलेल्या पहिल्या कसोटीत १७३ धावा केल्या होत्या. हे त्याच्या कसोटी कारकिर्दीतील पाचवे शतक होते. या वर्षी त्याने दुसऱ्यांदा शतक झळकावले.

या कामगिरीच्या जोरावर त्याने क्रमवारीत ६ स्थानांची झेप घेत कारकिर्दीतील सर्वोत्तम रेटिंग मिळवले. त्याने भारतीय कर्णधार शुभमन गिलला मागे टाकले. झिम्बाब्वेचा अनुभवी फलंदाज क्रेग एर्विननेही शारजाह कसोटीत शानदार कामगिरी केली. त्याने दुसऱ्या डावात नाबाद २०६ धावा केल्या. यानंतर तो कसोटी फलंदाजांच्या क्रमवारीत ९ स्थानांनी वर चढून ४८व्या क्रमांकावर पोहोचला.

दिवाळीच्या कंदिलातून विद्यार्थ्यांनी दिला जलसंवर्धन आणि वृक्षसंवर्धनाचा संदेश

समता विद्या मंदिरच्या 50 हून अधिक विद्यार्थ्यांचा पर्यावरणपूरक उपक्रम

प्रतिनिधी
■ मुंबई



दिवाळी म्हटले की आकर्षक रंगीबेरंगी कंदील, रोषणाई आणि आनंदाचा उत्सव डोळ्यांसमोर येतो. मात्र, यंदा साकीनाका येथील समता विद्या मंदिर शाळेच्या विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेतून दिवाळीच्या कंदिलांना सामाजिक प्रबोधनाचे माध्यम बनवले आहे. कंदिलांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी जलसंवर्धन आणि वृक्षसंवर्धनाचा महत्त्वपूर्ण संदेश देत समाजाचे लक्ष पर्यावरणाच्या गंभीर प्रश्नांकडे वेधले आहे. यंदा महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली असून, पाण्याचे दुर्भिक्ष्य ही गंभीर समस्या बनली आहे. अशा परिस्थितीत पाण्याचा प्रत्येक थेंब वाचवणे किती महत्त्वाचे आहे, याची जाणीव करून देण्यासाठी शाळेतील 50 हून अधिक विद्यार्थ्यांनी स्वतःच्या हाताने दिवाळीचे कंदील तयार केले. या कंदिलांवर 'पाणी वाचवा, पाणी अडवा', अशा आशयाचे संदेश लिहून जलसंवर्धनाचे महत्त्व अधोरेखित केले आहे.

केवळ पाणी वाचवण्यापुरताच हा उपक्रम मर्यादित नसून, विकासाच्या नावाखाली होणारी वृक्षतोड थांबवण्याचे आवाहनही विद्यार्थ्यांनी केले आहे. देशाचा आणि राज्याचा विकास निश्चितच झाला पाहिजे; मात्र हा विकास करताना पर्यावरणाचा समतोल बिघडता कामा नये. झाडे तोडण्याऐवजी त्यांचे संवर्धन केले पाहिजे, असाही मोलाचा संदेश विद्यार्थ्यांनी आपल्या कंदिलांमधून दिला आहे.

शाळेचे सचिव राजेश सुभेदार यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी ही अभिनव संकल्पना प्रत्यक्षात आणली. सणाच्या आनंदासोबत सामाजिक आणि पर्यावरणीय जबाबदारीची जाणीव निर्माण करणारा हा उपक्रम विशेष कौतुकास्पद ठरत आहे. विद्यार्थ्यांच्या या छोट्याशा प्रयत्नातून 'पाणी वाचवा, झाडे जगवा आणि पर्यावरण जपा' हा मोठा संदेश समाजापर्यंत पोहोचत आहे. दिवाळीच्या रोषणाईसोबत सामाजिक जागृतीचा प्रकाश पसरवणारा समता विद्या मंदिरचा हा उपक्रम निश्चितच प्रेरणादायी ठरत आहे.

पालकमंत्री आशिष शेलार यांची नगरसेवक प्रकाश मोरे यांनी घेतली सदिच्छा भेट



प्रतिनिधी
■ मुंबई

दीपावलीच्या मंगलमय पर्वानिमित्त प्रभाग क्रमांक १५९ चे नगरसेवक तथा चांदिवली विधानसभा संयोजक आणि जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश देवजी मोरे यांनी महाराष्ट्राचे कॅबिनेट मंत्री तथा मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आशिष शेलार यांची सदिच्छा भेट घेतली. यावेळी नगरसेवक प्रकाश मोरे यांनी आपल्या पत्नी सौ. उषाताई मोरे यांच्यासमवेत आशिष शेलार यांना दीपावलीच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. तसेच त्यांचे आशीर्वाद घेतले. या सदिच्छा भेटीदरम्यान दीपावलीच्या सणानिमित्त शुभेच्छांची देवाणघेवाण झाली.आपले मार्गदर्शक असलेल्या आशिष शेलार यांची भेट घेऊन त्यांचे आशीर्वाद मिळाल्याने आनंद व्यक्त करत प्रकाश मोरे यांनी त्यांच्याप्रती आदर आणि कृतज्ञता व्यक्त केली.

मुंबई : काल बलिप्रतिपदा दीपावली पाडव्याच्या मंगलप्रसंगी मॉडेल टाउन रेसिडेन्ट्स वेलफेअर असोसिएशन व चॅलेंजर एरिना तर्फे क्रिकेट अकॅडेमी चे कार्याध्यक्ष मा. नगरसेवक देवेंद्र बाळा आंबेरकर यांनी फीत कापून उद्घाटन केले. त्याप्रसंगी अध्यक्ष राजेश ढेरे , उपकार्याध्यक्ष संजीव कल्ले बिल्लू , सरचिटणीस अशोक मोरे , विवेक पंगेरकर, विकी गुप्ता, प्रकाश जोशी, नवीन चौधरी, अंकुश पाटील नासिर अन्सारी प्रशिक्षक अनीस खान, चिंतनजी उपस्थित होते.



सनरायझर्स हैदराबादची मालकीण काव्या मारन अडकली विवाह बंधनात

नवी दिल्ली : आयपीएलमध्ये आपल्या ग्लॅमरस चेहऱ्याने क्रिकेटप्रेमींचं लक्ष वेधून घेणारी सनरायझर्स हैदराबादची मालकीण काव्या मारन तिचा प्रियकर अनिरुद्ध रविचंदर याच्यासोबत विवाह बंधनात अडकली आहे. काव्याचा पती अनिरुद्ध रविचंदर याच्यासह अनेक निकटवर्तीयांनी लग्नसोहळ्याचे फोटो सोशल मीडियावर शेअर केले आहेत. अरविंदर रविचंदरने My once in a lifetime, for a lifetime □ 11.11 अशा शब्दात आपल्या भावना व्यक्त करत इन्स्टाग्रामवर लग्नाची माहिती देणारी पोस्ट शेअर केली आहे. लग्नाचा हा फोटो समोर येताच काव्या मारन आणि अरविंदर रविचंदर यांना चाहत्यांनी शुभेच्छा देण्यास सुरुवात केली आहे.



ऐन दिवाळीत पंतप्रधान मोदींची शेतकऱ्यांसाठी मोठी भेट

रब्बी हंगामासाठी खत अनुदानास केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी

वृत्तसंस्था
नवी दिल्ली

रब्बी हंगाम २०२६-२७ साठी फॉस्फेटयुक्त आणि पोटॅशयुक्त खतांवरील 'पोषकद्रव्य आधारित अनुदाना'च्या (NBS) सुधारित दरांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील केंद्रीय मंत्रिमंडळाने बुधवारी मंजुरी दिली. १ ऑक्टोबर २०२६ ते ३१ मार्च २०२७ या सहा महिन्यांच्या कालावधीसाठी सरकारने तब्बल ६२,३७०.०२ कोटी रुपयांच्या अनुदानाची तरतूद केली आहे. मागील रब्बी हंगाम २०२५-२६ च्या ३७,९५२.२९ कोटी रुपयांच्या तरतुदीच्या तुलनेत ही रक्कम २४,४१७.७३ कोटी रुपयांनी अधिक आहे. पीआयबीकडून याबाबतचे प्रसिद्धीपत्रक जारी करण्यात आले आहे.



आंतरराष्ट्रीय बाजारात खतांच्या आणि कच्च्या मालाच्या किमतीत सातत्याने चढ-उतार होत असतानाही, देशातील शेतकऱ्यांना डाय-अमोनियम फॉस्फेट (डीएपी) आणि एनपीकेएसच्या विविध ग्रेडची खते वाजवी आणि परवडणाऱ्या दरात मिळावीत, यासाठी हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला असल्याचे केंद्र सरकारच्या वतीने सांगण्यात येत आहे.

मंत्रिमंडळाच्या या निर्णयानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'एक्स' वर पोस्ट करत म्हटले की, सरकारने नेहमीच शेतकऱ्यांना सर्वोच्च प्राधान्य दिले. "जगातील प्रतिकूल आणि कठीण परिस्थितीमध्येही बळीराजाचे जीवन सुकर करण्यासाठी आम्ही कोणतीही कसर सोडत नाही आहोत," असे पंतप्रधानांनी नमूद केले. आंतरराष्ट्रीय बाजारातील दरवाढीचा फटका शेतकऱ्यांना बसू नये आणि त्यांना वाजवी दरात खतांचा अखंड पुरवठा व्हावा, यासाठीच हा निर्णय घेण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

या निर्णयामुळे शेतकऱ्यांना खतांचा तुटवडा जाणवणार नाही आणि परवडणाऱ्या किमतीत खते उपलब्ध होतील, असा विश्वास सरकारने व्यक्त केला आहे. हे अनुदान थेट खत उत्पादक आणि आयातदारांना दिले जाते, जेणेकरून ते शेतकऱ्यांना सवलतीच्या दरात खतांची विक्री करू शकतील.

केंद्र सरकार सध्या खत उत्पादक आणि आयातदारांच्या माध्यमातून डीएपीसह पी अँड के खतांचे २८ प्रकार (ग्रेड्स) शेतकऱ्यांना अनुदानित दरात उपलब्ध करून देते. ही योजना एप्रिल २०१० पासून लागू आहे. या प्रणालीअंतर्गत सरकार खतांमध्ये असलेल्या नायट्रोजन, फॉस्फरस, पोटॅश आणि सल्फर या पोषक घटकांनुसार प्रति किलो अनुदानाचे दर निश्चित करते.

या दरांच्या आधारे खत कंपन्यांना सरकारकडून अनुदान दिले जाते, ज्यामुळे बाजारपेठेत या खतांचे किरकोळ दर सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या आवाक्यात राहतात. सध्या जागतिक पातळीवर युरिया, डीएपी, म्युरिएट ऑफ पोटॅश (एमओपी) आणि सल्फरच्या किमतींमध्ये होत असलेले बदल लक्षात घेऊन ही दरवाढ मंजूर करण्यात आली आहे. रब्बीच्या पेरणीच्या हंगामात शेतकऱ्यांना आवश्यक पोषकद्रव्ये योग्य भावात मिळावीत, हा यामागील मुख्य उद्देश आहे.

काँगोमध्ये रणांगणावरून पळ काढणाऱ्या 66 सैनिकांना फाशीची शिक्षा



ब्राझाविल्ले

आफ्रिकन देश असलेल्या काँगोमध्ये रणांगणावरून पळ काढल्याबद्दल आणि आदेशांचे पालन न केल्याबद्दल 66 सैनिकांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली आहे. उत्तर किवू प्रांतातील वालिकेल येथे एकूण 71 सैनिकांवर लष्करी न्यायालयात खटला चालवण्यात आला होता. यापैकी 66 जणांना फाशी, एकाला 10 वर्षांचा तुरुंगवास, तर उर्वरित चार सैनिकांची निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, 20 ऑक्टोबर रोजी विद्रोही संघटना एफआरएन (ज्यामध्ये एम 23 बंडखोरांचाही समावेश आहे) यांच्यासोबत झालेल्या चकमकीदरम्यान हे सैनिक आपली पोस्ट सोडून पळून गेले होते. त्यांच्यावर भ्याडपणा, बंडखोरी आणि लष्करी आदेशांचे उल्लंघन केल्याचा आरोप ठेवण्यात आला होता. काँगोचा पूर्व भाग बऱ्याच काळापासून एम 23 सारख्या विविध सशस्त्र विद्रोही गटांच्या हिंसाचाराचा सामना करत आहे. या बंडखोरांना शेजारील रवांडा देशाचा पाठिंबा असल्याचा आरोप काँगो सरकारकडून सातत्याने केला जातो. सैन्यामध्ये शिस्त राखण्यासाठी आणि विद्रोही गटांविरोधातील मोहीम मजबूत करण्यासाठी ही कठोर कारवाई करण्यात आल्याचे लष्कराने म्हटले आहे. काँगो सरकारने मार्च 2024 मध्ये 20 वर्षांपासून लागू असलेली मृत्युदंडावरील बंदी उठवली होती. देशद्रोह आणि युद्धगुन्ह्यांमध्ये सहभागी असलेल्यांवर वचक बसवण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला होता. फ्रान्सच्या आरएफआयच्या आकडेवारीनुसार, 2025 च्या सुरुवातीपासून आतापर्यंत काँगोमध्ये विविध गुन्ह्यांसाठी 507 हून अधिक सैनिकांना दोषी ठरवण्यात आले असून त्यापैकी तब्बल 381 सैनिकांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली आहे. गेल्या महिन्यातही अग्रिम मोर्च्यावरून पळून गेल्याबद्दल 27 सैनिकांना फाशीची शिक्षा देण्यात आली होती.

पान 1 वरून

नेतन्याहूंना विरोधकांनी संसदेत घेरले, बचावासाठी मध्ये पडली पत्नी

तसेच नेतन्याहू यांचं देशाच्या एकतेचं आवाहन करणारं भाषण रुळावरून घसरलं. दरम्यान, संसदेच्या सभागृहात असलेल्या या वादात बेंजामिन नेतन्याहू यांच्या पत्नी सारा नेतन्याहू यांनी उडी घेतली. त्यांनी आपल्या सीटवरूनच नफ्ताली बेनेट यांचा समाचार घेण्यास सुरुवात केली. यादरम्यान, इस्राइलचे संरक्षणमंत्री इतमार बेन ग्विर यांनीही सारा नेतन्याहू यांना साथ दिली. आरोप प्रत्यारोप वाढत असल्याने संसदेत एकच गोंधळ उडाला. या गोंधळाने बेंजामिन नेतन्याहू यांचंही लक्ष वेधून घेतलं. तसेच ते भाषण रोखून समोरच्या पंक्तीकडे पाहू लागले.संसदेतील हा धिंगाणा पाहून सारेच अवाक् झाले. एकीकडे पंतप्रधान राष्ट्रीय ऐक्याचे आवाहन करत असताना दुसरीकडे त्यांची पत्नी विरोधी पक्षाच्या नेत्यासोबत वाद घालत होती. तसेच या वादावादीचा व्हिडीओ व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यापासून लोक 'बिवी नंबर १' म्हणून सारा नेतन्याहू यांचं कौतुक करत आहेत.

स्वच्छतेत नवी मुंबई सर्वोत्तम

महानगरपालिकेने साध्य केले.नवी मुंबईतील शहरातील प्रत्येक नागरिकासाठी हा अत्यंत अभिमानाचा आणि आनंदाचा क्षण असून आपल्या सर्वांची प्रथम प्रतिनिधी म्हणून हा पुरस्कार महामहीम राष्ट्रपती महोदयांच्या शुभहस्ते स्वीकारण्याचा बहुमान मला लाभला हे माझे भाग्य असून हा पुरस्कार मी समस्त नवी मुंबईकर नागरिकांना आणि यासाठी सर्वाधिक काम करणा-या स्वच्छतामित्रांना आणि स्वच्छतासखींना अर्पण करीत असल्याचे मत यावेळी महापौर श्रीम.सुजाता पाटील यांनी व्यक्त केले. उपमहापौर श्री. दशथ भगत यांनीही या पुरस्कारामध्ये शहर स्वच्छ ठेवण्यासाठी अहोरात्र झटणा-या स्वच्छताकर्मींच्या योगदानाचे सर्वाधिक महत्व असल्याचे सांगितले. यापुढील काळात सुगंधी शहर अभियानाच्या माध्यमातून आणखी चांगले काम होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनीही सर्व नागरिकांच्या आणि स्वच्छताकर्मींच्या कार्याचे हे यश असल्याचे सांगत नवी मुंबई महानगरपालिकेने अत्याधुनिक तंत्रज्ञानाची स्वच्छताकार्याला दिलेली जोड आणि त्यामध्ये नागरिकांचा लाभलेला सक्रिय सहभाग याचा सखोल विचार राष्ट्रीय पातळीवर झाला आणि नवी मुंबई देशात प्रथम क्रमांकाच्या शहराची मानकरी ठरली असे सांगितले. नवी मुंबई महानगरपालिकेच्या या यशामध्ये दैनंदिन स्वच्छतेची गुणवत्ता उंचावत ठेवणे, कचरा संकलन आणि कचरा वाहतुक या दोन्ही क्षेत्रात इंटिग्रेटेड कमांड कंट्रील सेंटर अशा अत्याधुनिक तंत्रप्रणालीचा वापर करणे, वर्गीकृत कच-यावर त्याच्या श्रेणीनुसार सुयोग्य प्रक्रिया करणे त्यासोबत वस्त्र कच-यावर पुनर्प्रक्रिया करणारे देशातील पहिले केंद्र यशस्वीरित्या चालविणे अशा विविध बाबींचा समावेश आहे. त्याचप्रमाणे पाण्याच्या पुनर्वापरावर भर देणे, नागरिकांना तक्रार करण्यासाठी व तक्रारींचे निराकरण करून त्याची माहिती त्यांच्यापर्यंत पोहचण्यासाठी मायएनएमएमसी ॲप, सिटीजन ग्रिव्हेन्स पोर्टल अशा विविध डिजीटल प्लॅटफॉर्मचा प्रभावी वापर करणे आदी बाबींचा प्राधान्याने विचार करण्यात आला. याशिवाय प्लास्टिक प्रतिबंधात्मक उपाययोजना, नागरिकांच्या सहभागातून व्यापक प्रमाणात स्वच्छता मोहीमांचे आयोजन व त्यामध्ये विद्यार्थी व युवकांच्या सहभागावर भर अशा वेगवेगळ्या गोष्टी प्राधान्याने करण्यात आलेल्या आहेत.

पाहुण्यांकडे गेलेल्या बाप-लेकींचा मृत्यू

सध्या सणासुदीचे दिवस सुरू असताना आणि दिवाळीची सुट्टी असल्याने मुली आपल्या वडिलांसोबत नाशिकला पाहुण्यांकडे आल्या होत्या. बेझे धरणात पोहण्यासाठी बाप-लेकी गेल्या होत्या. मात्र, कोणालाही कल्पना नव्हती की हा त्यांचा शेवटचा दिवस ठरेल. एकाच कुटुंबातील कर्ता पुरूष आणि दोन चिमुकल्या मुलींचा मृत्यू झाल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

दिवाळीत प्रदूषण वाढल्याने कर्मचाऱ्यांना वर्क फ्रॉम होम

वृत्तसंस्था
नवी दिल्ली

वाढत्या वायुप्रदूषणाला आळा घालण्यासाठी वायुगुणवत्ता व्यवस्थापन आयोगाने (CAQM) महत्त्वाचे प्रतिबंधात्मक उपाय जाहीर केले आहेत. त्यानुसार, दिल्ली आणि राष्ट्रीय राजधानी क्षेत्रात (NCR) ५ ते २० नोव्हेंबर २०२६ या कालावधीत परिसरात धूळ निर्माण करणारी पाडकामे आणि बाहेरील बांधकामांवर निर्बंध लागू करण्यात आले आहेत. तसेच, सरकारी व खासगी कार्यालयांमध्ये केवळ ५० टक्के कर्मचाऱ्यांना प्रत्यक्ष उपस्थित राहण्याची परवानगी असेल. उर्वरित कर्मचाऱ्यांना वर्क फ्रॉम होम करावे लागणार आहे.

दिल्ली-NCR मध्ये विशेषतः नोव्हेंबर महिन्याच्या सुरुवातीपासून मध्यापर्यंत वायुप्रदूषणाची पातळी वाढत असल्याचे मागील काही वर्षांच्या आकडेवारीतून समोर आले आहे. २०१८ ते २०२५ या कालावधीतील हवेच्या गुणवत्ता निर्देशांकाच्या (AQI) आकडेवारीनुसार, काही दिवसांमध्ये प्रदूषणाची पातळी 'गंभीर' आणि 'अतिगंभीर' श्रेणीपर्यंत पोहोचली होती.

वाहनांचे उत्सर्जन, औद्योगिक प्रदूषण, शेतीतील अवशेष जाळणे आणि जैविक इंधन जाळल्यामुळे होणारे उत्सर्जन यांचा प्रदूषणात मोठा वाटा असतो. त्यातच कमी वाऱ्याचा वेग, वातावरणातील हवेचे कमी अभिसरण आणि प्रदूषक कण हवेतच साचून राहण्यास अनुकूल हवामान यामुळे परिस्थिती आणखी गंभीर होते. या पार्श्वभूमीवर प्रदूषणाची पातळी वाढण्यापूर्वीच उत्सर्जन कमी करण्यासाठी आयोगाने हे प्रतिबंधात्मक उपाय लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. आयोगाच्या निर्देशानुसार, ५ ते २० नोव्हेंबरदरम्यान संपूर्ण NCR क्षेत्रात धूळ निर्माण करणारी पाडकामे आणि बाहेरील बांधकामे प्रतिबंधित असतील. महामार्ग, रस्ते, उड्डाणपूल, ओव्हरब्रिज, वीजवाहिन्या, पाइपलाइन आणि दूरसंचार प्रकल्पांसारख्या सार्वजनिक पायाभूत सुविधांच्या कामांनाही हे निर्बंध लागू असतील.

मात्र, काही अत्यावश्यक आणि महत्त्वाच्या प्रकल्पांना या निर्बंधांतून सूट देण्यात आली आहे. यामध्ये रेल्वे, मेट्रो सेवा, विमानतळ, आंतरराज्यीय बस स्थानके, रुग्णालये, पाणीपुरवठा आणि स्वच्छता व्यवस्था, राष्ट्रीय सुरक्षा व संरक्षणाशी संबंधित कामे तसेच राष्ट्रीय महत्त्वाच्या प्रकल्पांचा समावेश आहे.

महाराष्ट्रातील जनता असली भाषा खपवून घेणार नाही!

चंद्रकांत पाटील यांचे हात जेवढे मोठे होत आहेत, तेवढी त्यांची वैचारिक पातळी खालावत चालली आहे. गेल्या दहा वर्षांपासून त्यांच्यासोबत आपली राजकीय लढाई सुरू आहे. मात्र, त्यांनी स्वर्गीय डी. वाय. पाटील यांच्याबद्दल अपमानास्पद वक्तव्य केले. डी. वाय. पाटील यांच्याबद्दल बोलून चंद्रकांत पाटील यांनी नेमके काय मिळवले? त्यांनी यावर आत्मचिंतन करावे, असा सल्ला सतेज पाटील यांनी दिला. सरकारी यंत्रणेचा गैरवापर करून तुम्हाला उद्ध्वस्त करतो, संपवतो, अशी भाषा माझ्यासमोर वापरू नका. कोल्हापूरच्या जनतेला हे अजिबात आवडणार नाही. महाराष्ट्रातील जनताही अशी भाषा खपवून घेणार नाही. तुमच्या पुण्यापासून घोसरवाडपर्यंतच्या काचेच्या महालाबद्दल मला बोलायला लावू नका. मीसुद्धा पाटील आहे, हे लक्षात ठेवा, अशा शब्दांत त्यांनी चंद्रकांत पाटील यांना सुनावले. तुम्हाला खरोखरच लढायचे असेल, तर २०२९ मध्ये जिल्ह्यातील दहा विधानसभा मतदारसंघांपैकी कुठेही माझ्याविरोधात लढून दाखवा, असे आव्हानही त्यांनी दिले. २०२७ ची विधानपरिषद निवडणूक लढवायची की २०२९ ची निवडणूक, याचा निर्णय अद्याप घेतलेला नाही. मात्र, त्या राजकीय लढाईच्या सारीपाटावर कोणते डाव खेळायचे, हे मला चांगले माहीत आहे. महाराष्ट्रासाठी साहेबम्हणून नव्हे, तर लोकांच्या हृदयात बंटी पाटील म्हणूनच राहणे मला अधिक पसंत आहे, असा टोलाही त्यांनी लगावला.

कुर्ल्यात सहा महिन्यांत पवार कुटुंबातील दुसरी हत्या

विनोबा भावे नगर पोलीस ठाण्यासमोर ठिय्या आंदोलन केले. याचदरम्यान पोलिसांनी एका संशयिताला पोलीस ठाण्यात आणले असता संतप्त नातेवाइकांनी त्याला मारहाण करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे काही काळ पोलीस आणि आंदोलनकर्त्यांमध्ये बाचाबाची झाली. जोपर्यंत न्याय मिळत नाही, तोपर्यंत आंदोलन मागे घेणार नसल्याची भूमिका कुटुंबीयांनी घेतली. गोळीबाराच्या घटनेची माहिती मिळताच वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. अप्पर पोलीस आयुक्त धनंजय कुलकर्णी, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. फॉरेन्सिक पथकाने घटनास्थळाची पाहणी करून महत्त्वाचे पुरावे गोळा केले आहेत. या प्रकरणाचा तपास वेगाने करण्यासाठी पोलिसांनी तब्बल १२ पथके तयार केली असून, एका व्यक्तीला ताब्यात घेण्यात आले आहे. इतर संशयित आरोपींचा शोध सुरू आहे.

पाकिस्तानचा अमेरिकेला जोरदार झटका,

आणि तिथून त्यांच्या देशांमध्ये त्यांची रवानगी केली जाईल. पाकिस्तानने दिलेल्या ताज्या नकारामुळे या योजनेत अडथळा आला आहे. कुटनितीच्या पातळीवर संबंध नसलेल्या देशांच्या नागरिकांना त्यांच्या मायदेशी पाठवण्यासाठी अमेरिका पाकिस्तानचा मार्ग वापरू इच्छितो. पण पाकिस्तानने घेतलेला ताजा पवित्रा अमेरिकेसाठी अडचणीचा ठरला आहे. त्यामुळे अमेरिकेत अवैधपणे राहणाऱ्या इराणी नागरिकांची गच्छंती अमेरिकेसाठी चिंतेचा विषय ठरत आहे.

पॅन कार्ड आणि मतदार ओळखपत्र म्हणजे भारतीय नागरिकत्वाचा पुरावा नाही : हायकोर्ट

वृत्तसंस्था
गुवाहाटी

"मूळ कागदपत्रांचा आधार नसेल तर औपचारिक पडताळणीशिवाय स्वयं-घोषणापत्राच्या आधारावर जारी केलेले पॅन कार्ड आणि मतदार ओळखपत्र भारतीय नागरिकत्व सिद्ध करू शकत नाहीत," असे महत्त्वपूर्ण निरीक्षण गुवाहाटी उच्च न्यायालयाने नोंदवले. तसेच न्यायालयाने ५ मार्च १९७१ नंतर भारतात प्रवेश केलेली परदेशी नागरिक म्हणून घोषित करणाऱ्या परदेशी नागरिक न्यायाधिकरणाच्या मताला आव्हान देणारी याचिका फेटाळून लावली.

'लाईव्ह लॉ'ने दिलेल्या वृत्तानुसार, याचिकाकर्त्या महिलेने २५ एप्रिल १९७७ रोजी आसाममध्ये जन्म झाल्याचा दावा केला होता. नागरिकत्वाच्या पुराव्यादाखल तिने १९६६ आणि १९७० च्या मतदार याद्यांमधील तिच्या आजी-आजोबांची नावे, वडिलांचे पॅन कार्ड



व मतदार ओळखपत्र, स्वतःचे मतदार ओळखपत्र, रेशन कार्ड आणि एनआरसी (NRC) अर्जाची पावती न्यायाधिकरणात सादर केली होती. तिचे वडील भारतीय नागरिक असून त्यांनी लोकसभा आणि विधानसभा निवडणुका लढविल्या होत्या, तसेच गुवाहाटी महापालिकेचे निवडून आलेले नगरसेवक म्हणून काम केले होते, असा युक्तिवाद तिने केला होता.

याचिकाकर्त्या महिलेला परदेशी न्यायाधिकरणाने २४ मार्च १९७१ नंतर भारतात बेकायदेशीरपणे प्रवेश केलेली परदेशी नागरिक घोषित केले होते. या निर्णयाला तिने उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. यावर न्यायमूर्ती कल्याण राय सुराणा आणि न्यायमूर्ती सुष्मिता फुकन खाऊंड यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली.

"पॅन कार्ड आणि मतदार ओळखपत्र हा नागरिकत्वाचा थेट पुरावा नाही. ही कागदपत्रे आयकर विभाग आणि भारतीय निवडणूक आयोगाकडून कोणतीही सखोल औपचारिक चौकशी न करता केवळ अर्जातील माहितीवरून दिली जातात. त्यामुळे या कागदपत्रांना पाठबळ देणाऱ्या मूळ नोंदी सिद्ध केल्याशिवाय, केवळ या पुराव्यांच्या आधारे भारताचे नागरिकत्व स्वीकारता येणार नाही," असे स्पष्ट करत, परदेशी न्यायाधिकरणाने याचिकाकर्ती आणि तिच्या दाव्यानुसार असलेल्या वडिलांमधील नातेसंबंध जोडणारे सबळ पुरावे नसल्याचे सांगत उच्च न्यायालयाने महिलेची मागणी फेटाळून लावली.

मलेशियाच्या पंतप्रधानांनी 'रजनीकांत स्टाइल'मध्ये दिल्या भारतीयांना दिवाळीच्या शुभेच्छा!

वृत्तसंस्था
कौलालंपूर

दिवाळीच्या निमित्ताने जगभरातील अनेक प्रमुख नेत्यांनी भारताला आणि जगभरातील भारतीयांना शुभेच्छा दिल्या आहेत. मात्र, मलेशियातून आलेल्या एका अनोख्या संदेशाने सर्वांचेच लक्ष वेधून घेतले आहे. मलेशियाचे पंतप्रधान अन्वर इब्राहिम यांनी सुपरस्टार रजनीकांत यांच्या खास शैलीत एक व्हिडिओ बनवून दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या आहेत. या व्हिडिओमध्ये ते अगदी रजनीकांत यांच्यासारखा गॉगल लावताना, गाडीतून उतरताना आणि तमिळ भाषेत बोलताना दिसत आहेत. त्यांचा हा हटके अंदाज सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाला आहे.





सोशल मीडियावरील या व्हिडिओमध्ये अन्वर इब्राहिम कंटेंट क्रिएटर देवराज डेव्हिडसोबत दिसत आहेत. व्हिडिओच्या सुरुवातीला अन्वर इब्राहिम एका दमदार आणि स्टायलिश अंदाजात कारमधून खाली उतरतात. ते देवराजसोबत ते दिवाळी साजरी करताना दिसतात. व्हिडिओमध्ये दोघे मिळून फराळातील 'मुरुक्कू' खातात (महाराष्ट्रातील चकलीसारखा पदार्थ) आणि तमिळ भाषेत 'दीपावली नलवाल्थुक्कल' (दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा) असे म्हणताना दिसतात. त्यानंतर रजनीकांत यांचे मफरल खांद्यावर टाकण्याची स्टाईल करतात. मलेशियात भारतीय वंशाची मोठी लोकसंख्या असून, त्यातील सुमारे ८५ टक्के लोक दक्षिण भारतीय वंशाचे आहेत. त्यामुळे त्यांचा हा व्हिडिओ चर्चा होत आहे.

सोशल मीडियावरील आपल्या संदेशात पंतप्रधान अन्वर इब्राहिम म्हणाले की, "दिवाळीच्या या सणाने देशातील वैविध्यपूर्ण समाजात ऐक्य अधिक दृढ केले पाहिजे. ज्या समाजात वेगवेगळ्या संस्कृती आणि परंपरा एकत्र नांदतात, तिथे परस्पर आदर, सामंजस्य आणि एकमेकांमधील फरक स्वीकारण्याची भावना बळकट होणे आवश्यक आहे."



